CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १७ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १२८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार जयंती

# संघाकडून मिळाले जीवनाचे संस्कार

## पंतप्रधान मोदींचे भावोद्गार | पॉडकास्टमध्ये केली सविस्तर चर्चा

◆ **नवी दिल्ली, १६ मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सुप्रसिद्ध पॉडकास्टर लेक्स फ्रीडमॅन यांच्यातील चर्चेचे पॉडकास्ट रविवारी प्रसारित झाले. यादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी अनेक मुद्यांवर सविस्तर चर्चा केली. विशेषत: त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून आपल्याला जीवनाचे संस्कार मिळाल्याचे सांगितले.

लेक्स यांनी पंतप्रधान मोदींना रा. स्व. संघाविषयी विचारले तेव्हा ते म्हणाले, लहानपणापासूनच मला कोणत्या ना कोणत्या कामात व्यस्त राहण्याची सवय होती. मकोशी नावाचा एक माणूस होता. त्याचे पूर्ण नावही मला आता आठवत नाही. तो सेवा समूहाचा घटक होता. त्याच्यासोबत डफलीसारखे वाद्य होते आणि तो आपल्या दमदार आवाजात देशभक्तीची गीते सादर करायचा. जेव्हा तो आमच्या गावात यायचा तेव्हा मी त्याच्यामागे धावत असे. तेही फक्त त्याचे गाणे ऐकण्यासाठी. रात्रभर बसून मी त्याचे गाणे ऐकत असे. एक वेगळाच आनंद मिळायचा.

आमच्या गावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एक शाखा होती. तिथे देशभक्तिपर गीते सुरू असायचे. ती माझ्या मनाला स्पर्श करून गेली आणि मी संघाचा एक भाग बनलो. संघाने आम्हाला जी मूल्ये दिली, त्यातील एक होते की जे काही करायचे ते कोणत्या तरी उद्देशाने, ध्येयाने प्रेरित होऊन करायचे. राष्ट्राच्या योगदानासाठी करायचे. जसे मी अभ्यास करत असेल तर इतका करू की देशाच्या कामी येईल. जर मी व्यायाम करत असेल तर असा करू की माझे शरीर देशाच्या कामी येईल. संघ ही शिकवण देतो. संघ एक फार मोठी संघटना आहे.



### काही वेचक शब्दमोती...

- माझी ताकद माझ्या नावात नाही तर १.४ अब्ज भारतीयांच्या आणि देशाच्या कालातीत संस्कृती आणि वारशाच्या पाठिंब्यात आहे.
- जेव्हा मी जागतिक नेत्यांशी हस्तांदोलन करतो, तेव्हा मोदी नव्हे तर १.४ अब्ज भारतीय हस्तांदोलन करतात.
- मी माझ्या शपथविधी सोहळ्याला पाकिस्तानला आमंत्रित केले होते, जेणेकरून एक नवीन अध्याय सुरू होईल, परंतु शांततेच्या प्रत्येक प्रयत्नाला शत्रुत्व आणि विश्वासघाताचा सामना करावा लागला.
- मी कोणत्याही प्रकारच्या टीकेचे स्वागत करतो. हा लोकशाहीचा आत्मा आहे यावर माझा ठाम विश्वास आहे.
- भारत आता डोळे खाली ठेवून किंवा डोळे वर करून बोलणार नाही. आता भारत नजरेला नजर भिडवून बोलेल. माझ्यासाठी माझा देश प्रथम येतो.
- कोविडने प्रत्येक देशाच्या मर्यादा उघड केल्या आहेत. यातून शिकण्याऐवजी जग अधिक विखुरले आहे.
- संघर्षऐवजी निरोगी स्पर्धेची गरज आहे. २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत आणि चीनने स्वाभाविकपणे स्पर्धा करावी, सामना करावा असे नाही.

# जलयुक्त शिवारबाबत राज्यशासन आणि एटीई चंद्रा फौंडेशन यांच्यात सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ मार्च -**

राज्यात 'जलयुक्त शिवार योजना-२' अंतर्गत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणांतील पाणीसाठा वाढण्यासोबतच शेतीची सुपिकता वाढण्यासही मोठ्या प्रमाणावर मदत होत आहे. या योजनेतील सहभाग आणि प्रभावी अंमलबजावणी बाबत ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन आणि मृद आणि जलसंधारण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक महत्वाकांक्षी योजना आहे. यामध्ये सामाजिक संस्था काम करण्यासाठी उत्सुक आहेत. ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन सक्रीय सहभागी होणार असल्याने राज्यातील पाण्याची उपलब्धता वाढवण्यासोबतच जमिनीची सुपिकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्येही चांगली वाढ होण्यात मदत होणार आहे. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मृद व जलसंधारण विभागाने फौंडेशनला सहकार्य करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागाला दिल्या आहेत.

या सामंजस्य करारानुसार या योजनेसाठी ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन तांत्रिक सहाय्यासह, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मनुष्यबळ सहाय्य उपलब्ध करून देणार आहे. फौंडेशनच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या अवनी ग्रामीण ॲपच्या माध्यमातून योजनेतील कामांच्या डेटाचे संकलन आणि नियंत्रण करण्यात येणार आहे. तसेच फौंडेशनमार्फत स्वयंसेवी संस्थांमध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना अवनी ग्रामीण ॲप संदर्भातील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## महत्त्वाचे...

### पुढील चार दिवस रणरणत्या उन्हाचे

**नवी दिल्ली :** देशभरात झपाट्याने हवामानात बदल होत आहे. बहुतांश राज्यांत कमाल तापमान रोज नवा उच्चांक गाठत आहे. त्यातच हवामान विभागाने पुढील चार दिवस अनेक राज्यांत तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. देशभरात तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. झारखंड, कर्नाटक, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि महाराष्ट्रात तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला.

**२० मार्चपर्यंत उष्णतेची लाट**

ओडिशाच्या अनेक ठिकाणी उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट, झारखंडमध्ये अनेक ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी आणि छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी पुढील चार दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. १७ मार्च रोजी झारखंड, पश्चिम बंगाल, विदर्भ, उत्तर तेलंगणा येथे उष्णतेच्या लाट तीव्र होण्याची शक्यता आहे. ईशान्य भारतात १६ आणि १७ मार्च रोजी वादळी आणि अरुणाचल प्रदेशात काही ठिकाणी मुसळधार पाऊस किंवा बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. २० ते २३ मार्च दरम्यान पूर्व मध्य भारतात विखुरलेला ते बऱ्यापैकी पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

### राज्यपालांनी घेतली रामनाथ कोविंद यांची भेट

**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी रविवारी राजभवन येथे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची भेट घेतली. रामनाथ कोविंद हे मुंबई दौऱ्यावर असून राजभवन येथे राज्यपाल राधाकृष्णन् यांनी त्यांचे स्वागत केले, असे राजभवनाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. शनिवारी, केरळमधील त्रिशूर येथे चेंबर ऑफ कॉर्सने आयोजित केलेल्या कार्यक्रमात राधाकृष्णन्? यांनी फुटबॉल दिग्गज पद्मश्री आय. एम. विजयन यांचा सत्कार केला. त्रिशूरचे महापौर एम. के. वर्गीस, आमदार पी. बालचंद्रन आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.



### नऊ महिन्यांनंतर चेहऱ्यावर फुलले हसू



मागील नऊ महिन्यांपासून देश-दुनियेपासून लाखो किलोमीटर अंतरावर असताना घालवलेला प्रत्येक जड क्षण परतीचे यान दिसताच जणू हलका झाला आणि पुन्हा आपल्या जगात परतणार या वास्तवाच्या कल्पनेने सुनीता आणि तिच्या सहकाऱ्याला जणू आनंदाला पारावारच राहिला नाही. पाय तर जमिनीवर तसेही नाहीतच; मात्र त्यांच्या मनाने घराच्या दिशेने जणू भरारीच घेतली

# हाफिझचा पुतण्या अबू कतालचा खात्मा

## पाकिस्तानातच केला 'गेम'

◆ **इस्लामाबाद, १६ मार्च**

मुंबईवरील २६/११ रोजीच्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार हाफिझ सईदचा पुतण्या अबू कतालचा शनिवारी रात्री खात्मा करण्यात आला. अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्यावर बेछूट गोळीबार केला. यात तो जागीच ठार झाला. अबू कताल हा देखील भारताच्या 'मोस्ट वॉण्टेड' यादीत होता.

झेलम परिसरातील दिना पंजाब विद्यापीठाजवळ मारेकऱ्यांच्या गोळीबारात अबूचा अंगरक्षकही ठार झाला असून, अन्य एक अंगरक्षक गंभीर जखमी झाला. हा हल्ला झेलम भागातील पंजाब विद्यापीठ परिसरात झाला. दहशतवादी कतालचा ताफा झीनत हॉटेलपासून जात होता. यावेळी त्याला तोयबाचे अतिरेकी आणि पोलिसांचीही सुरक्षा होती. असे असतानाही अज्ञात हल्लेखोरांनी त्याचा खात्मा केला.

अबू कतालचे खरे नाव जिया उर रहमान असे असून, तो भारताच्या राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएच्या यादीत पहिल्या दहामध्ये होता. काश्मिरातील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्याचा प्रत्यक्ष सहभाग होता. हाफिझची सर्व सूत्रे त्याने आपल्या हातात घेतली होती. जम्मू-काश्मीरच्या पूंछ आणि राजौरी भागातील दहशतवादी हल्ल्यांचा कट तोच रचत होता. त्याच्या सर्वाधिक विश्वासातील रियाज अहमद आणि हांजला अदनान या अतिरेकी नेत्यांचा २०२३ मध्ये खात्मा झाला. अबू कतालने सर्वप्रथम २००० मध्ये जम्मूत घुसखोरी केली होती. त्यावेळी त्याने मोठ्या संख्येत मुस्लिम तरुणांची दहशतवादी संघटनेत भरती केली होती.

**रियासी, राजौरीतील हल्ल्याचा मास्टरमाईंड**

लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवादी कारवाया लपविण्यासाठी अबूने पीपल्स ॲण्टी फॅसिस्ट फोर्स आणि द रेसिस्टंस फोर्स या संघटनांची स्थापना केली. त्याने १ जानेवारी २०२३ रोजी राजौरीतील एका गावात मोठा दहशतवादी हल्ला केला होता. यात नऊ नागरिक ठार आणि अनेक लोक जखमी झाले होते. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानात आत्मघाती हल्ल्यात ९० सैनिक ठार

## बलूच आर्मीने उडवली आठ लष्करी वाहने

◆ **लाहोर, १६ मार्च**

बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानच्या रेल्वेचे अपहरण केल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा बलूच बंडखोरांनी पाकिस्तानच्या लष्करी ताफ्यावर हल्ला केला. यात ९० पाकिस्तानी सैनिक ठार झाल्याचा दावा बलूच बंडखोरांनी केल्याचे वृत्त आहे. पाकिस्तानने मात्र, आमचे केवळ आठ सैनिक ठार झाल्याचे म्हटले आहे.

पाकिस्तानच्या नोशकीजवळ क्वेटाहून तफ्तानला जाणाऱ्या पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर रविवारी झालेल्या हल्ल्यात आठ सैनिक ठार व २१ जण जखमी झाले, अशी माहिती पाकिस्तानच्या लष्कराने दिली. तर, बलूच लिबरेशन आर्मीने (बीएलए) या हल्ल्यात एकूण ९० पाकिस्तानी सैनिक ठार झाल्याचा दावा केला आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून निषेध**

बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. सरकारचे प्रवक्ते शाहिद रिंद म्हणाले की, निष्पाप नागरिकांना लक्ष्य करणे हे क्रूर कृत्य आहे. रिंद यांनी जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली.

**रेल्वेचे केले होते अपहरण**

यापूर्वी मंगळवारी क्वेटाहून पेशावरला जाणाऱ्या जफर एक्सप्रेसचे गुडालर आणि पिरू कुनरी या डोंगराळ भागांजवळील एका बोगद्यातून बलुच बंडखोरांनी अपहरण केले होते. बंडखोरांनी रेल्वे रुळ उडवले आणि ट्रेन थांबताच तिचा ताबा घेतला. नऊ डब्यांच्या या ट्रेनमध्ये ४०० हून अधिक प्रवासी होते. (वृत्तसंस्था)

# आशियान देशांची परिषद बुधवारपासून

◆ **नवी दिल्ली, १६ मार्च**

दहशतवाद आणि दहशतवादाचा सामना करण्यासाठी एक व्यापक रणनीती तयार करण्यासाठी १० देशांच्या आशियान गटाची परिषद बुधवारीभारतातहोणार आहे.

संरक्षण मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, या परिषदेसाठी आशियान सदस्य देशांचे संरक्षण मंत्री, प्रतिनिधी आणि तज्ज्ञ मंगळवारी राजधानी दिल्लीत येणार आहेत.

यातदहशतवादाविरोधात लढा देण्यासाठी व्यापक चर्चा केली जाणार आहे. परिषदेत भारत, चीन, ऑस्ट्रेलिया, जपान, न्यूझीलंड, कोरिया प्रजासत्ताक, रशिया आणि अमेरिकेच्या प्रतिनिधींचा समावेश राहणार आहे. दहशतवादविरोधी तज्ज्ञांचा कार्यगट अर्थात्? ईडब्लूजी परिषदेचे सहअध्यक्ष भारत आणि मलेशियाकडे आहे.

भारत पहिल्यांदाच परिषदेचे सहअध्यपद भूषवत आहे. भारताचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह बुधवारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी संबोधित करणार आहेत. (वृत्तसंस्था)




# शनिच्या कक्षेत आढळले १२८ नवे चंद्र!

## खगोलशास्त्रज्ञांचे शिक्कामोर्तब, शनीभोवती एकूण २७४ चंद्र

◆ **सिडनी, १६ मार्च**

ग्रहमालिकेत असलेल्या शनि ग्रहाच्या कक्षेत फिरणाऱ्या १२८ नव्या चंद्रांना शोधण्यात खगोलशास्त्रज्ञांना यश आले आहे. या शोधामुळे शनिभोवती एकूण २७४ नैसर्गिक उपग्रह असल्याचे स्पष्ट झाले. सौरमालेतील इतर सर्व ग्रहांच्या चंद्रांची एकत्रित संख्या याच्या निम्मीही नाही. या शोधामुळे शनिची 'चंद्रांचा राजा' म्हणून असलेली प्रतिष्ठा आणखी बळकट झाली आहे.

आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र संघाने तैवानमधील ॲकॅडेमिया सिनिका येथील एडवर्ड ॲश्टन यांच्या नेतृत्वातील शास्त्रज्ञांच्या पथकाच्या या शोधाला मान्यता दिल्याने शनीला तब्बल १२८ नवीन चंद्र मिळाल्याचे स्पष्ट झाले. खगोलशास्त्रज्ञ एडवर्ड



ॲश्टन यांनी सांगितले की, मागील आठवड्यात आयएयू अर्थात् आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय संघटनेने नव्या चंद्रांची अधिकृत नोंदणी केली आहे. संशोधकांनी १० मार्च रोजी अर अरक्झीव्ह या जर्नलमध्ये आपला अभ्यास प्रसिद्ध केला; मात्र तो अद्याप समीक्षण प्रक्रियेत आहे. नव्या शोधामुळे शनी हा गुरू ग्रहाच्या ९५ चंद्रांपेक्षा खूपच पुढे गेला आहे. आमच्या काळजीपूर्वक आखलेल्या बहुवर्षीय मोहिमेमुळे आम्हाला नव्या चंद्रांचा मोठा साठा मिळाला, ज्यामुळे शनीच्या अनियमित उपग्रहांच्या उत्क्रांतीबद्दल महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. हे नवे चंद्र 'नॉर्स गटातील' आहेत, जे शनी ग्रहाच्या कक्षेत वक्राकार आणि विरुद्ध दिशेने अर्थात् रेट्रोग्रेड फिरतात. हे अनियमित चंद्र लहान आकाराचे फक्त एक-दोन मैल व्यासाचे आणि अपूर्ण गोलसर आहेत. (वृत्तसंस्था)

### १० कोटी वर्षांपूर्वी निर्मिती

वैज्ञानिकांच्या मते, हे चंद्र पूर्वीच्या मोठ्या चंद्रांचे तुकडे असावेत, जे कोणत्या तरी महाकाय धडकेमुळे फुटले असतील. ही धडक १० कोटी वर्षांपूर्वीच घडली असण्याची शक्यता असून, यातूनच शनिभोवती फिरणाऱ्या चंद्रांची निर्मिती झाली. हा अपघात शनि ग्रहाच्या इतर चंद्रांशी किंवा एखाद्या उल्केशी झाला असावा. सौर मंडळातील इतर ग्रहांच्या तुलनेत शनिच्या कक्षेत सर्वाधिक चंद्र असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दुधनीच्या शिवाजी नगर तांड्यावर होळी उत्साहात

**अक्कलकोट दि.१६ मार्च -**

दुधनी येथील शिवाजी नगर तांड्यात होळी सणदिवशी चरीक चरीआ चंपा बोल - जु - जु चंपा लेरा ल, पेलो बेटा नायकी कर हे गाणे गाऊन पुरुषांनी मार खात महिलांच्या ताब्यातील खिरीचा हंडा घेऊन खिर व पुरीचे जेवण केले आणि पारंपरिक पद्धतीने होळी सण मोठ्या उत्साहात साजरा केला. शिवाजी नगर तांडा दुधनी येथील तांड्याचे नायक हरीचंद्र राठोड यांच्या घरी होळी सणाचे नियोजन करण्यात आले होते. यावेळी गेरया म्हणून रोशन राठोड व सोनु पवार यांची निवड करण्यात आली. यावेळी शंकर राठोड, नायक हरीचंद्र राठोड , कारभारी लालू पवार यांनी सर्वांना सोबत घेऊन लेंगीचे गाणे म्हणत होळी सणाला सुरुवात केली. रात्रभर जागरण करून पहाटे पाच वाजता तांड्यासमोर होळी पेटविण्यात आली. त्यानंतर लेंगी गीत आओ भाई डावसाण आपण खेळा होळी रे होळी आई रे भाई-भाई र या गीताच्या चालीवर नाचगाणे झाले. तांड्यात प्रत्येक घरासमोर जाऊन लेंगी घालत गेर उकळण्यात आला. पुरुषांनी मार खात महिलांच्या ताब्यातील खिरीचा हंडा सोडविल्यानंतर खिर व पुरीचे जेवण देण्यात आले.



### वैराग नगरपंचायतीकडून विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार संपन्न

**वैराग दि १६ मार्च-**

वैराग नगरपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी अंजली मरोड होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद सदस्या रेखा भुमकर होत्या. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या रणरागिणींचा उपजिल्हाधिकारी मरोड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये तारामती लोंढे, कमल घोटकर, कुसुम कासार, लीना भूमकर, भागीरथी ऐनापुरे, यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका, अशा सुपरवायझर, आशा वर्कर व विद्यार्थिनी यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ . मधुरा बाजारे डॉ. अंजू चव्हाण, प्रा. मोहिते, डॉ. संगीता देशमुख, नगरसेविका तृप्ती भुमकर, जैतूनबी बागवान ,आसमा मिर्झा, पदमिनी सुरवसे, गुरुबाई झाडमुखे, जयश्री घोडके, राणी आदमाने, अर्चना माने रेड्डी, आशादेवी वाघ आदीसह महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सचिन रेड्डी यांनी केले. नगरसेविका तृप्ती भुमकर यांनी आभार मानले.



### प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर यश सहज शक्य : लक्ष्मण नरे

**अणदूर, दि.१६ मार्च -**

वैद्यकीय शिक्षण सर्वसामान्यांच्या आवाक्या बाहेरचे असले तरी जिद्द, चिकाटी, अथक परिश्रम, प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर ते शक्य होते असे मत श्री श्री गुरुकुलचे मुख्याध्यापक लक्ष्मण नरे यांनी व्यक्त केले. अणदूर (ता. तुळजापूर) येथील जवाहर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांची कन्या भाग्यश्री हिने दंत विद्या पदवी परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्याबद्दल जय मल्हार पत्रकार संघ व व्हॉइस ऑफ मीडिया यांच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. भाग्यश्री बिराजदार म्हणाल्या की, धनसंपत्तीपेक्षा आरोग्य संपत्ती महत्त्वाची असून लहानपणापासूनच दाताच्या आरोग्याचे काळजी घेण्याची गरज आहे. यावेळी दयानंद काळुंके, शिवशंकर तिरगुळे, डॉ. एम .बी. बिराजदार यांनीही आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमास पत्रकार अजय अणदूरकर, सचिन तोग्गी, चंद्रकांत हगलगुंडे, चंद्रकांत गुड्डू, संजू आलूरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### श्री.वटवृक्ष देवस्थानच्या कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनला चंद्रकांत पाटील यांची भेट

**अक्कलकोट, दि १५ मार्च-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयास राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. सोलापूर पुणे, मुंबईच्या धरतीवरील तंत्र शिक्षण इंगळे परिवार यांच्यामुळे अक्कलकोट मध्ये उपलब्ध असल्याचे ते म्हणाले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, त्यांचे स्वीय सहायक धनंजय गाढवे, प्रथमेश इंगळे, महेश हिंडोळे, प्रदिप पाटील, भाजपाचे माजी तालुका अध्यक्ष मल्लिनाथ स्वामी, रवी वाघमोडे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, सुरेश वाले, खाजप्पा झंपले, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, ऋषिकेश लोणारी, सागर गोंडाळ आदींसह देवस्थानचे अन्य सेवेकरी कर्मचारी उपस्थित होते.

# तरुणाचे अपहरण; सहा जणांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१५ मार्च**

१३ लाख रुपये खंडणी दिली नाही म्हणून एका २४ वर्षीय तरुणाला मला वाचवा ओ वाचवा ओ अशी विनवणी करीत असतानाही फत्तेशिह ग्राउंडवरून सिने स्टाईलने उचलून अपहरण केल्याप्रकरणी पोलिसांनी तीन तासात सहा जणांना पकडले. सहा आरोपींना दि. १३ रोजी अक्कलकोट येथील न्यायाधीश एम. एन. कल्याणकर यांच्यासमोर हजर केले असता सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

ही घटना दि. १२ मार्च रोजी रात्री आठ ते साडे आठ वाजता फत्तेसिह मैदानाजवळ घडली. दरम्यान, याबाबत दि. १३ मार्चला पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल कांबळे, मंजुनाथ गुंजले, राजपाल निकम, अभिषेक डोणी, समीर पटेल, नागराज गुंडूर यांच्यासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हकीकत अशी की, फिर्यादी राजू उर्फ बाळासाहेब श्रीशैल वाघमोडे (रा. समतानगर, अक्कलकोट) हे फिरण्यासाठी फत्तेसिंह मैदानात गेले असताना आरोपी कारमधून (केए ५१ एमजे ०३३७) त्या ठिकाणी आले. फिर्यादी वाघमोडे यांच्याकडे १३ लाखांची खंडणी मागितली. तेव्हा खंडणी देण्यास नकार दिला म्हणून वाघमोडे यांना शिवीगाळ, दमदाटी करून गाडीत घालून डांबून त्यांचे अपहरण केले. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यातील पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तत्काळ चक्रे फिरवून तीन तासांत वागदरीजवळ कार पकडली. तेव्हा सहा आरोपींना ताब्यात घेऊन वाघमोडे यांची त्यांच्या तावडीतून सुटका केली. शोध पथकात पीएसआय पांडुरंग पवार, हवालदार शिवलिंग स्वामी, श्रीकांत जवळगे, प्रमोद शिंपाळे, केदारनाथ सुतार, धोंडिबा ठेंगळे यांनी कामगिरी बजावली. त्यात सहा जणांना अटक करण्यात आली. मुख्य आरोपी पांडुरंग उर्फ पांड्या शिंदे याच्यासह आणखी एकजण मिळून आला नाही. कोर्टासमोर हजर केले. पुढील तपास पोसई पवार हे करीत आहेत. आरोपीकडून ॲड. विजय हर्डीकर, तर फिर्यादीकडून सरकारी वकील गिरीश सरवदे यांनी काम पाहिले.

**हत्याराच्या भीतीने कोणीच पुढे आले नाहीत**

फिर्यादीचे पती फत्तेशिह ग्राउंडवर गजबलेल्या माणसांच्या गर्दीत मला वाचवा ओ वाचवा वाचवा असे ओरडत होता. हत्याराच्या भीतीने कोणीच पुढे आले नाही. कर्नाटकातील या गुंडाने महाराष्ट्रात येऊन भर रस्त्यावरून उचलून घेऊन गेले. अक्कलकोटमध्ये पहिल्यांदाच असा अपहरण प्रकार घडल्याने जनतेमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# नेत्रतपासणसह मोतीबिंदु शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिर

**श्रीगुरु जडेय शांतलिंगेश्वर सदभक्ताचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १६ मार्च-**

परमपुज्य मौन तपस्वी श्री गुरु जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी सदभक्ताच्या वतीने २० मार्च रोजी ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समाधान मेळा अक्कलकोटचे अध्यक्ष बसवराज माशाळे सचिव कांतू धनशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिवकुमार कापसे, दत्तकुमार साखरे, प्रमोद लोकापुरे, शेखर आडवितोटे, बाळकृष्ण म्हेत्रे, श्रीकांत झिपरे, ओंकार उटगे, राजू मलंग, अभिजित लोके आदींची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सुहास माने, सिव्हिल सर्जन सोलापूर डॉ. अशोक राठोड, नेत्र शल्य चिकित्सक डॉ. नविन जिवने, डॉ. गणेश इंदुरकर, डॉ. करजखेडे. डॉ. जयश्री खिस्ते, डॉ. रविंद्र बनसोडे, डॉ. क्षिरसागर, डॉ. सुशांत अल्हट, डॉ. नबिलाल नदाफ, डॉ. शफीया नदाफ, नेत्र चिकित्सा अधिकारी महेश हिरेमठ जमादार राजु मलंग विनायक कुलकर्णी, दिपक बनाळे आदि वैदयकीय तज्ञ नेत्र तज्ञ मान्यवर शिबिरात सहभागी होणार आहेत यामुळे शिबिराचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन समाधान मेळा अध्यक्ष बसवराज माशाळे यांनी केले आहे.

# बुंजकरवस्ती शाळेसाठी इनरव्हील क्लबकडून दीड लाखांची मदत



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ मार्च-**

जि.प.प्रा.शाळा बुंजकरवस्ती येथे हॅप्पी स्कूल प्रोजेक्ट अंतर्गत शाळेच्या शिक्षिका स्मिता शिंदे-गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून इनरव्हील क्लब ऑफ, सांगोला यांच्या वतीने तब्बल दीड लाख रुपयांची भरीव मदत मिळाली. या प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. उद्घाटन सोहळ्यास शाळेच्या शिक्षिका स्मिता शिंदे -गायकवाड, सारिका गवसने, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजली बुंजकर, सुधीर बुंजकर, केंद्रप्रमुख सांगोला अस्लम इनामदार, शिरभावी पावले, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष स्वाती अंकलगी, सदस्य माधुरी गुळमिरे, प्रतिमा माळी, अरुणा घोंगडे, स्वाती ठोंबरे, संगीता चौगुले, अनिता कमले, विजया बनसोडे, सीमा कुलकर्णी उपस्थित होते. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, विस्तार अधिकारी कुमठेकर, भंडारी, वाढेगाव केंद्रप्रमुख मठपती यांनी विशेष कौतुक करत इनरव्हील क्लब ऑफ सांगोला, अध्यक्षा स्वाती अंकलगी व सर्व सदस्य तसेच शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि सर्व मान्यवरांना मनःपूर्वक धन्यवाद दिले.

या मदतीतून शाळेच्या अंगणात पेविंग ब्लॉक बसविणे, भिंतींना आकर्षक रंगरंगोटी व बोलक्या भिंती तयार करणे, पाण्याची टाकी व नळाची सुविधा उपलब्ध करणे, डिजिटल वर्ग खोल्या आणि माहितीपर बोलक्या पताका लावणे असे भरीव कार्य करण्यात आले. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक आणि प्रेरणादायी शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

# वैरागमध्ये कर्तबगार महिलांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि १६ मार्च-**

वैराग येथे एकता महिला मंचच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त कर्तबगार महिला पुरस्कार २०२५ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे तसेच सहाय्यक पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे , राणी एकंबे , ज्योती खेंदाड, सुचिता कासार, चेतन पाटील, दिलीप खेंदाड, प्रभाकर क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थीतीत वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमांमध्ये विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा मध्ये प्रथम क्रमांक वनमाला कोळी, द्वितीय क्रमांक भाग्यश्री चव्हाण, तृतीय क्रमांक दिपाली गरड, संगीत खुर्ची मध्ये प्रथम क्रमांक अस्मिता सुरवसे द्वितीय क्रमांक अश्विनी कळम, तृतीय क्रमांक वनमला कोळी, लिंबू चमचा मध्ये प्रथम क्रमांक सारिका गायकवाड, द्वितीय क्रमांक अश्विनी कळम, तृतीय क्रमांक सुशीला सोनवणे, बॅलन्स राखणे मध्ये प्रथम क्रमांक जोती कुंभार, द्वितीय क्रमांक सविता बागल, तृतीय क्रमांक भाग्यश्री चव्हाण या विजेत्यानां प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी पुरस्कार प्राप्त शालन दसवंत, मनीषा सुतार, वैष्णवी सुरवसे, रीना गुरव, सविता दसवंत, शितल काजळे, उज्वला चव्हाण, मैना सोनवणे, सरस्वती चादरे, पद्मा महाडिक, दिपाली काजळे, सरस्वती नाईकवाडी, सुजाता भड, माधवी पाटील, चित्रा गायकवाड, मंगल इंगळे, सारिका गायकवाड, सविता बागल, सुप्रिया गायकवाड, अस्मिता सुरवसे, रुक्मिणी गरड, आसमा गडकर, मनीषा गायकवाड, दिलशाद गडकर, सरस्वती गायकवाड, नुरजहाँ शेख, एकलाज शेख, संगीता क्षीरसागर, मैनाबाई जाधव, राणी गरड, दिपाली गरड, संगीता गरड, कमल वाघमोडे, सविता आपुणे, ज्योती आपुणे, सीमा चव्हाण, ज्योती टोनगे, शीला घेमाड, वर्षा नलवडे, शालन खळदकर, जयश्री जाधव, सुशीला सोनवणे, दैवशाला पालखे, पुनम गिराम, रेश्मा मेटे, रुक्मिणी बनसुडे, सोनाली शिंदे, जयश्री झोरी, सीना भोसले इ महिलांना पुरस्कार वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहकार्य केले आशा एकता महिला मंचच्या शितल सुरवसे, एकता महिला मंचच्या तालुका सचिव जास्मिन शेख, एकता महिला मंचच्या तालुका प्रसिद्ध प्रमुख तेजश्री घेमाड, लक्ष्मी सुतार, वनिता जगझाप, हेमा कावरे, रत्नमाला कोळी, मथुरा दसवंत,मोहिनी मेटे यांनी केले. तालुक्यातून सदस्या मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक तसेच आभार शितल सुरवसे यांनी मानले.

# डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळीकडून वटवृक्ष मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची मासिक सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ मार्च-**

सद्गुरु चैतन्यस्वरूप अण्णा लिमये यांच्या श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत पदयात्रा, जप, नामस्मरण, मानसपुजा, कीर्तन, भजन, गायन या सेवेत, अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामीसेवकांसाठी मनोरंजनाचे हक्काचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून अक्कलकोट मासिक कीर्तन सेवेचे आयोजन येथीलश्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी हो गृप आणि डोंबिवली-बदलापूर स्वामीभक्त मंडळी चे सोमदत्त आसोलकर करत आलेले आहेत.



अक्कलकोट स्वामींच्या १२२ व्या मासिक कीर्तन सेवेदरम्यान मार्च महिन्याचा जप, नामस्मरण, मानसपूजा आणि कीर्तनसेवा सकाळच्या सत्रात पार पडली. सूत्रसंचालन भरत डिंगोरकर आणि संतोष रहाटे यांनी केले. श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील महाराजांच्या नैवेद्य आरतीनंतर १२२ वी मासिक कीर्तन सेवा ह.भ.प.मंदार बुवा व्यास, डोंबिवली यांच्या नारदीय कीर्तनाने संपन्न झाली. तबला वादक सुनील शेलारसर, अंबरनाथ व हार्मोनियमवर मयूर स्वामी, यांनी कीर्तनकारांना उत्तम साथसंगत केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांचा मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन इंगळे यांनी सन्मान केला.

यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी,

प्रथमेश इंगळे, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, सागर गोंडाळ, रवीराव महिंद्रकर यांच्यासह भावीक भक्त उपस्थित होते.

# सह्याद्री फार्मसीचे श्रमसंस्कार शिबीर उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ मार्च-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला यांचे दोन दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मांजरी यागावी करण्यात आले होते. ते विविध सामाजिक उपक्रमाने उत्साहात संपन्न झाले. त्यास विद्यार्थी,नागरिक, पालकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. या शिबिराचे उदघाटन सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाले. त्यांनतर जि.प.प्रा.शाळा मांजरी मधील सर्व विद्यार्थ्यांचे रक्त गट चाचणी व हेल्थ चेकअप कॅम्प घेण्यात आले. त्यास महालॅब्स व त्यांचे सर्व अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना विविध रोगांची माहिती देऊन आरोग्य जागृती केली. दुपारच्या सत्रात संपूर्ण शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला. गाव परिसर स्वच्छतेने दुसऱ्या दिवसाच्या सकाळच्या सत्राची सुरवात झाली. तसेच शाळेशेजारी व गावात विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे आठवडा बाजारासाठी उपस्थित सर्व नागरिक, ग्राहक व व्यापारी यांना विविध रोग त्यांचा प्रसार, कारण व त्यावरील उपचारपद्धती याविषयी संपूर्ण माहिती दिली. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या दोन दिवसीय शिबिरामधील विविध उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले. शिबिराचे सूत्रसंचलन प्रा.एस.पी.जोकार यांनी केले.

# इतिहास संशोधन मंडळाचे अधिवेशन संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

सोलापूर इतिहास संशोधन मंडळ माऊली महाविद्यालय वडाळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च रोजी माऊली महाविद्यालयात राष्ट्रीय इतिहास परिषद १८ वे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले.



सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष भोसले यांनी अधिवेशनाची भूमिका स्पष्ट केली. उद्घाटन मोहोळचे आमदार राजाभाऊ खरे यांच्या हस्ते झाले. मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय गायकवाड यांनी आपल्या अधिवेशनाची कार्यप्रणाली स्पष्ट केली. प्रमुख वक्ते डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी इतिहासाचे आजच्या काळातील स्वरूप मांडताना भारतीय इतिहासाचा यथायोग्य अभ्यास झाला पाहिजे आणि त्याची मांडणी केली पाहिजे असे मत मांडले. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम (काका) साठे यांनी अध्यक्षीय भाषण केले. उद्घाटन सत्रामध्ये विद्यापीठाचे सिनेट सदस्य सचिन गायकवाड, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. विष्णू वाघमारे, सिनेट सदस्या प्राचार्य डॉ. वैशालीताई साठे, इतिहास संशोधन मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे, प्राचार्य सोपानराव जावळे त्याचप्रमाणे बीजभाषक अमरावती विद्यापीठातील प्रा.डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात बीजभाषक म्हणून लाभलेले संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संतोष बनसोड यांनी इतिहासातील नवदृष्टिकोन मांडला. या सत्राचे अध्यक्ष प्राचार्य सोपान जावळे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. तिसऱ्या सत्रामध्ये विविध संशोधकांचे पेपर वाचन झाले. या राष्ट्रीय परिषदेला आठ राज्यातील संशोधकांनी आपला सहभाग नोंदवला. यामध्ये डॉ. अमिता जावळे, कल्याण श्रावस्ती, वैशाली डौले इत्यादींनी संशोधन पेपरचे वाचन केले. डॉ.रविकिरण जाधव, डॉ. किशोर थोरे, प्रा.डॉ. शिवाजी वाघमोडे, डॉ. मनोज कसबे,प्रा. डॉ. राजेंद्र गायकवाड, डॉ. किशोर जोगदंड यांनी सत्राध्यक्षाची भूमिका पार पडली. अधिवेशनाच्या समारोपात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी मानवाच्या जीवनातील इतिहासाचे महत्व सांगितले. संचालिका वैशालीताई साठे यांनी इतिहासा विषयी आपली भूमिका मांडली. प्रास्ताविक डॉ. विकास शिंदे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. परमेश्वर हाटकर, प्रा. डॉ. परमेश्वर सूर्यवंशी डॉ. बिरादार मॅडम, डॉ.पाटील यांनी केले. प्रक्षेपण प्रा. डॉ. सतिश घोरपडे यांनी केले.संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे , जयदीपराजे साठे, समन्वयक डॉ. बालाजी गंगावणे, हसचिव प्रा. डॉ. दिगंबर वाघमारे, खजिनदार डॉ. किशोर थोरे, सदस्य प्रा..डॉ. टी एन शिंदे, प्रा.. डॉ.मनोज कसबे,डॉ.अशिष रजपूत, डॉ. अमिता जावळे इत्यादी उपस्थित होते.

# सोजर फार्मसीत राज्यस्तरीय शिक्षक विकास कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ मार्च**

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी येथे आधुनिक अध्यापन तंत्रज्ञानावर भर देणारा कटिंग-एज पेडागॉजी: लर्निंग ॲनिमेशन, इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टूल्स अँड डिजिटल मीडिया फॉर एज्युकेटर्स हा राज्यस्तरीय एकदिवसीय शिक्षक विकास कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यशाळेत अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसीचे डिप्लोमा विभागप्रमुख प्रा. शशिकांत उपाध्ये यांनी प्रमुख वक्ते म्हणून आधुनिक अध्यापन पद्धती, डिजिटल मीडिया आणि संप्रेषण साधनांचा प्रभावी उपयोग कसा करावा, यावर मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत कौशल्याधारित शिक्षण आणि शिक्षकांच्या भूमिकेतील परिवर्तन यावर विशेष भर दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. सुजित करपे होते. प्रा. डॉ. शशिकांत मोडेकर यांनी समन्वयन केले. यामध्ये राज्यभरातून ९० हून अधिक प्राध्यापकांनी तसेच ५ नामांकित फार्मसी कॉलेजच्या प्राचार्यांनी सहभाग घेतला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. करपे यांनी २१ व्या शतकातील शिक्षणाच्या गरजांनुसार पारंपरिक अध्यापन पद्धतींमध्ये बदल करण्याची निकड आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर




यावर भर दिला. सूत्रसंचालन प्रा. शुभम मगर यांनी केले. डॉ. सिद्धार्थ देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह प्रा. शिवाजी पाटील, प्रा. मंदार जोशी, दिनेश स्वामी आणि असिफ अत्तार यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले आणि सचिव कल्पनाताई बारबोले यांनी टीमचे अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आले एकदाचे परतीचे वाहन!!!


## स्पेस स्टेशनवर पोहोचले नासाचे स्पेसक्राफ्ट

### १९ मार्च रोजी परतणार सुनीता विलियम्स

### नऊ महिन्यांनंतर चेहऱ्यावर फुलले हसू

◆ **न्यूयॉर्क, १६ मार्च**


एलन मस्क यांची कंपनी स्पेसएक्सचे अंतराळयान ड्रॅगन सुमारे २८तासांनंतर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले. रविवारी ते भारतीय वेळेनुसार सकाळी ९.४०वाजता डॉक झाले आणि हॅच सकाळी ११.०५वाजता उघडले. हे अंतराळयान नऊ महिन्यांपासून अंतराळ स्थानकात अडकलेल्या भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना पृथ्वीवर परत आणणार आहे.



अंतराळ केंद्रावर उतरत असलेले नासाचे यान

चार सदस्यांच्या पथकात नासाच्या अंतराळवीर ॲनी मॅलेन आणि निकोल आयर्स, जपानचे ताकुया ओनिशी आणि रशियाचे किरिल पेस्कोव्ह यांचा समावेश आहे. या अंतराळवीरांनी शनिवारी भारतीय वेळेनुसार दुपारी ४.३०वाजता स्पेसएक्सच्या फाल्कन ९ रॉकेटमधून उड्डाण केले. फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून त्याचे प्रक्षेपण करण्यात आले.

क्रू-१० अंतराळ स्थानकात पोहोचल्यानंतर आता तिथे उपस्थित असलेले क्रू-९ चे अंतराळवीर नासाचे निक हेग, सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर आणि रशियन अंतराळ संस्था रोसकॉसमॉसचे अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह ड्रॅगन अंतराळयानातून पृथ्वीवर परततील. हे चार अंतराळवीर १९ मार्चनंतर अंतराळ स्थानकावरून पृथ्वीकडे रवाना होतील. सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांनी बोईंगच्या स्टारलाईनर अंतराळयानातून प्रवास केला. हे अभियान फक्त आठ दिवसांचे होते; परंतु तांत्रिक बिघाडांमुळे त्यांना नऊ महिने अवकाशात राहावे लागले. (वृत्तसंस्था)



हिमाचल प्रदेशच्या चमोली जिल्ह्यात रविवारी सकाळपासून जोरदार बर्फवृष्टी झाली. यामुळे औलीच्या पर्वतीय भागांत बर्फाची जाड चादर पसरल्यासारखे दिसत होते

## हद्दपारीसाठी जुन्या कायद्याचा वापर बेकायदेशीर

### न्यायालयाच्या निर्णयाने डोनाल्ड ट्रम्प यांना धक्का

◆ **वॉशिंग्टन, १६ मार्च**

अमेरिकेतील स्थलांतरितांना वेगाने हद्दपार करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १८ व्या शतकातील कायद्याचा वापर करण्याची घोषणा केली होती. या कायद्याद्वारे व्हेनेझुएलाच्या काही नागरिकांना हद्दपार करण्यात आले. त्यानंतर काही तासांतच संघीय न्यायालयाने या कायद्याला बेकायदेशीर ठरवत याचा वापर करण्यावर बंदी घालण्याचा आदेश दिला.

अमेरिकेच्या कोलंबियातील जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जेम्स ई. बोसबर्ग यांनी शनिवारी सुनावणी करताना म्हटले की, स्थलांतरित नागरिकांना हद्दपार करण्यासाठी दोनशे वर्षे जुन्या कायद्याचा वापर करणे बेकायदेशीर आहे. आम्ही या कायद्याचा वापर करण्यावर तातडीने बंदी घालत आहो. प्रशासनाने यापुढे या कायद्यानुसार कारवाई करू नये.

ट्रम्प प्रशासनाकडून व्हेनेझुएलाच्या ३०० नागरिकांना ताब्यात घेऊन १८ व्या शतकातील कायद्यानुसार त्यांना हद्दपार केले तसेच त्यांची रवानगी साल्वाडोर आणि होफ्लडुरास येथे करण्यात आली.याविरोधात डोमोक्रेसी फॉरवर्डने न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. बोसबर्ग यांनी स्थलांतरितांची सुटका करण्यास नकार दिला; परंतु ज्या कायद्यानुसार त्यांना हद्दपार करण्यात आले, त्यावर बंदी घालत असल्याचा निर्णय दिला. अमेरिकेवर हल्ला करणाऱ्या व्हेनेझुएलाच्या ट्रेन डी अरागुआ या टोळीच्या सदस्यांवर कारवाई करण्यासाठी १७९८ मध्ये एलियन एनिमीज कायदा आणला होता. हा कायदा युद्धकाळात निर्वासितांवर कारवाई करण्यासाठी वापरण्यात येत होता. यामुळे सरकारला व्यापक अधिकार प्राप्त झाले होते. ट्रम्प यांनी या कायद्याचा वापर करीत हद्दपारीच्या कारवाईला वेग देण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या होत्या. मात्र, कारवाईच्या काही तासांतच न्यायालयाच्या आदेशाने प्रशासन तोफ्लडघशी पडले. (वृत्तसंस्था)

#### अमेरिकेच्या इतिहासात तीन वेळा वापर

अमेरिकेच्या इतिहासातयुद्धकाळातच या कायद्याचा वापर करण्यात आला. यापूर्वी दुसऱ्या महायुद्धादरम्यानजर्मन आणि इटालियन लोकांना तुरुंगात टाकण्यासाठी तसेच जपानी व अमेरिकन नागरिकांना सामूहिक नजरकैदेत ठेवण्यासाठी या कायद्याचा वापर करण्यात आला. आता ट्रम्प यांच्या निर्देशावरून व्हेनेझुएलाच्या नागरिकांना हद्दपार करण्यासाठी या कायद्याचा वापर केला, यावर न्यायालयाने आक्षेप घेतला.

## पती-पत्नीला स्वातंत्र्य, मर्यादाही आवश्यक : हायकोर्ट

### विवाहितेचे मित्रासोबत अश्लील चॅटिंग नवरा कसा सहन करणार?

◆ **भोपाळ, १६ मार्च**

लग्नानंतर पत्नीचे तिच्या मित्रासोबतचे अश्लील चॅटिंग पती सहन करू शकणार नाही, असे निरीक्षण मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने नोंदवले.आक्षेप असूनही पती अथवा पत्नी अशा कृती करीत राहिले, तर निश्चितच ते दुसऱ्या जोडीदारासाठी मानसिक क्रूरता ठरेल, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

उच्च न्यायालयाने अलिकडेच एका महिलेने तिच्या पतीच्या घटस्फोटाच्या अर्जाला परवानगी देण्याच्या कौटुंबिक न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध केलेले अपील फेटाळून लावले. कौटुंबिक न्यायालयाने क्रूरतेच्या आधारावर घटस्फोटाचा अर्ज मंजूर केला होता. या याचिकेवर सुनावणी करताना न्या. विवेक रुशिया आणि न्या. सिंह यांच्या खंडपीठाने लग्नानंतर पती किंवा पत्नी त्यांच्या मित्रांसोबत अश्लील चॅटिंग करू शकत नाहीत, असे म्हटले आहे.

**न्यायालयाने काय म्हटले?**

कोणताही पती त्याची पत्नी मोबाईलवर अश्लील चॅटिंग करीत आहे, हे सहन करणार नाही. लग्नानंतर पती-पत्नीला त्यांच्या फोनवर कोणाशीही गप्पा मारण्याचे स्वातंत्र्य आहे; परंतु ते कोणत्या प्रकारच्या गोष्टी बोलत आहेत, याची काळजी घेतली पाहिजे. तुमच्या बोलण्याची पातळी सभ्य असली पाहिजे. जेव्हा एक महिला एखाद्या पुरुषाशी बोलत असते किंवा एक पुरुष एखाद्या स्त्रीशी बोलत असते, तेव्हा तुमच्या संभाषणाची पातळी अधिक सभ्य असली पाहिजे. तुमचे शब्द असे असले पाहिजेत की, तुमच्या जोडीदाराला त्यावर कोणताही आक्षेप नसावा. आक्षेप असूनही पती किंवा पत्नी अशा गोष्टी बोलत राहिले, तर ते निश्चितच दुसऱ्या जोडीदारासाठी मानसिक क्रूरतेला कारणीभूत ठरेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## हार्वर्डच्या विद्यार्थ्यांसमोर 'लेक्चर' देणार लालू!

◆ **पाटणा, १६ मार्च**

बिहारचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालू प्रसाद यादव यांना हार्वर्ड विद्यापीठाने मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

लालूप्रसाद यादव यांना हार्वर्डच्या विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान द्यायचे आहे. लालूंनी भारतीय रेल्वेची स्थिती कशी बदलली, याविषयी हे व्याख्यान असणार आहे. लालू यादव हे सध्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात जामिनावर बाहेर आहेत.

या व्याख्यानाच्या निमंत्रणावर जदयूच्या खासदारांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. खासदार संजय कुमार झा यांच्या मते, रेल्वेची स्थिती लालू यादव रेल्वेमंत्री असताना नव्हे, तर जदयूप्रमुख आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार रेल्वेमंत्री असतानाच्या काळापासून बदलली. (वृत्तसंस्था)

## हवालाचे १७ लाख जप्त, दोन अटकेत

### पंजाब पोलिसांची कारवाई, ड्रग्ज तस्करीशी संबंध

◆ **चंदीगड, १६ मार्च**

पंजाब पोलिसांनी ड्रग्ज तस्करीशी संबंधित कारवाई अंतर्गत दोन हवाला ऑपरेटर्सला अटक केली. त्यांच्याकडून १७ लाख रुपये रोख, एक लॅपटॉप जप्त केला. बेकायदेशीर आर्थिक व्यवहाराला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, मागील आठवड्यात एका कारवाईत जप्त करण्यात आलेल्या ५६१ ग्रॅम ड्रग्जच्या संदर्भात चौकशी करीत असताना अमृतसर ग्रामीण पोलिसांना हवाला प्रकरणीत अटक करण्यात आलेले आरोपी सुखजीत सिंग आणि रणबीर सिंग ड्रग्ज तस्करीत सहभागी असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यावरून त्यांच्या घरावर छापा टाकला असता, हवालाचे १७ लाख कोटी जप्त करण्यात आले.

आरोपी ड्रग्ज पुरवठा टोळीचे सदस्य असून, ते बेकायदेशीर आर्थिक व्यवहार करीत असल्याची माहिती तपासात समोर आली. दोन्ही आरोपी हवाला ऑपरेटर्स आहेत. त्यांच्यावर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. दोन्ही आरोपी ड्रग्ज तस्करीमध्ये सहभागी होते. याच प्रकरणात पोलिस तपास करीत असताना ते हवालामध्येही सहभागी असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी आणखी आरोपी अटक होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

## अमेरिकेत ताशी १३० किमी वेगाने धडकली २६ वादळे

### ३६ जणांचा मृत्यू

### दहा कोटी लोक प्रभावित

◆ **न्यू यॉर्क, १६ मार्च**

अमेरिकेत अर्कांसस, कॅन्सस, मिसूरी, इलिनॉयसह पश्चिमेकडील सहा राज्ये चक्रीवादळाच्या विळख्यात आहेत. एबीसीच्या अहवालानुसार, या राज्यांमध्ये आतापर्यंत २६ वादळे आली आहेत. यात शनिवार आणि रविवारी ३६ जणांना आपला जीव गमवावा लागला. मिसूरीमध्ये सर्वाधिक १२ मृत्यू झाले आहेत. १० कोटी अमेरिकन लोकसंख्येवर याचा परिणाम झाला आहे. २ लाख घरे अंधारात लोटली आहेत.



कॅन्ससमध्ये धुळीच्या वादळामुळे महामार्गावर सुमारे ५० वाहने एकमेकांवर आदळली. यात आठ जणांचा मृत्यू झाला. मिसिसिपीमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण बेपत्ता झाले.

ताशी १०० किमी वेगाने धुळीचे वादळ वाहत आहे. इमारती आणि रस्ते उद्ध्वस्त झाली आहेत. कॅनडाच्या सीमेवर हिमवादळे आणि उष्ण भागात वणवा पेटण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील वादळ अंदाज केंद्राने असा दावा केला आहे की, हे वेगाने वाहणारे वादळ गंभीर धोका निर्माण करू शकतात. आज अनेक राज्यांमध्ये बेसबॉलच्या आकाराच्या गारा आणि वादळ देखील शक्य आहे.

पूर्व लुईझियाना, मिसिसिपी, अलाबामा, पश्चिम जॉर्जिया आणि फ्लोरिडामध्ये चक्रीवादळाचा इशारा देण्यात आला आहे. टेक्सास, कॅन्सस, मिसूरी आणि न्यू मेक्सिको हे जंगलातील आगींचा धोका आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'हप्पू की उलटन'मध्ये उर्मिला शर्माचा प्रवेश



**मुंबई** : दिग्गज टीव्ही अभिनेत्री उर्मिला शर्मा ॲण्ड टीव्हीवरील 'हप्पू की उलटन पलटन' मालिकेत प्रवेश करणार आहे. मालिकेत त्या राजेशची आई आणि दरोगा हप्पू सिंगच्या सासूच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्या प्रवेशाने घरात विनोदी गोफ्लधळ निर्माण होणार आहे. याविषयी उर्मिला शर्मा म्हणाल्या की, माझा प्रवेश हप्पूच्या घराला रणांगणामध्ये बदलेल, जेथे एक टीम हप्पूच्या कटोरी अम्माला पाठिंबा देईल, तर दुसरी टीम राजेशच्या अम्माला पाठिंबा देईल. दमदार व्यक्तिमत्त्व, बुद्धिकौशल्य आणि कधीच शांत न होणारी भूक अशी वैशिष्ट्ये या भूमिकेची आहेत.

### 'दंगल'साठी अदितीला मिळाला होता नकार



**मुंबई** : अभिनेत्री अदिती पोहनकरने यापूर्वी आमिर खानच्या 'दंगल चित्रपटासाठी ऑडिशन दिले होते; परंतु तिला नाकारण्यात आले. अलिकडेच अभिनेत्रीने एका मुलाखतीत खुलासा केला की, 'दंगलसाठी तिने केलेली तयारी 'आश्रम' या वेब सीरिज दरम्यान कामी आली. 'दंगल हा चित्रपट महावीर सिंह फोगट आणि त्यांच्या मुली गीता व बबिता फोगट यांच्या कथेवर आधारित होता. या चित्रपटासाठी ऑडिशन देण्यापूर्वी आदिती पोहनकर कुस्ती शिकत होती. हरियाणवी बोलीभाषेसोबतच ती कुस्तीच्या सर्व युक्त्या आजमावत होती; पण तिला या चित्रपटात काम करता आले नाही.

### एकाकी जीवन जगणाऱ्या राखीचे पुनरागमन?



**मुंबई** : वाढत्या वयामुळे किंवा काम मिळत नसल्याने अनेक जुने कलाकार आता एकाकी जीवन जगत आहेत. काहींचे कुटुंब सोबत आहेत. काही एकट्यानेच जीवन कंठत आहेत. अभिनेत्री राखीही एकाकी जीवन जगणाऱ्यांपैकी आहेत. तीन दशकांपर्यंत हिंदी सिनेसृष्टी गाजवणाऱ्या राखीने १९६७ मध्ये सिनेजगतात पदार्पण केले. २००३ पासून त्या या जगापासून लांब राहताहेत्. २००९ ते २०१९ या दरम्यान त्यांनी काही सिनेमात काम केले. आता आमर बॉस या सिनेमात त्या काम करणार, अशी चर्चा आहे. हा बंगाली सिनेमा असून, येत्या १६ मे रोजी प्रदर्शित होत आहे. यात नंदिता रॉय आणि शिबोप्रसाद मुखर्जी यांच्या मुख्य भूमिका आहेत.

## चिल्लरचे आता करायचे काय?

देशात कमी किमतीच्या चलनाला अर्थात्? पैशाला किंमत राहिलेली नाही. रिझर्व्ह बँककडून अधिकृत असलेले ५० पैशांचे चलन केवळ नावापुरतेच उरले असून, त्याचा वापर करणे ग्राहकांनी बंद केले आहे. असे असले तरी, देशात ५० पैशांची तब्बल १,४७,८८० लाख नाणी पडून असून, त्याची एकूण किंमत ७०० कोटी रुपये असल्याचे आरबीआयच्या आकडेवारीतून समोर आली आहे.

**७०० कोटींची चिल्लर बिनकामाची**


२५ पैशांची नाणी ३० जून २०११ पासून चलनातून बाद करण्यात आली असून, ती आता कायदेशीर चलन राहिलेली नाहीत. २५ पैशांपेक्षा कमी मूल्याच्या नाण्यांचा वापर यापूर्वीच थांबवण्यात आला होता.

### ५० पैशांचे काय होणार?



५० पैसे वैध असले तरी, त्याचा रोख व्यवहार शून्यावर आला आहे. व्यापारी आणि ग्राहक ही नाणी स्वीकारत नाहीत. डिजिटल पेमेंट आणि यूपीआय व्यवहारांमुळे नाण्यांची किंमत आणखी कमी झाली आहे. आरबीआयने ही नाणी परत घेतल्यास तब्बल ७०० कोटींची रक्कम बँकिंग प्रणालीत परत येऊ शकते.

### कोणत्या नाण्याला किंमत जास्त?



सध्या चलनात १ रुपयाचे कॉईन बाजारात सर्वाधिक आहे. यानंतर २ रुपयाचे कॉईन बाजारात आहेत. असे असले बाजारात ५ रुपयांच्या नाण्याची किंमत सर्वाधिक आहे. १०,७५३ कोटी रुपये किमतीची २,१५,०५८ नाणी चलनात आहेत. चलनातून बाद केलेल्या २ हजार रुपयांच्या ०.३३ कोटी नोटा बाजारात असून, त्याचे मूल्य ६,४७१ कोटी रुपये आहे. त्यामुळे या नोटा आरबीआय पुन्हा कशा मिळवणार हा प्रश्नच आहे.

## पतंजलीचे विमा व्यवसायात पदार्पण

विविध उत्पादनांमध्ये अग्रेसर असणाऱ्या पतंजली समूहाने आताविमा क्षेत्रात पदार्पण केले आहे. अदर पूनावाला यांनी मॅग्मा इन्शुरन्समधील त्यांचा हिस्सा पतंजली आयुर्वेद आणि रजनीगंधाचे निर्माता धर्मपाल सत्यपाल समूह (डीएस ग्रुप) यांना ४,५०० कोटी रुपयांच्या मोबदल्यात विकण्याची घोषणा केली. या व्यवहारामुळे मॅग्मा इन्शुरन्सच्या





मालकीच्या रचनेत लक्षणीय बदल झाला असून, या व्यवहारापश्चात पतंजली आणि डीएस ग्रुपकडे या कंपनीचा ९८ टक्के हिस्सा धारण करणार आहेत.

मॅग्मा जनरल इन्शुरन्सची मालकी अदर पूनावाला आणि रायझिंग सन होल्डिंग्ज यांच्याकडे आहे. पतंजली आयुर्वेद आणि डीएस समूहासोबतच्या समभाग खरेदी करारानुसार, सनोती प्रॉपर्टीजने सेलिका डेव्हलपर्स आणि जग्वार ॲडव्हायझरी सर्व्हिसेससह त्यांची विमा उपकंपनी मॅग्मा जनरल इन्शुरन्सची (पूर्वीची मॅग्मा एचडीआय जनरल इन्शुरन्स कंपनी) विक्री करण्यास मान्यता दिली आहे, असे प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. हा करार नियामक मंजुरीच्या अधीन असून, सुमारे ४,५०० कोटी रुपयांच्या मूल्यांकनावर पार पडला आहे, असे त्यात म्हटले आहे. मॅग्मा जनरल इन्शुरन्स ही विविध श्रेणींमध्ये सामान्य विमा क्षेत्रातील ७० हून अधिक उत्पादनांसह सेवा देते.

## कर्मचाऱ्यांना माणसांसारखे वागवा

### नारायण मूर्ती यांचा कंपन्यांना सल्ला

इन्फोसिसचे संस्थापक एन. आर. नारायण मूर्ती यांनी व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या कर्मचाऱ्यांशी माणसांसारखे वागण्याचे आवाहन केले आहे. कंपन्यांमधील सर्वांत कमी आणि सर्वाधिक पगारातील फरक देखील कमी केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. टीआयई कॉन मुंबई २०२५ मध्ये टीआयई मुंबईचे संस्थापक अध्यक्ष हरीश मेहता यांच्याशी झालेल्या संभाषणात मूर्ती यांनी हे सांगितले.

मूर्ती म्हणाले की, प्रत्येक कॉर्पोरेट कर्मचाऱ्याचा आदर आणि प्रतिष्ठा राखली पाहिजे. कर्मचाऱ्यांचे जाहीरपणे कौतुक केले पाहिजे आणि खाजगीत टीका केली पाहिजे. शक्यतोवर कंपनीचे सर्व फायदे तिच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये न्याय्य पद्धतीने वाटले पाहिजे.



येणाऱ्या काळात भारतातील गरिबी संपेल आणि विकास तेव्हाच होईल, जेव्हा देशातील व्यवसाय आणि उद्योजक भांडवलशाहीचा स्वीकार करतील. देश सध्याच्या समाजवादी मानसिकतेसह यशस्वी होऊ शकत नाही. भांडवलशाही लोकांना नवीन कल्पना घेऊन येण्याची संधी देते, जेणेकरून ते स्वतःसाठी आणि त्यांच्या गुंतवणूकदारांसाठी पैसे कमवू शकतील, नोकऱ्या निर्माण करू शकतील आणि अशा प्रकारे गरिबी कमी करू शकतील.

## पुरातन राजवाड्याचे होणार शानदार हॉटेल

त्रिपुरा सरकारने १०० वर्षे जुन्या पुष्पबंता पॅलेसचे जागतिक दर्जाच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये रूपांतर करण्यासाठी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडसोबत करार केला. राज्याचे मुख्यमंत्री माणिक साहा यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्याची माहिती दिली. पुष्पबंता पॅलेस येथे जागतिक दर्जाचे पंचतारांकित हॉटेल उभारण्यासाठी सरकार ताज समूहाच्या मालकीच्या आयएचसीएल या संस्थेसोबत पुढे जात आहोत.

देशातील अनेक राजवाड्यांचे रूपांतर ५ आणि ७ स्टार हॉटेलमध्ये झाले आहे. पण, आजही असे अनेक राजवाडे आहेत, जे या गोष्टीची वाट पाहत आहेत. अशाच एका १०० वर्षे जुन्या राजवाड्याचे चित्र आता बदलणार असून, येत्या तीन वर्षांत त्याचे पंचतारांकित हॉटेलमध्ये रूपांतर होणार आहे. याची जबाबदारी टाटा समूहाची हॉटेल कंपनी आयएचसीएलने म्हणजेच इंडियन हॉटेल कंपनी लिमिडेटने घेतली आहे.

**२५० कोटी होणार खर्च**



जागतिक दर्जाचे पंचतारांकित हॉटेल विकसित करण्यासाठी आयएचसीएलने प्रथमच राज्य सरकारसोबत सामंजस्य करार केला, असे साहा यांनी सांगितले. ताज पुष्पबंता पॅलेस असे या हॉटेलचे नाव असेल आणि येत्या तीन वर्षांत २५० कोटी रुपये खर्चून ताज ग्रुप या हॉटेलचा विकास करेल, असेही ते म्हणाले. मात्र, ताज ग्रुपकडून अद्याप कोणतेही वक्तव्य करण्यात आले नाही. टाटा समूहाने राजस्थानमधील हैदराबाद आणि उदयपूर येथील राजवाड्यांचे हॉटेलमध्ये रूपांतर केले आहे आणि ते यशस्वीरीत्या कामही करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# सीमांकनाबाबत आवई उठविण्यात काय हशील?

देशात सध्या लोकसभा मतदारसंघांच्या सीमांकनावरून दोन तट पडले आहेत. याबाबत सरकारी पक्षाचा एक गट असून, दुसरा गट विरोध करणाऱ्यांचा आहे. आजवर देशात चार वेळा मतदारसंघांचे सीमांकन करण्यात आलेले आहे. त्याबाबत त्यावेळी फारसे आक्षेप घेतले गेले नाहीत. मात्र यंदा सीमांकनालाच आक्षेप घेतले जाऊ लागले असून, यानिमित्ताने केंद्र सरकारच्या अधिकारांनाच आव्हान दिले जात आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ८२ नुसार प्रत्येक जनगणनेनंतर सीमांकन आयोगाचे गठन केले जाते. या आयोगाची दोन मुख्य कामे असतात. पहिले काम म्हणजे लोकसभा आणि राज्य विधानसभा मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्निर्धारण करणे आणि दुसरे काम म्हणजे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातींसाठी आरक्षित मतदारसंघांचे पुनर्निर्धारण करणे. संविधानातील कलम १७० अनुसार कोणत्याही राज्य विधानसभेत कमीत कमी ६० आणि अधिकाधिक ५०० मतदारसंघ राहू शकतात. प्रत्येक सीमांकनासाठी नजीकच्या जनगणनेचा आधार घेतला जातो. गेल्या ७७ वर्षांत केवळ चार वेळा मतदारसंघांचे सीमांकन झाले. पहिला सीमांकन आयोग १९५२ मध्ये गठित करण्यात आला, ज्यासाठी आयोगाने १९५१च्या जनगणनेचा आधार घेतला. दुसरा सीमांकन आयोग १९६३ मध्ये गठित करण्यात आला, ज्याने १९६१ च्या जनगणनेचा आधार घेतला. तिसरा सीमांकन आयोग १९७३ मध्ये गठित केला गेला. यावेळी १९७१च्या जनगणनेचा आधार घेतला गेला. चौथा सीमांकन आयोग २००२ साली गठित केला गेला, ज्यासाठी २००१ ची जनगणना आधार मानली गेली. सीमांकनात लोकसंख्येतील बदल लक्षात घेऊन देशातील प्रादेशिक मतदारसंघांच्या सीमा निश्चित केल्या जातात. सीमांकन आयोग स्वतंत्रपणे काम करतो आणि कुणाच्याही नियंत्रणापासून मुक्त असतो. संविधानानुसार, आयोगाचे निर्णय अंतिम असतात आणि निवडणूक अनिश्चित काळासाठी पुढे ढकलू शकणाऱ्या कायदेशीर आव्हानांपासून ते मुक्त असतात. सीमांकन आयोगाचा अहवाल लोकसभा किंवा राज्य विधानसभेत सादर झाल्यानंतर, त्या आदेशांमध्ये कोणतेही बदल करता येत नाहीत. संविधानाच्या कलम ८२ अंतर्गत, संसद सीमांकन कायदा मंजूर करते आणि भारताचे राष्ट्रपती हे कार्य पूर्ण करण्यासाठी सीमांकन आयोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वतंत्र उच्च-शक्तिशाली पॅनेलची नियुक्ती करतात. येत्या काळात होऊ घातलेल्या सीमांकनाला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यासह पंजाब सरकारने विरोध दर्शविला आहे. स्टॅलिन यांनी तर त्यांच्या भूमिकेला पाठिंबा मिळावा म्हणून किमान सात मुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. सीमांकन हा संघराज्यावर 'घोर हल्ला' आहे, जो लोकसंख्या नियंत्रण आणि सुशासन सुनिश्चित करणाऱ्या राज्यांना शिक्षा करतो, अशी स्टॅलिन यांची भूमिका आहे. त्यांनी याबाबत केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांना पत्र लिहिले आहे. उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिण भारतातील राज्यांची लोकसंख्यावाढ घटली असल्याने दक्षिणेतील मतदारसंघांच्या सीमांकनात दक्षिणेकडील राज्यांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांची संख्या घटेल, अशी भीती स्टॅलिन आणि त्यांच्या सहकारी पक्षांनी व्यक्त केली आहे. तथापि, त्यांनी व्यक्त केलेल्या चिंतेमध्ये तथ्याचा अभाव आहे. त्यासाठी सीमांकनाचा संविधानकर्त्यांचा उद्देश काय होता आणि त्याचे फायदे काय आहेत, हे जाणून घ्यायला हवे.

भारतातील पहिले सीमांकन १९५२ मध्ये करण्यात आले, त्यावेळी लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या जागा या प्रक्रियेद्वारे निश्चित केल्या गेल्या. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी लोकसभेच्या जागांची संख्या ४८९ होती. १९७१ च्या जनगणनेच्या आधारे शेवटचे सीमांकन १९७६ मध्ये झाले, त्यानंतर जागांची संख्या ५४३ पर्यंत वाढली. येत्या काळात लोकसंख्यावाढीमुळे देशातील एकूण मतदारांची संख्या वाढून आठशेच्या जवळपास जाण्याची अपेक्षा आहे. वाढत्या लोकसंख्येच्या आधारे वेळोवेळी मतदारसंघांच्या सीमा पुन्हा आखण्याच्या प्रक्रियेला सीमांकन म्हणतात. आपल्या लोकशाहीत लोकसंख्येचे योग्य प्रतिनिधित्व व्हावे आणि सर्वांना समान संधी मिळावी म्हणून हे केले जाते. म्हणून लोकसभा किंवा विधानसभा जागांचे क्षेत्र पुन्हा परिभाषित किंवा पुनर्निर्धारित केले जाते. मतदारसंघांच्या सीमांचे पुनर्निर्धारण का करायचे, याची कारणे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे देशातील निवडणूक प्रक्रिया अधिक लोकशाहीवादी बनविण्यासाठी सीमांकन आवश्यक आहे. प्रत्येक राज्यात कालांतराने लोकसंख्येत बदल होतात, त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला न जुमानता सर्वांना समान प्रतिनिधित्व मिळावे म्हणून मतदारसंघ पुन्हा निश्चित केले जातात. दुसरा मुद्दा म्हणजे वाढत्या लोकसंख्येनुसार मतदारसंघांचे योग्य विभाजन करणे हा देखील सीमांकन प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक वर्गातील नागरिकांना प्रतिनिधित्वाची समान संधी मिळावी हाही या प्रक्रियेचा महत्त्वाचा उद्देश आहे. तिसरा मुद्दा म्हणजे निवडणूकांमधील राखीव जागांचा मुद्दा प्रत्येक निवडणुकीत प्रकर्षाने उपस्थित केला जातो. त्यामुळे जेव्हा जेव्हा सीमांकन केले जाते तेव्हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातींचे हित लक्षात घेऊन राखीव जागा देखील निश्चित कराव्या लागतात. कोणी असा प्रश्न उपस्थित केला की जनगणना हा सीमांकनाचा आधार आहे का? तर त्याचे उत्तर हो असेच द्यावे लागेल. भारतातील सीमांकनाची संपूर्ण प्रक्रिया जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित आहे. लोकसंख्या सतत बदलत असल्याने आणि नवीन सीमांकनामुळे प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या अंदाजे समान राहण्याची खात्री होते, त्यामुळे या प्रक्रियेतून पुन्हा पुन्हा जावे लागते. जनगणनेत सरकारकडे अधिकृत आणि तपशीलवार डेटा उपलब्ध होतो, जो अचूक सीमांकनासाठी आवश्यक असतो. संविधानात अशी तरतूद आहे की प्रत्येक सीमांकनासाठी, जनगणनेतर नवीन डेटा वापरला जाईल. भारतातील सीमांकनाची ही परंपरा १९५१ च्या पहिल्या जनगणनेपासून सुरू झाली, जेव्हा संविधानानुसार पहिल्यांदाच सीमांकन आयोगाची स्थापना करण्यात आली.

लोकसभा आणि विधानसभेत लोकसंख्येच्या आधारावर संतुलित प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे हा सीमांकनाचा मुख्य उद्देश आहे. स्वातंत्र्यापासून भारतात ही प्रक्रिया सुरू आहे. भारतातील सीमांकन परंपरेचा पाया संविधान सभेने घातला. १९५० मध्ये जेव्हा भारत प्रजासत्ताक बनला, तेव्हा संविधान निर्मात्यांनी लोकसंख्येनुसार लोकसभा आणि विधानसभेच्या जागा निश्चित करण्याचा निर्णय घेतला. संविधानाच्या कलम ८२ आणि कलम १७० मध्ये ते समाविष्ट करण्यात आले. यासाठी, सीमांकन आयोग नावाची एक विशेष संस्था स्थापन करण्याची तरतूद देखील करण्यात आली.

मतदारसंघांच्या सीमांकनामध्ये अनेक अडचणी येतात. विविध मुद्दे उपस्थित करून आयोगाच्या कामकाजात अडथळे आणले जातात. मतदारसंघांचे सीमांकन विविध राजकीय पक्षांच्या विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या फायद्यासाठी केले जाते, असा आरोप होतो. यामुळे काही मतदारसंघ खूपच मोठे किंवा छोटे बनवले जातात. हे प्रामुख्याने पक्षांच्या राजकीय हितासाठी केले जाते या गैरसमजामुळे या प्रक्रियेला विरोध होतो. काही भागांमध्ये सीमांकन करताना धर्माचा प्राधान्याचा विचार केला जातो, असा समज करून देण्यात विरोधक यशस्वी ठरतात आणि त्यामुळे समाजात असंतोष निर्माण होतो. स्टॅलिन आणि प्रभृतींनी सीमांकनाला विरोध करण्याची हीच कारणे आहेत. पण सीमांकन आयोग ही स्वायत्त संस्था असून, ही संस्था निवडणूक आयोगाप्रमाणेच निःपक्षपणे काम करते. त्यांच्यावर कुठलाही दबाव नसतो, हे जाणून घेणाऱ्याची आवश्यकता आहे. आजवरची सीमांकने काँग्रेसच्याच राजवटीत झालेली आहेत. सीमांकन ही एक नियोजित आणि संवैधानिक प्रक्रिया आहे. यामुळे मतदारसंघांच्या असंतुलनामुळे काही राज्यांना दिलेले प्रतिनिधित्व वाढवण्यास किंवा कमी होण्यास मदत होईल. विशेष म्हणजे ही प्रक्रिया भारतीय संविधानाच्या अंतर्गत, स्वतंत्र आयोगाच्या शिफारशींनुसार पारदर्शकपणे केली जाणार असल्याने त्याबाबत किंतु-परंतु बाळगण्यात हशील नाही.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चीनच्या खर्चाने भारताला आव्हान!

चीनने अचानक आपल्या सरंक्षण खर्चात प्रचंड वाढ करीत भारतासाठी नवी डोकेदुखी तयार केली. भारत-चीन सीमेवरील स्थिती व दक्षिण चीन महासागरातील स्थिती या दोन पैलूंकडे लक्ष देत चीनने हा खोडसाळ निर्णय घेतला आहे.

चीनच्या डोक्यात आणि मनात लडाख सीमेवरील स्थिती आणि तैवान आपल्या ताब्यात घेण्याची त्याची सुप्त महत्त्वाकांक्षा या दोन बाबी असल्याचे त्याच्या या निर्णयावरून दिसून येते.

मागील आठवड्यात चिनी पंतप्रधानांनी देशाच्या सरंक्षण खर्चात वाढ करीत तो २३२ बिलियन डॉलर एवढा करण्याची घोषणा केली. 'शांततेचे रक्षण करण्यासाठी ताकदीची आवश्यकता असते' असे विधान चिनी पंतप्रधानांनी यावेळी केले. चीनने सरंक्षण खर्चात केलेली ही वाढ मागील वर्षाच्या तुलनेत ७.२ टक्के अधिक आहे. नवी शस्त्रास्त्रे विकसित करणे, सीमेवरील सैनिकी व्यवस्था बळकट करणे, सैनिकांचे प्रशिक्षण, टेहळणी करणे यासाठी ही रक्कम खर्च केली जाणार आहे. चीनच्या अखंडतेला धोका निर्माण होत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे चीनकडून वारंवार सांगण्यात येत आहे. चीनने सरंक्षण खर्चात वाढ करण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगितली असली तरी त्याचा मुख्य रोख भारत व तैवानकडे आहे ही बाब स्पष्ट झाली आहे.

**अमेरिका पहिल्या क्रमांकावर** : संरक्षणावर खर्च करण्यात अमेरिका पहिल्या क्रमांकावर असून, या देशाने चालू आर्थिक वर्षात ८९० बिलियन डॉलर एवढा खर्च करण्याचे ठरविले आहे. म्हणजे चीनच्या चौपट रक्कम अमेरिका आपल्या संरक्षणावर खर्च करणार आहे. यातही अमेरिकेने आपल्या नौदलावर सर्वाधिक खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेच्या विमानवाहक युद्धनौकांची लष्करी ताकद काही देशांच्या लष्करापेक्षा अधिक आहे. एक विमानवाहू युद्धनौका हे एक स्वतंत्र लष्करच असते आणि ते जगात कुठेही पाठविता येत असल्याने अमेरिकेने आपले नौदल बळकट करण्याचा निर्णय अनेक वर्षांपूर्वी घेतला आणि त्यासाठी सर्वाधिक रकमेची तरतूद केली जाते. त्यापाठोपाठ हवाई दलासाठी तरतूद करण्यात येते आणि सर्वांत कमी लष्करासाठी तरतूद करण्यात येते.

**चीन आणि भारत** : चीन आणि भारत हे दोन देश मात्र आपल्या पायदळावर अधिक रक्कम खर्च करीत असतात. कारण चीन व भारताला आपल्या सीमेवर शत्रूचा मुलाबला करावा लागत आहे. चीन-रशिया यांच्या सीमेवर अनेकदा चकमकी होत आल्या आहेत. दोन्ही देशांची सीमा फार मोठी आहे. शिवाय चीनला भारतावरही वचक ठेवावा वाटतो. म्हणून चीनने पायदळ बळकट करण्यावर भर दिला आहे. आणि भारताला तर पाकिस्तान नावाचा जणू शाप लाभला आहे. त्यात चीन व आता बांगलादेश यांचीही भर पडली आहे. स्वाभाविकच भारतालाही पायदळावर मोठी रक्कम खर्च करावी लागते.

**भारताचा खर्च** : भारताने यावर्षीच्या आपल्या अर्थसंकल्पात सरंक्षणासाठी ६.८१ लाख कोटी एवढी तरतूद केली आहे. यापैकी १.८० लाख कोटी नवी, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यावर खर्च होणार आहेत. यातील ७५ टक्के राशी देशातंर्गत शस्त्रखरेदीवर खर्च केले जातील तर २५ टक्के राशी शस्त्र आयातीवर खर्च केले जातील. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा शस्त्रास्त्रे आयात करणारा देश आहे हे येथे उल्लेखनीय.

भारताला आपल्या लष्करी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, दरमहा त्यांना दिला जाणारा शिधा यावर मोठी रक्कम खर्च करावी लागते. यासाठी ३ लाख ११ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून, ती मागील वर्षाच्या तुलनेत १०.२४ टक्के जादा आहे. या रकमेपैकी १ लाख १४ हजार कोटी रुपये शिधा खरेदी, इंधन खरेदी यावर खर्च होणार आहेत. सरंक्षण दलांव्यतिरिक्त भारतीय तटरक्षक दळ व सीमा सडक संघटन यांच्यासाठीही मोठी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. देशाचा सागरी किनारा सुरक्षित करणाऱ्या तटरक्षक दळासाठी ९६७६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे तर सीमा भागातील रस्त्यांचे जाळे बळकट करण्यासाठी ७१४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही राशी मागील वर्षाच्या तुलनेत ९.७४ टक्के जादा आहे.

**चीनचे उत्तर** : भारताने आपल्या अर्थसंकल्पात संरक्षणासाठी केलेली तरतूद पाहिल्यानंतरच चीनने आपल्या संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मानले जाते. अन्यथा आपली अर्थव्यवस्था कमजोर झाली असताना चीनकडून सरंक्षणावर एवढा मोठा खर्च केला जाईल असे अपेक्षित नव्हते.

**नाटोही आघाडीवर** : चीन, भारत या देशांनी आपापल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा निर्णय घेतला असतानाच, नाटो देशांनीही आपल्या संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेने युक्रेनचा शस्त्रपुरवठा थांबविण्याचा निर्णय घेतल्यानंतर ब्रिटनने आपल्या सरंक्षण खर्चात प्रचंड वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिटनच्या पंतप्रधानांनी आपल्या देशाच्या संसदेत या निर्णयाची घोषणा केली असून, ब्रिटन पाठोपाठ युरोपातील काही देशांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा संकेत दिला आहे. दरम्यान, अमेरिकेने युक्रेनचा शस्त्रपुरवठा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला असला तरी राष्ट्रपती ट्रम्प नाटो देशांसाठी बेभरवशाचे ठरले असल्याने नाटो देश आपल्या संरक्षण खर्चात वाढ करण्याचा निर्णय बदलणार नाही असे मानले जाते.

**नाटोची वाढ** : २०१४ मध्ये नाटो संघटनेतील देश आपल्या संरक्षणावर एकूण २५० बिलियन डॉलर एवढी रक्कम खर्च करीत होते. २०१४ मध्ये रशियाने क्रिमीया या युक्रेन लगतच्या भागावर कब्जा केला. त्यानंतर नाटो देशांनी आपल्या संरक्षण खर्चात वाढ करणे सुरू केले आणि २०२४ मध्ये नाटो देशांनी आपल्या संरक्षणावर ४३० बिलियन डॉलर एवढा मोठा खर्च केला.

**स्पर्धा रशियाशी** : २०२२ मध्ये युक्रेनशी युद्ध सुरू केल्यापासून रशियाने आपल्या संरक्षण खर्चात दरवर्षी वाढ करणे सुरू केले आहे. आता तर रशियाने आपल्या संरक्षण खर्चात मागील वर्षीच्या तुलनेत ४० टक्के एवढी वाढ केली आहे. रशियाचा संरक्षणावरील खर्च १५० बिलियन डॉलर एवढा आहे. मात्र, रशिया-युक्रेन यांच्या क्रयशक्तीची तुलना करता तो ४६० बिलियन डॉलर एवढा होतो. म्हणजे रशिया नाटो देशांच्या एकूण खर्चापेक्षा जादा खर्च आपल्या संरक्षणावर करीत आहे.

**शस्त्रस्पर्धा जोरात** : अमेरिका, चीन व रशिया हे तीन देश जगातील आपल्या संरक्षणावर सर्वाधिक खर्च करणारे देश मानले जातात. वास्तविक या देशांना अन्य देशांपासून धोका नाही. उलट या देशांपासून इतर देशांना धोका आहे. अमेरिकेमुळे कॅनडा, डेन्मार्क, मेक्सिको, पनामा हे देश चिंतेत आहेत, चीनमुळे भारत, तैवान, फिलिपाईन्स, जपान या देशांना धोका जाणवत आहे तर रशियामुळे सारा युरोप चिंताग्रस्त आहे. अमेरिका, रशिया, चीन यांनी अचानक वाढविलेल्या संरक्षण खर्चाने भारतासह अनेक देशांना आपल्या जनकल्याणाच्या योजनांना काही प्रमाणात तरी कात्री लावावी लागली आहे आणि तो निधी संरक्षणाकडे वळवावा लागला आहे.

**नवी चाल** : अमेरिकेने आपल्या संरक्षण खर्चात वाढ केली असताना, भारताने आपल्याकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रखरेदी करावी अशी मागणीच केली आहे. आजवर अशा बाबी गोपनीय पद्धतीने केल्या जात होत्या. ट्रम्प प्रशासन मात्र सारे काही उघडपणे करीत आहे. अमेरिकेच्या या मागणीवर भारताने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# शिवरायांचे समर्थ..!

**आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थविवेका।**
**येथे आळस करू नका। विवेकी हो।**

समर्थ रामदास स्वामींनी मानवी जीवनाचा हेतू आणि सार्थकता यांचे स्पष्टीकरण करताना, राष्ट्रहिताला अनुकूल अशा व्यावहारिकतेकडे प्रकाशझोत टाकत समाजाला संसार आणि परमार्थ यांच्या समतोल विचारांचा उपदेश केला आहे. भगवंताचे केवळ नामस्मरण करणारी भक्ती समर्थांना मान्य नाही. उलट भगवंतावर श्रद्धा ठेवून त्यांच्या स्मरणाच्या सातत्याने आपला वाट्याला आलेल्या कामांत कधीही खंड पडता कामा नये, असेही ते बजावतात. याच दृष्टिकोनातून विवेकी वृत्तीचा त्यांनी आग्रह धरला आहे. या विवेकाला ते 'राजकारण' असे संबोधतात. दासबोधात याचे विस्तृत स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. यातून समर्थांना अभिप्रेत असलेला राजकारण शब्दाचा अर्थ विस्ताराने स्पष्ट होतो. राजकारण हे एक शास्त्र आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्तेची स्पर्धा नाही. राजकारण एक पायाभूत विचार असून तो प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी अनुभवसिद्ध अशी मंत्रसूत्रे असतात. त्यानुसार राजकारणातील हालचाली करायच्या असतात. राजकारण करणाऱ्याला शत्रू व मित्र असतात. दोघांशी वागण्याबाबत निश्चित सूत्रे व संकेत असतात. यांचा उपयोग शिवछत्रपतींनी अचूक केलेला दिसून येतो, असे अभ्यासपूर्ण विवेचन 'हिम्मतबहाद्दर' या नावाने परिचित परशुराम चव्हाण या शिवचरित्र आणि दासबोधाच्या ज्येष्ठ अभ्यासकाने केले आहे. दासबोधातील समर्थ रामदासस्वामींचे राजकारण निरूपण आणि शिवछत्रपती स्वराज्य निर्मितीच्या कार्यात प्रकट केलेले प्रत्यक्ष व्यवहारचातुर्य यांचे एकत्रित चिंतन केले तर या दोन्हींत साम्य आहे, असे लक्षात येते. एकात तत्त्व आहे, तर दुसऱ्यात जसाच्या तसा व्यवहार आहे. यातून त्यांना असा प्रश्न पडतो की, यातील तत्त्व आधी आणि त्याला अनुसरून व्यवहार केला गेला की, आधी व्यवहार आला मग त्यातून तत्त्व निर्माण झाले? या सर्वांचा निष्कर्ष असा की, स्वराज्य निर्मितीच्या पवित्र कार्यात अनुकूल ते मित्र आणि प्रतिकूल ते शत्रू, हे लक्षात ठेवून त्यांच्याशी वागताना जे व्यवहारचातुर्य वापरायचे आहे ते 'राजकारण' होय. या बाबतीत लोकसंग्रह करताना घ्यायची काळजी सांगताना समर्थ म्हणतात, 'एकांती चाळणा करावी। धारणा उदंड धरावी। नाना विचारणा करावी। अरिमित्रांची ॥' तसेच स्वराज्य निर्मिती कार्यात हातभार लावणाऱ्या मित्रांशी कसे वागायचे हे सांगून झाल्यावर शत्रूशी कसा व्यवहार करावा, याचाही स्पष्ट व परखड उपदेश समर्थ करतात,

**म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिसांचे माजले बंड।**
**या कारणे अखंड। सावधान असावे ॥**
**देवद्रोही तितुके कुत्ते। मारोनी घालावे परते।**
**देवदास पावती फत्ते। यदर्थी संशय नाही ॥**
**हुंब्यासी हुंबा लावून द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा।**
**लौंदास पुढे करावा। दुसरा लौंद ॥**
**धटासी आणावा धट। उद्धटासी उद्धट।**
**खटनटासी खटनट। अगत्य करी ॥**

मात्र हे सर्व करताना समर्थ म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु येथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे ॥' हे मुळीच विसरता कामा नये. शिवछत्रपतींचे क्षात्रतेज आणि समर्थांचे ब्राह्मतेज यांचा सुंदर मिलाफ होऊन त्यातूनच स्वराज्यनिर्मितीच्या ईश्वरी कार्याचे स्वप्न सत्यरूपात अस्तित्वात आले. हिम्मतबहाद्दर म्हणतात, श्री समर्थ शिवछत्रपतींचे राजगुरू होते, परंतु चंद्रगुप्तांचे गुरू असलेल्या चाणक्यांनी ज्याप्रमाणे मंत्रिपद घेऊन राज्यकारभार केला तसे समर्थांनी केलेले नाही किंवा भीष्म, अर्जुनाप्रमाणे सेनापतीत्वही केलेले नाही. परंतु राजकारणाच्या या दोनच कक्षा नाहीत. राजकारणात उपयोगी ठरणाऱ्या व प्रभाव गाजवणाऱ्या तीन शक्ती सांगितल्या आहेत. प्रवाह आणि उत्साह यांच्याइतकीच किंबहुना त्याहूनही अधिक श्रेष्ठ मंत्रशक्ती आहे. मंत्र म्हणजे मसलत, म्हणजेच राजकारण होय. मंत्रशक्तीचे सामर्थ्य तिच्या गुप्तपणातच वस्तुतः असते. समर्थ रामदास स्वामींचा गुप्तपणे राजकारण करण्यावर आणि आपल्या प्रचारकांनी गुप्तपणे साऱ्या कामाची उभारणी करण्यावर कटाक्ष होता, हे प्रसिद्धच आहे. मंत्रगुप्तीसंबंधी दक्षतेचे त्यांचे उद्‌गार असे,

**गुप्तरूपें केलें पाहिजे सर्वे। उदंड समुदाव करावे।**
**परि गुप्तरूपे। पाहों जातां। कोठेंचि नाही।**
**काय करितो तें कळेना। उदंड करी गुप्तरूपे।**
**जातें स्थळ तें सांगेना। सांगितले तेथें तरी जायेना।**
**आपुली स्थिती अनुमाना। येवोचि नेदी ॥**

शिवछत्रपतींच्या स्वराज्य विस्तारात प्रत्यक्षाप्रत्यक्ष सर्वतोपरी साह्य करणे व त्या ध्येयवादाने साऱ्या महाराष्ट्रीय जनतेची अंत:करणे भारून टाकणे, हा या 'मंत्रमुक्ती'चा उद्देश होता.

९८८१७१७८२९

## कानोसा


**अमोल पुसदकर**

# शिवाजी महाराजांची युद्धनीती

कालयवनाने ज्यावेळेस मथुरेवर हल्ला केला त्यावेळेस भगवान श्रीकृष्णांनी विचार केला की केवळ मला पकडण्यासाठी मथुरेवर हे हल्ले होत आहेत यामुळे प्रजेला बराच त्रास आहे. त्यामुळे मीच काहीतरी केले पाहिजे. याच्या इतक्या मोठ्या सैन्याशी लढा देण्यापेक्षा कालयवनाला त्याच्या सैन्यापासून दूर नेले पाहिजे व त्यानंतर त्याला मारले पाहिजे असा विचार भगवान श्रीकृष्णांनी केला. असा विचार करून भगवान श्रीकृष्ण रणांगणातून पळू लागले. त्यांना पळताना पाहून कालयवन त्यांच्या मागे मागे धावू लागला. ज्या ठिकाणी भगवान मुचकुंद ऋषी झोपलेले होते त्या गुहेमध्ये भगवान श्रीकृष्ण शिरले. त्यांनी आपले उत्तरीय वस्त्र मुचकुंद ऋषींच्या अंगावर टाकले व स्वतः तेथेच लपून बसले. ज्यावेळेस कालयवन तेथे आला त्याला असे वाटले की श्रीकृष्ण वस्त्र पांघरूण झोपलेला आहे. त्यामुळे त्याने झोपलेल्या मुचकुंद ऋषींना जागे केले. मुचकुंद ऋषींना असे वरदान होते की जो कोणी तुम्हाला झोपेतून जागे करेल त्याच्यावर दृष्टी पडल्यावर तो भस्म होईल. झालेही तसेच कालयवन भस्म झाला व लढाई न करता सुद्धा भगवान श्रीकृष्णांचा विजय झाला.

गनिमाच्या म्हणजे शत्रूच्या मनातील हेतू ओळखून त्याप्रमाणे आपली नीती ठरविणे यालाच गनिमी कावा असे म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनामध्ये त्यांनी जी युद्धनीती वापरलेली आहे ती गनिमी कावा म्हणून प्रसिद्ध झालेली आहे. ज्या नीतीमध्ये कमी संख्येच्या सैन्याने मोठ्या सैन्यासोबत लढाई मांडून एक तर त्यांचा पूर्ण पराभव करणे किंवा त्यांना हानी पोहोचवून पळ काढणे या गोष्टी अंतर्भूत आहेत. याचाच उपयोग करून छत्रपती शिवाजी महाराजांनी वेगवेगळ्या बादशाहांसोबत लढाई मांडली व त्यांना जेरीस आणले. ही काही कोणत्या पुस्तकात लिहिलेली नीती नव्हती तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः या नीतीचा अवलंब करून तिला यशस्वी बनविली व त्यांच्या नावाने ती ओळखली जाऊ लागली.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे त्या वेळचे एक दोन जिल्हे होते. एवढ्या छोट्या भूभागामध्ये असलेलं हे स्वराज्य वेगवेगळ्या बादशाहांकडून वेढले गेलेले होते. यामध्ये बिजापूरचा आदिलशहा, कर्नाटकच्या बिदरचा बेरीदशहा, गोवळकोंडाचा कुतुबशहा, अहमदनगरचा निजामशहा, अचलपूरचा इमादशहा व दिल्लीचा औरंगजेब बादशाह तर होताच. याच औरंगजेब बादशहाने छत्रपती शिवाजी महाराजांना आग्र्याच्या किल्ल्यामध्ये कैद करून ठेवले होते. इतके मोठे बादशहा व त्यांची लाखोंची फौज असे असताना सुद्धा शिवाजी महाराजांनी आपल्या छोट्याशा सैन्याच्या भरोशावर या बादशाहांचा बीमोड कसा केला असेल, त्यांच्याशी टक्कर कशी घेतली असेल ही खूपच आश्चर्याची गोष्ट आहे.



शिवाजी महाराजांचा गनिमी कावा म्हणजे शत्रूला मारा, कापा व प्रसंग पडल्यास पळा अशा पद्धतीचा होता. पळा का बरं, तर बादशहाच्या हजारोंच्या फौजेसोबत कोण लढा देईल? तरीपण महासागरासारख्या पसरलेल्या मुघलांच्या सैन्यावर मूठभर मराठे हल्ले करायचे आणि त्यांच्या छावणीची नासधूस करून, जाळपोळ करून मिळेल त्याला, जमेल तेवढ्यांना मारून पसार व्हायचे. शिवाजी महाराजांच्या राज्यामध्ये खूप मोठा सपाट प्रदेश नव्हता तर सह्याद्री पर्वत होता. जंगल होते, दऱ्याखोऱ्या होत्या. त्या पर्वतांवर किल्ले बनलेले होते. अशाच किल्ल्यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले. त्यांची डागडुजी केली व त्यांना लढण्यायोग्य बनविले. शिवाजी महाराजांना हे माहीत होते की आमचे किल्ले जर लढत राहिले तर वर्षानुवर्ष चालले जातील परंतु बादशहा आम्हाला जिंकू शकणार नाही. समाप्त करू शकणार नाही. आमचा एकच किल्ला फक्त एक वर्ष जरी लढू शकला तरी सुद्धा आमचे सर्व किल्ले जिंकायला बादशहाला खूप वर्ष लागतील. त्याचे सर्व आयुष्य यातच चालले जाईल. किती मोठा आणि खोल विचार आहे छत्रपती शिवाजी महाराजांचा!

असे म्हणतात की गनिमी कावा छत्रपती शिवाजी महाराजांना या सह्याद्री पर्वतानेच शिकविला होता. शत्रूवर अचानक हल्ला चढविणे, जाळपोळ करणे, नासधूस करणे त्याच्या सैन्याची मारकाट करणे, त्याची हिंमत खच्ची करणे, शत्रूचा जोर वाढत आहे असे लक्षात आल्यास पळ काढणे हाच गनिमी कावा होता. जेव्हा शिवाजी महाराज केवळ अठरा वर्षांचे होते व त्यांच्याजवळ फार फार तर फौज केवळ हजार बाराशेची होती त्यावेळेस आदिलशहाने शिवाजी महाराजांचे हे छोटेसे स्वराज्य संपविण्यासाठी आदिलशाहीचा मातब्बर सरदार फत्तेखान याला स्वराज्यावर चाल करून पाठविले. भरीस भर म्हणून आदिलशहाने छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांना सुद्धा कैद केले. म्हणजे इकडे वडील कैदेत सापडलेले व तिकडे स्वराज्यावर मोठी फौज घेऊन फत्तेखान चालून आलेला अशा संकटाचा तो काळ होता. अशा परिस्थितीत स्वराज्य संपले नसते तरच नवल होते. परंतु हिंमत हारेल तो शिवबा कसला.

मराठ्यांची सेना बेलसरच्या मार्गावर होती. जसे बेलसर जवळ आले तसे त्यांनी आपल्या घोड्यांची गती कमी केली. हळूहळू कुठलाही आवाज न करता ते फत्तेखानाच्या छावणीकडे सरकत होते. काही अंतर समोर गेल्यावर फत्तेखानाची छावणी त्यांना दिसू लागली. तेथून हळूहळू सर्वच लोक पांगू लागले. त्यांनी पाहता पाहता फत्तेखानाच्या छावणीला घेरून घेतले व त्यानंतर संकेत मिळताच एकच गर्जना उठली 'हर हर महादेव' आणि त्यानंतर मराठी फौज निद्रिस्त आणि बेसावध असलेल्या फत्तेखानाच्या फौजेवर तुटून पडली. अनेकांना आपले शस्त्र घ्यायला सुद्धा वेळ मिळाला नाही. शत्रूची लांडगेतोड सुरू होती. शत्रुसैन्य कापले जाऊ लागले. तेवढ्यात फत्तेखान उभा राहिला. त्याने ओरडून त्याच्या सैन्याला चेतविण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत काही सैनिक तलवारी घेऊन लढायला आले. परंतु मराठ्यांच्या वेगासमोर त्यांचा निभाव लागला नाही. तरीही फत्तेखानाचे सैन्य मोठे होते. त्यामुळे फत्तेखान उभा होता तेथे हळूहळू सैन्य जमा होऊ लागले. तोपर्यंत मराठ्यांनी माघार घ्यायला सुरुवात केली होती. लढता लढता ते माघार घेत होते. पाहता पाहता मराठे ज्या मार्गाने आले त्या मार्गाने ते परत निघाले. छोट्याशा सैन्याने फत्तेखानाची छावणी पार विस्कटून टाकली होती. शिवाजी महाराजांचे जीवन हा संपूर्ण विश्वाकरिता एक अभ्यासाचा मार्गदर्शनाचा विषय आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### गरज आहे प्रत्येक महिलेने जिजाऊ बनण्याची..!

आज कुठल्याही क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आघाडीवर आहेत. त्या फक्त घरच सांभाळत नाही, तर त्यांचं कार्यालयीन काम देखील तेवढ्याच चोख करतात. मुलांचा सांभाळ असू दे, त्यांचा अभ्यास असू दे, की इतर सगळ्या संसाराच्या गोष्टी सांभाळणे, तिला सहजरीत्या जमते आहे. वेळप्रसंगी आलेल्या संकटांवरसुद्धा मात करण्याची, तिच्यातील दुर्गाशक्ती जागृत होण्याची आवश्यकता आहे. महिलांचा आदर्श जिजाऊमाता, राणी लक्ष्मीबाई, राणी पद्मावती इत्यादी कर्तृत्ववान शूर स्त्रिया असायला हव्या. जेणेकरून प्रत्येक घरात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राणी लक्ष्मीबाईसारखे पुत्र किंवा पुत्री जन्माला यावेत. परंतु असे लक्षात येते की पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करता करता काही भारतीय स्त्रिया आपलीच संस्कृती विसरत आहेत. आईचे पाहून मुलीसुद्धा किंवा त्यांची मुलेसुद्धा संस्कृती जोपासत नाहीत. कुठल्याही आईने मुलीला तयार करताना ती अभ्यासातच चांगली होणे एवढे साध्य न ठेवता प्रसंगी संरक्षणासाठी दोन दोन हात करण्याची सद्धा तयारी तिची करून घ्यायला हवी. त्यासाठी लाठी-काठी, कराटे, दंड, साखळी यासारखी उपकरणे वापरण्याची कला मुलींमध्ये येणे जरूरी आहे. आपण लव्ह-जिहादला बळी पडणार नाही, कोणी



आपल्याला त्यांच्या फायद्याकरिता वापरत नाही ना? याचे सामान्यज्ञान देखील मुलींना आईने देणे अपेक्षित आहे. सक्षम भारत बनवायला महिलांचं खूप मोठं योगदान असणार आहे. मृगजळासारखे पैसा, प्रसिद्धी, सत्ता, अहंकार या क्षणभंगुर गोष्टींच्या मागे न लागता एक आई म्हणून, एक मुलगी म्हणून किंवा इतर कुठल्याही नात्यात देशाविषयी माझे जे कर्तव्य आहे ते मी पार पाडत आहे ना, याचा वेळोवेळी अभ्यास देखील महिलांचा होत असेल तर तर भारताला विश्वविजेता होण्यापासून कोणीही थांबवू शकणार नाही.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

## वाचक पत्रे

### शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे करणार ना?

आता रामनवमी येईल. ती तिथीप्रमाणे चैत्र शुद्ध नवमीलाच करणार ना? हिंदू नववर्ष गुढीपाडवा सुद्धा चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढ्या उभारून साजरे करणार ना? गणेश उत्सव, जन्माष्टमी, हनुमानजन्म, दत्तजयंती, दसरा, दिवाळी, होळी, रंगपंचमी देखील तिथीप्रमाणेच करता ना? बुद्ध पौर्णिमा, महावीर जयंती, गुरुनानक जयंती, तुकाराम बीज, दासनवमी तिथीप्रमाणेच करता ना? संभाजी महाराज बलिदान दिन फाल्गुन अमावास्येलाच आठवतो ना? मग छत्रपती शिवाजी महाराज, हिंदवी स्वराज्याचे जनक, या हिंदुत्वाची मुख्य ओळख असलेल्या महापुरुषाची जयंती व पुण्यतिथी आंग्ल वा ग्रेगोरियन कॅलेंडरने साजरी करणे योग्य आहे का? आता १४४ वर्षांनी खगोल शास्त्राप्रमाणेच महाकुंभ साजरा झाला ना? कारण भारतीय दिनदर्शिका वा पंचांग हे शास्त्रशद्ध आहे . ज्या श्रीशिवरायांनी स्वतःची शिवशके ही कालगणना सुरू केली, शिवरायांची राजमुद्रा बघा 'प्रतिपदश्चंद्र लेखैव वर्धिष्णू विश्ववंदिता'. ही देखील तिथींचाच उल्लेख करते ना? शिवाजीराजा माझा राम आहे, कृष्ण आहे, माझा देव आहे मग त्याची जयंती तिथीप्रमाणे का नसावी? अहो एवढेच काय संघसंस्थापक डॉ. हेडगेवार असोत की द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांचे जन्मदिवस तिथीप्रमाणेच होतात ना? फाल्गुन वद्य तृतीया ही माझ्या शिवाजीराजांची जयंती की १९ फेब्रुवारी तुम्हीच ठरवा. मी तर फाल्गुन वद्य तृतीयेलाच शिवजयंती साजरी करणार. तुम्ही पण शिवजयंती तिथीप्रमाणेच करणार ना?

**रवी वाघमारे**/नागपूर

### नागपुरात बेवारस कुत्र्यांचा हैदोस

शुक्रवार, ७ मार्चच्या तरुण भारतात दीनदयालनगरात कुत्र्यांचा हैदोस अशी बातमी वाचली. दुचाकीवरून जाणाऱ्या नागरिकांवर ही कुत्री धावून जातात व त्यामुळे संतुलन बिघडून दचाकीचालक पडन जखमी होतात तसेच कत्र्यांनी चावा घेतला असता वैद्यकीय उपचार फार त्रासदायक व कठीणच असतात आणि उपचार बरोबर झाले नाही तर कुत्रा चावलेल्या व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. बेवारस कुत्र्यांचा हा त्रास केवळ दीनदयालनगरात नसून नागपुरात सर्वच भागात आहे. बेवारस कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त मनपाकडून अपेक्षित आहे. परदेशात असे बेवारस कुत्रे दिसत नाहीत. तिथे एखाद्या कुत्र्याने कोणत्याही नागरिकाला चावा घेतला, तर त्या कुत्र्याच्या मालकाला कोर्टाद्वार मोठ्या प्रमाणात नुकसान भरपाई द्यावी लागते. सबब प्रत्येक कुत्र्याच्या गळ्यात पट्टा असणे व कुत्रा पाळण्यासाठी मनपाचा परवाना असणे अनिवार्य असावे. अशाप्रकारे नागपुरात एकही बेवारस कुत्रा दिसणार नाही, हे मनपाकडून अपेक्षित आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त




### गांधी नाथा रंगजी होमिओपॅथिक कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येथील गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान संचलीत, होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल तसेच पॅथॉलॉजी आणि मेडीसीन विभागातर्फे बॉडी कोम्पोझीशन अँनॅलीसिस आणि आहार सल्ला असे आगळे वेगळे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात डॉ. ऋषिकेश जोकारे (आहार तज्ञ) यांनी ९० महिला शिबिरार्थींची शारीरिक तपासणी अँनॅलीसिस मशीनद्वारे करून आहारा बाबत मोलाचा सल्ला दिला. आणि आरोग्याबद्दल जनजागृती करण्यात आली. यावेळी डॉ. वैशाली सरवदे यांनी योगा विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वैशाली गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती, तसेच संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी यांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. श्रीधर पाटील, पॅथॉलॉजी विभागाच्या डॉ. श्वेता खोले, डॉ.प्रिती धामगुंडे, मेडीसीन विभागाच्या डॉ.स्मिता लातुरे, डॉ. हर्षदा पोगुल यांचे यावेळी योगदान लाभले.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंडे, सुरेश कासार, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, हिरा गोरे, सारंग अंजीखाने, रतन साळवे, आषिकेश लोखंडे, अविनाश शिंदे, रियाज अत्तार, अमोल गायकवाड, भगवान गायकवाड, भालचंद्र साखरे, सायली ढोले, शुभम गायकवाड आदी उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात संभाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजवीन शेख, पर्यवेक्षक निलोफर सय्यद, रजनी राऊळ, भगवान मुंडे, हिरा गोरे, सारंग अंजीखाने, रतन साळवे, आषिकेश लोखंडे, भालचंद्र साखरे शुभम गायकवाड आदी उपस्थित होते.



### राष्टवादीतर्फे छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

स्वराजाच्या रक्षणाखातर आणि अस्मितेसाठी आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत लढणारे, शत्रूला पराभवाची धूळ चारणारे महाप्रतापी, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजीमहाराज चौक येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले सहकार अध्यक्ष भास्कर आडकी प्रकाश झाडबुके आदी उपस्थित होते.

### 'अशी ही जमवा जमवी' चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

चित्रपट आणि प्रेमकथा हे आपलं आवडतं समीकरण.अशीच एका नव्या प्रेमाची नवी परिभाषा आपल्याला लवकरच अनुभवायला मिळणार आहे.राहुल शांताराम यांच्या ''राजकमल एंटरटेनमेंट'' द्वारे प्रस्तुत,लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित,महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ आणि वंदना गुप्ते अभिनीत नवा मराठी चित्रपट ''अशी ही जमवा जमवी'' लवकरच आपल्या भेटीला येत आहे.या सिनेमाचं पहिलं पोस्टर प्रदर्शित झालं आहे.विशेष म्हणजे,अनेक वर्षांनी दिग्गज अभिनेते अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांची जोडी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. त्यांना ओमकार कुलकर्णी व तनिष्का विशे या नवीन जोडीसह सुनील बर्वे,चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर,पुष्कराज चिरपुटकर अशा लोकप्रिय कलाकारांची साथ लाभलेली आहे.

# विधान परिषदेसाठी भाजपचे तीन उमेदवार जाहीर

## अजित पवार, शिंदे गटात मात्र रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१६ मार्च -**

राज्यातील विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी येत्या २७ मार्चला होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपाने आपल्या कोट्यातील तीन नावे जाहीर केली आहेत. दादाराव केचे, संजय केणेकर आणि संदीप जोशी यांना संधी देण्यात आली असून सोमवारी ते उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

विधानसभा आमदारांकडून निवडल्या जाणाऱ्या या निवडणुकीसाठी सोमवारी अर्ज भरण्याची अखेरची मुदत आहे. भाजपचे ज्येष्ठ व निष्ठावंत नेते माधव भंडारी यांच्या नावाची चर्चा होती मात्र यावेळी सुद्धा त्यांना डावलण्यात आले आहे दरम्यान उर्वरित दोन जागा साठी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार व शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. इच्छुकांची मोठी रस्सीखेच सुरू असल्याने सोमवारी सकाळी त्यांच्या नावाची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत विजयी झालेल्या विधान परिषदेतील पाच सदस्यांनी राजीनामा दिल्याने ही निवडणूक होत आहे त्यामध्ये सर्वही पाच आमदार सत्ताधारी महायुतीतील असून भाजपाचे तीन तर शिंदे व अजित पवार गटाचे प्रत्येकी एका आमदाराचा समावेश आहे.



भाजपकडून विधानपरिषद उमेदवारांच्या दिल्लीला पाठवण्यात आलेल्या यादीत माधव भंडारी आणि अमरनाथ राजूरकर यांच्या नावाचा समावेश असल्याचे सांगितले जात होते. मात्र, आता अंतिम यादीत दादाराव केचे, संजय केणेकर आणि संदीप जोशी यांना संधी मिळाली आहे. भंडारी हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजप आणि संघ परिवारात निष्ठेने काम करत आहेत. २०१४ साली सत्ता आल्यापासून त्यांना एकदाही महत्त्वाचे पद मिळालेले नाही. विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणूकीत प्रत्येकवेळी माधव भंडारी यांना संधी मिळणार, अशी चर्चा होते. मात्र, प्रत्यक्षात मात्र त्यांना वंचित राहावे लागले. आतादेखील त्याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही विधानपरिषदेवर जाण्यासाठी इच्छुकांची गर्दी असून कोअर कमिटीकडून झिशान सिद्दीकी, संजय दौंड आणि उमेश पाटील यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कागदपत्रे तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. या तिघांपैकी एकाला संधी मिळणार आहे. राजेश विटेकर विधानसभेत गेल्यानं राष्ट्रवादी काँग्रेसची एक जागा रिक्त आहे. या जागेसाठी १०० हून अधिक इच्छुकांचे अर्ज आले होते. शिवसेना शिंदे गटाकडून शितल मात्रे यांच्यासह अन्य दोघांची नावे चर्चेत आहेत मात्र त्याबाबतचा अंतिम निर्णय सोमवारी जाहीर करण्यात येणार आहे.



## जनमंगल नागरी पतसंस्थेतर्फे महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १५ महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आशिर्वाद महिला बचत गट व मार्कंडेय महिला बचत गटांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले. समाज कल्याण केंद्र, रंगभवन चौक येथे झालेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेच्या चेअरमन सविता थोरात होत्या. प्रास्ताविक पतसंस्थेच्या संचालिका तेजस्विनी पलंगे यानी केले व सूत्रसंचालन रूथ भंडारी यांनी केले. आभार प्रदर्शन पतसंस्थेच्या सहसचिव मनिषा मोरे यांनी केले.

महिलांचा झाला गौरव : डॉ. मीनाक्षी बनसोडे-सोनवणे (जिल्हा क्षयरोग अधिकारी), अनुपमा पडवळे (कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.प. आरोग्य विभाग), सुनंदा शेंडगे (माजी सहाय्यक संचालक, कामगार कल्याण केंद्र), अ‍ॅड. वर्षा सोमवंशी (जिल्हा न्यायालय), विद्या घोणे (विशेष शिक्षिका), राखी घोलप (सचिव, विजयज्योत सामाजिक संस्था), पोर्णिमा रोकडे (फायरवुमन, फायर ब्रिगेड), शुभांगी पलंगे (शिक्षिका), अनिता सावंत (शिक्षिका), स्वाती घोणे, (अधिपरिचारिका, ग्रामीण रुग्णालय परांडा), पद्मजा घोणे (समुदाय आरोग्य अधिकारी, अक्कलकोट), मधुबाई ओव्हाळ (माजी चेअरमन, सोमपा कर्मचारी पतसंस्था) आणि ललिता शेळके (विभागीय प्रतिनिधी).

## सोलापूर विद्यापीठातर्फे उद्या सेट-नेट पेपर एक संदर्भात कार्यशाळा

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विशेष कक्ष विभागाच्यावतीने सेट- नेट परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पेपर क्रमांक एक करिता मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ रोजी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवारी, सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे सभागृहात या सेट-नेट प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यशाळेत डॉ. शशिकांत शिंदे, सोलापूर, डॉ. कृष्णा पाटील, कोल्हापूर, डॉ. ब्रिजमोहन दायमा, लातूर, डॉ. सारिका दायमा, लातूर हे तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. सेट-नेट परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पेपर क्रमांक एकच्या मार्गदर्शनासाठी विद्यापीठात उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव योगिनी घारे यांनी केले आहे.



## महापालिकेतर्फे छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या (बलिदान दिन) पुण्यतिथी दिनानिमित्त जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त तैमूर मुलाणी,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, उद्यान प्रमुख किरण जगदाळे,श्रीनिवास करली,नाना काळे, राजन जाधव, बजरंग जाधव, सुनील शेळके, श्रीकांत घाडगे, विवेक फुटाणे, सदाशिव पवार, अंबादास शेळके, प्रकाश ननावरे, सूर्यकिरण भोसले, सावंत, कन्ना, दिनकर जगदाळे, सोमनाथ शिंदे, सचिन चव्हाण, नितीन मोहिते, राम माने, प्रकाश डोंगरे, परशुराम पवार, राहुल जाधव, मोहन खमीतकर, सचिन कांबळे, सचिन स्वामी, जितू वाडेकर, देविदास घुले, सिद्धू तिमिगार, अशोक खडके उपस्थित होते.

## मातंग आरक्षण संघर्ष समितीने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

अनुसूचित जाती वर्गीकरणाचा मुद्दा अनेक दिवसापासून प्रलंबित असून याकडे राज्य सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे तसेच अनुसूचित जातीचे अ ब क ड वर्गीकरण कायदा विधिमंडळात पारीत करावा, अशी मागणी करीत मातंग आरक्षण संघर्ष समितीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील सह्याद्री अतिगृह येथे भेट घेतली.

शेजारील तेलंगणा राज्याने अनुसूचित जातीचे अ,ब,क असे उपवर्गीकरण करण्यात आले आहे.तसे महाराष्ट्र सरकारने सुद्धा उपवर्गिकरण कायदा विधिमंडळात पारित करून अनुसूचित जातीतील वंचित जातींना लवकर न्याय द्यावा यासाठी वर्गीकरणाची मागणी आता महाराष्ट्र मध्ये जोर पकडून लागली आहे. अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड उपवर्गीकरण करणे तसेच लहुजी साळवे आयोगाच्या शिफारशी अंमलबजावणी आयोगाचे पुनर्स्थापनेच्या मागणी करीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री



किशन रेड्डी यांची मुंबईतील सह्याद्री अतिथी ग्रह येथे मातंग आरक्षण संघर्ष समितीचे राष्ट्रीय नेते सत्यम अण्णा मादीगा, प्रदेशाध्यक्ष अजित केसराळीकर, मातंग समाजाचे नेते सुरेश पाटोळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन मागण्याचे निवेदन दिले यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सकारात्मकता दर्शवली असल्याची माहिती यावेळी अजित केसराळीकर यांनी दिली. यावेळी शंकर येरोला, शंकर संटी, नरसिंग शिंदे, डॉ. योगेश साठे, नाना गायकवाड, राजेश मोरे, नरस्पा गुंजणुर, मनोज कांबळे, लक्ष्मण कोतवाल, बिमेश मुतूला, संजय कलकुरी, रंगा राजू, बालाजी कांबळे, रमेश पेंदमोतल, तम्मना केशवाल, कृष्णा जुटलावार, हणुमंता जुटलावार उपस्थित होते.

## बौद्ध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी वाघमारे यांची निवड



### राज्यस्तरावरील संमेलन आदर्शवत करण्याचा केला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतीप्रवण झालेल्या सोलापूर नगरीत आयोजित करण्यात आलेल्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. राज्यस्तरावरील हे संमेलन आदर्शवत करण्याचा यावेळी सर्वांनी निर्धार व्यक्त केला.

सोलापूर शहरात येत्या ३ मे रोजी बौद्ध साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाची रूपरेषा ठरविण्यासाठी सोलापुरातील शिक्षक सोसायटीमधील वेळूवन बुद्ध विहारात तिसरी नियोजन बैठक भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी भिक्षुणी धम्मचारिणी यांची मंगल उपस्थिती होती. यावेळी बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी प्रास्ताविकात संमेलनाची रूपरेषा स्पष्ट केली. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांची या राज्यस्तरीय संमेलनाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी विचार मंचावर संमेलनाचे कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह भालचंद्र साखरे, प्रा. वशिष्ठ सोनकांबळे, कार्यकारणी सदस्य प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, कामगार नेते चांगदेव सोनवणे, चित्रकार विठ्ठल मोरे, व्ही. ए. गायकवाड, सुमित्रा जाधव, धम्मरक्षिता कांबळे आणि प्रा.डॉ. एम.डी. शिंदे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी लेखक अंगध मुके, व्ही. डी. गायकवाड,अरुण गायकवाड, निवृत्त मुख्याध्यापिका आशा शिवशरण , प्रा.अहिल्या कांबळे - गायकवाड, संयोगिता ओव्हाळ, आगतराव बनसोडे, युवराज भोसले, मारुती बेलभंडारे , प्रकाश शिंदे , अशोक इंगळे, भारत बनसोडे, विनोद जाधव , दिलीप गायकवाड, राज रोकडे, अमर डोळसे आदींसह मान्यवरांनी विविध सूचना केल्या. यावेळी साहित्यिक, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी , सामाजिक कार्यकर्ते तसेच धम्म चळवळीतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## उमेदपूर क्राईस्ट चर्चमध्ये डॉ. डायना आडके यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

महिला दिनानिमित्त उमेदपूर क्राईस्ट चर्च येथे डॉ. डायना आडके यांचे महिलांच्या आरोग्याच्या समस्या व उपचारा विषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानादरम्यान डॉ. आडके यांनी महिलांचे दैनंदिन आरोग्य विषयक समस्या व त्यावर उपाय, कॅन्सर मुक्त अभियान याविषयी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. महिला या कुटुंबाच्या प्रमुख घटक व पाया असतात त्यामुळे त्यांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुदृढ असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे असे मत त्यांनी मांडले. यावेळी प्रसन्ना सिस्टर यांनी प्रबोधनात्मक धार्मिक व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे आयोजन उमेदपूर क्राईस्ट चर्चेचे रेव्हरंट फादर विकास रणसिंगे, रेव्हरंट सियोना रणसिंगे, अध्यक्ष प्रियांका गुंजे, सचिव आशा गुंजे यांनी केले होते. या कार्यक्रमास शर्मिला लाल, संगीता जाधव, सुनीता जाधव ,सारा जाधव, वंदना गुंजे, मीरा गुंजे, रीना गुंजे, महिमा गुंजे ,कामाक्षी जाधव, स्नेहल जाधव, संगीता सिस्टर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# धर्मवीर बलिदान मासानिमित्त २४७ जणांचे रक्तदान

## श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या बलिदान मासानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात २४७ जणांनी रक्तदान करून धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना श्रद्धांजली वाहिली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाकडून हे रक्तदान शिबिर रविवारी शिवस्मारक येथे आयोजित करण्यात आले होते.

छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या धर्मवीर बलिदान मासानिमित्त दरवर्षी राज्यभरात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्या अंतर्गत रविवारी सोलापूर शहरात रक्तदान शिबिर घेण्यात आले. पोलीस उपायुक्त



(परिमंडळ) विजय कबाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांना धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांची प्रतिमा देण्यात आली. याप्रसंगी भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. प्रदीपसिंग राजपूत, शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे, शिवसेनेचे माजी शहरप्रमुख गुरुशांत धुत्तरगावकर, भाजपाचे शहर उपाध्यक्ष अनंत जाधव, क्रांती तालीम तरुण मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर उत्तर विधानसभा प्रमुख बाळासाहेब गायकवाड, पत्रा तालीम युवक मंडळाचे मार्गदर्शक श्रीकांत घाडगे, शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के, ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. महेश अग्रवाल, दाते पंचांगचे ओंकार दाते, श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे विश्वस्त उदय वैद्य, श्री सद्गुरु रेवणसिद्ध शिवशरण स्वामी महाराज मठाचे अध्यक्ष सिद्धाराम खजूरगी, शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या उपनगरीय शाखेचे सहकार्यवाहक सुशांत कुलकर्णी तसेच श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोठ्या प्रमाणावर रक्तदान

सध्या सोलापुरात तापमान ४१.३ अंशांपर्यंत जात आहे. त्यामुळे सोलापूरकरांना प्रचंड मोठ्या प्रमाणात उन्हाचे चटके बसत आहेत. मात्र अशा परिस्थितीतही सोलापुरातील २४७ शंभूभक्तांनी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या रक्तदान शिबिरात रक्तदान केल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महिलांमध्ये धाराशिव-सांगली अंतिम लढत

## हिरक मोहत्सवी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा





### पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर

**शेवगाव, ता. १६ मार्च-**

येथील खंडोबा मैदानावर सुरू असलेल्या हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चुरस पाहायला मिळणार आहे. पुरुष गटात पुणे विरुद्ध मुंबई उपनगर तर महिला गटात धाराशिव विरुद्ध सांगली यांच्यात अंतिम साम न्यांची लढत रंगणार आहे. विशाल भिंगारदिवे (सांगली), नंदिनी धुमाळ ( मुंबई), मंदार कोळी (ठाणे), जगदीश दवणे (पालघर ) हि निवड समिती या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ निवड करणार आहेत.

**पुरुष गटात मुंबई उपनगरने धाराशिवला नमविले**

पहिल्या उपांत्य सामन्यात पुण्याने सांगलीचा १ गुण व ५ मिनिटे ३० सेकंद राखून (१८-१७) पराभव केला. पुणे संघात शुभम थोरात (१.३०, १.३० मि. संरक्षण व ४ गुण), रुद्र थोपटे (५ गुण), शिवराम शिंगाडे (१, ३ मि. संरक्षण) यांनी महत्वाची भूमिका बजावली. सांगलीतर्फे मिलिंद चावरेकर (१.१० मि. संरक्षण व ६ गुण) याने आक्रमक खेळ करत संघाला पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्याला अभिषेक केरीपाळे (१.२० मि. व ३ गुण) याची चांगली साथ मिळाली. सांगली संघाने पहिल्या डावात आक्रमक खेळ केला, मात्र मध्यंतरानंतर ते सातत्य राखू शकले नाहीत.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगरने धाराशिवचा ७ गुणांनी (२०-१३) पराभव केला. मध्यंतराला मुंबई उपनगर संघाकडे ३ गुणांची (१०-७) आघाडी होती, जी धाराशिव मोडीत काढू शकला नाही. विजयी संघात अनिकेत चेंदवणेकर (१.४०, १.३० मि. संरक्षण व ३ गुण), ऋषिकेश मुरचावडे (१.३०, १.२० मि. संरक्षण व ३ गुण), ओंकार सोनवणे (२ मि. संरक्षण व ३ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. धाराशिव संघात सचिन पवार (१.३०, १ मि. संरक्षण), रवी वसावे (१.३०, ०.५० मि. संरक्षण व १ गुण), सोहन गुंड (५ गुण) यांनी चांगली कामगिरी केली. त्यामुळे अंतिम सामना पुणे विरुद्ध मुंबई उपनगर संघात रंगणार आहे.

**महिला गटात धाराशिवने पुण्यास हरविले**

महिला गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात धाराशिव संघाने पुण्याचा १ गुण व ७.५० मिनिटे राखून (१०-९) पराभव केला. धाराशिव संघात अश्विनी शिंदे (२.२०, २.१० मि. संरक्षण), संपदा मोरे (२.१०, १.५० मि. संरक्षण व १ गुण), संध्या सुरवसे (१, २.५० मि. संरक्षण व १ गुण), सुहानी धोत्रे (१.१०, १ मि. नाबाद संरक्षण व ४ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ करत संघाला अंतिम फेरीत प्रवेश मिळवून दिला. पुणे संघात दिपाली राठोड (१.३० मि. संरक्षण व २ गुण), ऋतिका राठोड (१.५० मि. संरक्षण), कोमल धारवाडकर (१.२० मि. संरक्षण) यांनी उत्कृष्ट प्रयत्न केला पण विजय मिळवू शकल्या नाहीत.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात सांगलीने नाशिकचा १ गुण व १ मिनिट राखून (१२-११) विजय मिळवला. सांगली संघात सानिका चाफे (३ मि., ३.४० मि. संरक्षण व १ गुण), रिया चाफे (१.३०, १ मि. संरक्षण व १ गुण), प्रतीक्षा बिराजदार (१ मि., २.४० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. नाशिक संघात कौशल्या पवार (१, २.३० मि. संरक्षण व ४ गुण), सरिता दिवा (१.२०, १.५० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.

# क्रिकेटमध्ये पाकिस्तानपेक्षा भारत उत्तम

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**♦ नवी दिल्ली, १६ मार्च**

आता कोणता संघ चांगला आहे किंवा नाही या प्रश्नाकडे येत आहे. खेळाच्या तंत्रांचा विचार केला तर मी तज्ज्ञ नाही. केवळ त्यात तज्ज्ञ असलेले लोकच त्याचा निर्णय घेऊ शकतात. केवळ तेच कोणता संघ सर्वोत्तम आहे आणि कोणते खेळाडू सर्वोत्तम आहेत हे ठरवू शकतात. पण कधीकधी, निकाल स्वतःच बोलतात. काही दिवसांपूर्वीच भारत आणि पाकिस्तानमध्ये सामना झाला आणि निकालावरून कोण चांगला संघ आहे हे स्पष्ट झाले. आम्हाला हेच माहित आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी लेक्स फ्रिडमन पॉडकास्टवर मुलाखतीत म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रिकेट मैदानावर भारत-पाकिस्तानच्या प्रतिस्पर्ध्याबद्दलच्या आपल्या विचारांवर भर दिला आहे. त्यांनी आपल्या शेजारी राष्ट्रांवरील भारतीय क्रिकेट संघाच्या उत्कृष्ट कामगिरीचा पुरावा म्हणून उल्लेख केला आहे.

विराट कोहलीच्या शतकामुळे भारताने २०२५ च्या चॅम्पियन्स चषकाच्या गट साखळी सामन्यात पाकिस्तानवर ६ गड्यांनी विजय मिळवला आणि शेवटी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. आयसीसी स्पर्धेच्या इतिहासात पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांनी भारतावर केवळ दोन विजय मिळविले आहेत - २०१७च्या चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम फेरीत व २०२१च्या टी-२० विश्वचषकाच्या गट साखळी सामन्यात पाकिस्तानने भारतीय संघावर विजय मिळविला होता.

(वृत्तसंस्था)

## खेळांमध्ये जगाला ऊर्जा देण्याची शक्ती

मला वाटते की खेळांमध्ये संपूर्ण जगाला ऊर्जा देण्याची शक्ती आहे. खेळाची भावना वेगवेगळ्या राष्ट्रांमधील लोकांना एकत्र आणते. म्हणूनच मी कधीही खेळांना बदनाम करू इच्छित नाही. मानवी उत्क्रांतीत खेळांची मोठी भूमिका आहे असे मला खरोखर वाटते. ते केवळ खेळ नाही, तर लोकांची मने जोडतात, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.च

पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात, खेळांना मोठी चालना मिळाली आहे, कारण देश एक क्रीडा राष्ट्र करण्याचा प्रयत्न करत आहे. यात २०३६च्या ऑलिम्पिकचे यजमानपद भारतालाही मिळण्याची शक्यता आहे. त्यांना विचारण्यात आले की त्यांच्या मते सर्वकालीन महान फुटबॉल खेळाडू कोण आहे आणि पंतप्रधान मोदींनी अर्जेंटिनाच्या दोन खेळाडूंची नावे घेतली - दिएगो मॅराडोना आणि लियोनेल मेस्सी - जे फुटबॉलच्या इतिहासातील सर्वोत्तम मानले जातात.

भारतातील अनेक प्रदेशांमध्ये एक मजबूत फुटबॉल संस्कृती आहे, हेही एक सत्य आहे. आपला महिला फुटबॉल संघ खरोखरच चांगली कामगिरी करत आहे आणि आपला पुरुष संघ खरोखरच चांगली प्रगती करत आहे. जर आपण भूतकाळाबद्दल बोललो तर, १९८० च्या दशकात, एक नाव जे नेहमीच वेगळे राहिले ते म्हणजे दिएगो मॅराडोना. त्या पिढीसाठी, त्याला एक खरा नायक म्हणून पाहिले जात होते आणि जर तुम्ही आजच्या पिढीला विचारले तर ते लगेच लियोनेल मेस्सी म्हणतील,'' असे ते पुढे म्हणाले.

## वरिष्ठ गट हॅन्डबॉल निवड चाचणी आज

**सोलापर, दि. १६ मार्च-**

चाळीसगाव येथे २४ ते २६ मार्च दरम्यान होणाऱ्या ४९व्या वरिष्ठ गट पुरूषांच्या राज्य अजिंक्यपद हॅन्डबॉल स्पर्धेकरिता जिल्हा संघ निवड चाचणी सोमवारी १७ मार्च रोजी सायंकाळी ६वाजता आयोजित केली आहे.या निवड चाचणीतून सोलापूर जिल्ह्याचा हॅन्डबॉल संघ पाठवण्यात येणार आहे. या निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपला आधार कार्ड, १ फोटो व नोंदणी शुल्क शंभर रूपये निवड चाचणीच्या दिवशी सायंकाळी ५.३० वाजता राजीव गांधी इनडोअर स्टेडियम अश्विनी हॉस्पिटल शेजारी उपस्थित रहावे. या स्पर्धेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवावा, असे आव्हान संघटनेचे जिल्हा हँडबॉल संघटनेचे सचिव सुदेश मालप यांनी केले आहे. संपर्क : अतुल गवळी ८२०८८८६८२६

## सोलापुरच्या दानिश शेखची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड

**सोलापर, दि. १६ मार्च-**

आसाम गोहाटी येथे १७ ते २४ मार्च दरम्यान होणाऱ्या २३ व्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेकरिता सोलापुर ॲमचर बास्केटबॉल असोसिएशन आणि ग्रीन स्टार स्पोर्ट्स क्लबचा दानिश शेख याची निवड झाली. माटुंगा जिमखाना येथे झालेल्या निवड चाचणीतून महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघात त्याची निवड झाली दानिश हा ऑर्किड कॉलेजचा विद्यार्थी आहे. दानिशला अब्दुल माजिद खान पठाण व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या निवडीद्दल सोलापुर ॲम्युचर बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहीते पाटिल, सचिव कॅप्टन एम शफी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



## विशेष ऑलिम्पिकमध्ये भारताला ३३ पदके

**नवी दिल्ली :** विशेष ऑलिम्पिक जागतिक हिवाळी क्रीडा स्पर्धा २०२५च्या शेवटच्या दिवशी भारतीय खेळाडूंनी चार क्रीडा प्रकारात १२ पदके जिंकली. याबरोबरच भारताने एकूण ३३ पदकांसह आपली मोहीम संपविली. यात ८ सुवर्ण, १८ रौप्य व ७ कांस्यपदकांचा समावेश आहे. भारताने स्नोशूइंग आणि अल्पाइन स्कीइंगमध्ये प्रत्येकी १० पदके नोंदवली, तर स्नोबोर्डिंगमध्ये ६ पदके मिळाली. शॉर्ट ट्रॅक स्पीड स्केटिंग, क्रॉस कंट्री स्कीइंग आणि फ्लोरबॉलने देशाला अनुक्रमे ४, २ व १ पदक मिळवून दिले. स्नोशूइंगमध्ये, भारताने आणखी चार पदके मिळवली. वासू तिवारी, शालिनी चौहान आणि तान्याने २५ मीटर स्नोशूइंग स्पर्धेत प्रत्येकी एक रौप्य पदक जिंकले तर जहांगीरने त्याच श्रेणीत कांस्यपदक मिळविले.

# न्यू सोलापूर, साकत बार्शी, वाडीकुरोली व समृद्धी स्पोर्ट्स क्लब उपांत्य फेरीत

### भाजपा क्रीडा प्रकोष्ट व न्यू सोलापूर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा किशोरी खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

जिल्हा किशोरी १४ वर्षाखालील गटाची खो खो स्पर्धेत साकत प्रशाला बार्शी व समृद्धी स्पोर्ट्स क्लब सोलापूर आणि केके स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली व न्यू सोलापूर क्लब असे उपांत्य साम ने होतील.





सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने भारतीय जनता पार्टी क्रीडा प्रकोष्ट व न्यू सोलापूर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही किशोरी जिल्हा निमंत्रित खो खो स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरु झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी पुण्याचे माजी नगरसेवक नागपुरे, माजी नगरसेवक व्यंकटेश कोंडी, भाजपचे सरचिटणीस नागेश सरगम, विशाल गायकवाड, युवा सरचिटणीस महेश देवकर, सोलापूर शहर क्रीडा प्रकोष्ट यशवंत पाथरूट, न्यू सोलापूरचे क्लबचे अध्यक्ष मनोज सांगावर, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, पंचमंडळ सचिव गोकुळ कांबळे, सहसचिव अजित शिंदे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव पुंडलिक कलखांबकर, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सोनाली केत आदी उपस्थित होते.

यावेळी आंतरराष्ट्रीय जलतरण खेळाडू श्रावणी शिंदे, रणवीर खाडे, सर्वेश स्वामी, राष्ट्रीय खो खो खेळाडू लाला राठोड, कराटे खेळाडू मिहीर जाधव, जलतरण प्रशिक्षक श्रीकांत शेटे, बॅडमिंटन प्रशिक्षक सुनील देवांग, सूर्याजी लिंगडे, योग प्रशिक्षक सुभाष उपासे, उद्योजक नरेंद्र चाटे, अशोक पाटील, प्रमोद कुलाल, अनिल स्वामी व निवृत्त पोलीस उपनिरीक्षक अनिल वळसंगे यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेचे संयोजक यशवंत पाथरूट, संतोष कदम व आनंद जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या स्पर्धेतून महाराष्ट्र शासन क्रीडा खात्याच्या वतीने आयोजित केलेल्या भाई नेरुरकर करंडक राज्य स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवडण्यात येणार आहे. हे संघ राजाराम शितोळे, प्रथमेश हिरापुरे व अतुल जाधव हे निवड समिती सदस्य निवडणार आहेत.

या स्पर्धेतील विजयी, उपविजयी व तृतीय क्रमांकाच्या संघास अनुक्रमे पाच, तीन व दोन हजार तर अष्टपैलू, आक्रमक व संरक्षक अशी प्रत्येकी एक हजार रुपयाची तीन पारितोषिके व करंडक ठेवण्यात आली आहेत. ही पारितोषिके कै. विमल कदम यांच्या स्मरणार्थ व आरंभ फाउंडेशनतर्फे देण्यात आली आहेत.

# फुटबॉलपटू राजेश कळमणकर यांचा क्रीडा विकासाचा ध्यास

**क्रीडा भारती सोलापूरचे प्रशिक्षक आणि क्रीडा संघटक राजेश कळमणकर हे सोलापूरातील ज्येष्ठ फुटबॉल प्रशिक्षक असून त्यांनी फुटबॉल, कबड्डी, क्रिकेट व बुद्धिबळ आणि योगासारख्या विविध खेळांसाठी प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले आहे. खेळाडूंमध्ये शारीरिक क्षमता आणि मानसिक तयारी वाढवणे. तसेच त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यास मदत करणे हा त्यांचा उद्देश. त्यांचा आज वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्यांच्या क्रीडा कारकीर्दीचा घेतलेला आढावा...**



राजेश कळमणकर व त्यांचे चिरंजीव रोहित.

तत्त्व आणि ध्येय हे राजेश कळमणकर यांचे जीवनतत्त्व आहे ''बल हे जीवन, दुर्बलता हा मृत्यू आहे.'' या विचाराने प्रेरित होऊन ते खेळाडूंना शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. कळमणकर यांचे कार्य फक्त प्रशिक्षणापुरते मर्यादित नसून ते ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देऊन त्यांच्यात क्रीडाप्रेम निर्माण करण्याचे मोठे कार्य करत आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे सोलापूर आणि परिसरातील क्रीडा संस्कृती समृद्ध होत आहे.

### प्रारंभिक जीवन व खेळाडू कारकीर्द

कळमणकर यांनी १९७४ मध्ये ह. दे. प्रशालेमध्ये फुटबॉल खेळण्यास सुरुवात केली. १९८० ते १९८४ दरम्यान हिराचंद नेमचंद कॉलेजच्या संघाचे फुटबॉल खेळाडू म्हणून त्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या कॅम्पमध्ये सहभाग घेतला. डाव्या विंगवर खेळताना उत्कृष्ट स्टॅमिना आणि डाव्या पायाच्या शक्तिशाली शूटिंगसाठी ते ओळखले जात. त्यांच्या खेळाडू जीवनात हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये शिकताना गुरू इरण्णा दिड्डी यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले.

### प्रशिक्षक कारकीर्द

डीएव्ही कॉलेजमध्ये १९९१ पासून त्यांनी देशमुख सरांच्या प्रेरणेने कोचिंगची सुरुवात केली. त्यांनी १९९८-९९ मध्ये सुयश विद्यालयात आणि २००० पासून हरिभाई देवकरण प्रशालेच्या फुटबॉल संघास प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महेश ढवळे आणि श्रेयस भोसेकर हे राष्ट्रीय खेळाडू घडले. किरण राऊत, अश्विन टाक आणि छत्रसिंग चौधरी यांसारखे खेळाडू राष्ट्रीय स्तरावर पोहोचले.


### खेळातून जीवनाचा विकास

कळमणकर हे खेळाच्या माध्यमातून मुलांचे भविष्य घडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. खेळ आणि जीवनदृष्टी त्यांचे एक महत्त्वाचे तत्व आहे. अक्कलकोट येथेही क्रीडा भारती सोलापूरच्या माध्यमातून नवीन प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. खेळाच्या माध्यमातून मुलांना शारीरिक, मानसिक आणि नैतिक शिक्षण मिळते. विजय-पराजय यांचा अनुभव मैदानावर घेतल्याशिवाय जीवनाचा खरा अर्थ कळत नाही. खेळातूनच मुलांना जीवन जगण्याचे खरे धडे मिळतात.

खेळ हे मुलांना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम बनवत नाही, तर त्यांना सामाजिकदृष्ट्याही सक्षम करतात. कुटुंबाच्या चौकटीबाहेर त्यांचा समाजात प्रवेश अधिक सुकर होतो. संघभावना, सहकार्य, संयम आणि नेतृत्वगुण हे सर्वच खेळातून शिकता येतात. जे आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असतात. कळमणकर यांच्या अथक प्रयत्नांमुळे सोलापूर परिसरातील अनेक खेळाडूंना राष्ट्रीयस्तरावर संधी मिळाली आहे. त्यांनी सुरू केलेल्या या उपक्रमांमुळे भविष्यातही नव्या पिढीतील खेळाडू घडण्याची मोठी संधी निर्माण होणार आहे.

### क्रीडा संघटक कामगिरी

त्यांनी २००५ ते २००७ दरम्यान शालेय सामन्यांचे पंच म्हणून कार्य केले. २००६ मध्ये महाराष्ट्राच्या अंडर-२३ वेस्ट झोन संघाचे व्यवस्थापक आणि प्रशिक्षक म्हणून त्यांनी अभियंता संघासोबत काम केले. सध्या, शहरातील विविध भागांत त्यांनी कोचिंग सेंटर्स स्थापन केले आहेत, जिथे फुटबॉल, क्रिकेट, कबड्डी, बुद्धिबळ आणि योगा यांसारख्या खेळांच्या माध्यमातून क्रीडा विकासाला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत पाच राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कळमणकर यांच्या या सर्व कार्यांमध्ये क्रीडा भारती सोलापूरचे मार्गदर्शन आणि सहकार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे सोलापूरमधील क्रीडा संस्कृती समृद्ध झाली आहे आणि अनेक युवा खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती करण्याची संधी मिळाली आहे.



### क्रीडा भारतीच्या माध्यमातून योगदान

सोलापूरमधील खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे आणि ग्रामीण भागातील मुलांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची संधी मिळावी यासाठी कळमणकर यांनी ''क्रीडा भारती सोलापूर''च्या माध्यमातून क्रीडा भारतीचे कार्य सुरू केले आहे. फुटबॉल, क्रिकेट, कबड्डी, बुध्दीबळ आणि इतर प्रशिक्षण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहेत. सध्या भंडारी ग्राऊंड, हरिभाई देवकरण प्रशाला, अल्फा ग्राऊंड येथे फुटबॉलचे प्रशिक्षण चालू आहे. रेल्वे ग्राउंड येथे क्रिकेटचे प्रशिक्षण अनिल साम्राणी यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. विद्या इंग्लिश मिडीयम स्कुल होटगी रोड येथे कबड्डीचे प्रशिक्षण श्री.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे. बुध्दीबळ या इनडोअर खेळाचे प्रशिक्षण विशाल पटवर्धन व पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली केएलई स्कुल जुळे सोलापूर येथे चालू आहे. मारूती मंगल कार्यालय, जुळे सोलापूर व मुक्तेश्वर मंदिर, टिळक चौक येथे मेकेवाडकर सर व मॅडम आणि पायल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली योग सेंटरद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. विवेक नागुल, सलीम पठाण, राहुल कडकामाने यांनी देखील प्रशिक्षण दिले. विशेषतः फुटबॉल मधील भारतातील नामवंत कोच विवेक नागुल हे चेन्नई टीमचे कोच होते. त्यांचे मैत्रीमुळे त्यांनी ४ वेळा सोलापूर येथील मुलांना ट्रेनिंग दिले. अशा प्रकारे विविध केंद्रांमध्ये सध्या ३०० ते ३५० खेळाडूंना प्रशिक्षण मिळत आहे.



### यशाचा मार्ग आणि प्रेरणा

क्रीडा क्षेत्रात काम करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी लागते ''बल हे जीवन, दुर्बलता हा मृत्यू आहे.'' याच तत्त्वावर कळमणकर यांच्या प्रयत्नांची वाटचाल सुरू आहे आणि भविष्यात ही वाट अधिक व्यापक करण्याचा मानस आहे. या सर्व कामात क्रीडा भारतीचे अध्यक्ष डॉ.विलास हरपाळे, सर्वश्री ज्ञानेश्वर मॅकल, अरूण उपाध्ये, उज्वल मलजी, सुधीर देव यांनी आणि क्रीडांगणावर सुमित रजपूत, अभिजीत बंडगर, अजय उत्तम, निनाद वरकटे, मंजूषा गायकवाड, प्रतिक कसबे, निरंजन ढोबळे यांच्या सहकार्याने त्यांचे प्रशिक्षण व क्रीडा संघटनाचे कार्य चालू आहे. या त्यांच्या क्रीडा विकासाच्या कार्यास शुभेच्छा...

**-ए. बी. संगवे**
**९८८११३३१०३**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### आदर्श शिक्षिका रेखा सोनकवडे यांना 'स्त्री रत्न ' पुरस्काराने सन्मानित

**वागदरी, दि. १६ मार्च-**

येथील जिल्हा परिषद मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका आदर्श शिक्षिका कृतीशील शिक्षिका म्हणून परिचित असलेल्या रेखा सोनकवडे यांना नुकताच महिला दिनानिमित्त 'स्त्री रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वागदरी येथील सागर कल्याणशेट्टी युवा मंच वतीने महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सन्मानपत्र स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी युवा मंच अध्यक्ष श्याम बाबर, कमलाकर सोनकांबळे, महादेव सोनकावडे, सागर कल्याणशेट्टी, उपसरपंच हन्नूर सुरेखा होळीकट्टी, डॉ. सुवर्णा पाटील, शिवानंद घोळसगाव, सरपंच पंकज सुतार, उपसरपंच बसवराज शेळके, प्रदीप जगताप उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील सावंत, सतीश कणमुसे, प्रकाश पोमाजी, वीरभद्र पुरंत, बसवराज पाटील, राजकुमार मंगाणे, संतोष पोमाजी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन महादेव सोनकवडे यांनी केले तर आभार राजश्री शेळके यांनी मानले.

### जिल्हा परिषद पवारवस्ती शाळेला प्रा. लोखंडे यांच्याकडून अकरा हजारांची देणगी

**पिलीव, दि.१६ मार्च -**



माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पवारवस्ती या शाळेला प्रा. नंदकुमार ज्ञानदेव लोखंडे यांनी शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या सुधारणा करणयासाठी अकरा हजारांची देणगी दिली. ही देणगी नंदकुमार लोखंडे यांच्या वतीने प्रा. संजय पाटील यांनी पवारवस्ती शाळेचे मुख्याध्यापक तथा माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेचे संचालक सचिन गाटे यांच्याकडे सुपुर्द केली. यावेळी नितीन शिंदे उपस्थित होते.



### गणेश इंगळे यांची रेंज फॉरेस्ट ऑफीसरपदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्यावतीने सत्कार

**पिलीव, दि. १६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील सेवानिवृत्त अधिकारी शिवाजी इंगळे यांचे सुपुत्र गणेश शिवाजी इंगळे यांची नुकतीच रेंज फॉरेस्ट ऑफीसरपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान ॲड. मानसिह जहागिरदार यांच्या हस्ते करणयात आला. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबुराव कदम, शिवाजी इंगळे, माजी उपसरपंच विजयसिंह रजपुत, मोहसीन शेख, तानाजी लोखंडे, अभय जगदाळे, हनुमंत देशमुख उपस्थित होते. गणेश याचे हिमाचल प्रदेशातील सुंदरनगर येथे ट्रेनिंग झाले यामध्ये तो प्रथम आला. याबद्दल त्याला सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले.

## निधन वृत्त...

### सिद्रामप्पा कमटम



**सोलापूर दि. १६ मार्च-**

पूर्व भागातील प्रसिध्द उद्योगपती व कारखानदार सिद्रामप्पा भुमय्या कमटम (वय ८४) यांचे रविवार १६ मार्च रोजी दुपारी २ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमी येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### वरम्माबाई गुंडेली



**सोलापूर दि. १६ मार्च-**

पूर्व भागातील अक्कलकोट रोड गांधीनगर येथील वरम्माबाई रामदास गुंडेली (वय ९०) यांचे रविवारी १६ मार्च रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमी येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### शालन घोडके



**सोलापूर दि. १६ मार्च-**

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक सचिन घोडके यांच्या आई शालन लिंबाजी घोडके वय ७०, जानकीनगर बागेशेजारी, जुळे सोलापूर यांचे रविवारी सकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, नात असा परिवार आहे.

### हाजीमा शेख



हाजीमा सईदा हाजी बशीर शेख (वय ८६) राहणार वैराग यांचे निधन झाले. त्याच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या वैराग व वडाळा येथील घड्याळ व चष्म्याचे व्यापारी हारुण शेख यांच्या मातोश्री होत.

### जिजाबाई गायगोपाळ



**मंगळवेढा, दि. १६ मार्च-**

मित्रनगर येथील जिजाबाई उमाकांत गायगोपाळ यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवार दि. १६ मार्च रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले असून त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. श्री संत दामाजी महाविद्यालयाचे प्रा. युवराज गायगोपाळ यांच्या त्या मातोश्री होत.

# उत्पात लावणी महोत्सवास प्रारंभ

## होळी ते रंगपंचमीपर्यंत दररोज रात्री लावण्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च -**



शेकडो वर्षांची परंपरा असणारा होळी पौर्णिमा ते रंगपंचमी असा पाच दिवसांच्या बैठकीच्या लावणी महोत्सवाचे येथील उत्पात समाजाच्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आलेले आहे. हा बैठकीचा लावणी महोत्सव गुरुवारी (ता.१३) पासून सुरु झाला असून तो बुधवार (ता.१९) पर्यंत चालणार आहे. येथील जुनी माळीगल्ली मधील एकनाथ भवन येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांचा त्याला उत्तम असा प्रतिसाद लाभत असल्याची माहिती उत्पात मंडळींकडून देण्यात आली.

पंढरपूरच्या उत्पात लावणी महोत्सवला १५० वर्षांपासूनची परंपरा आहे. या महोत्सवात छबु उर्फ मनोहर उत्पात, शाम उत्पात, हेमंत उत्पात, अनिल उत्पात, प्रसाद उत्पात ही सध्याची उत्पात मंडळींची पिढी लावणी गायनाचा हा वारसा पुढे नेत आहेत. लावणी महोत्सवात ८० च्या दशकात पु.ल.देशपांडे, वसंतराव देशपांडे, अशा दिग्गज लोकांनी हजेरी लावली. यानंतर हा महोत्सव जगभरात लोकप्रिय झाला. सुमारे १५० वर्षांपूर्वी बाळकबा उत्पात, दादबा उत्पात वैरागकर, ज्ञानेश्वर गोपाळ उत्पात यांनी लावणी उत्सवाची सुरुवात केली. जगप्रसिद्ध मृदंगचार्य शंकर आप्पा मंगळवढेकर त्यांना साथ करीत असत. यानंतर ज्ञानोबा उर्फ ज्ञानेश्वर विठ्ठल उत्पात, बाबाजी उत्पात, वासुदेव उत्पात यांनी लावणीची परंपरा गल्ली पासून ते पुढे दिल्ली नव्हे तर साता समुद्रापार नेली. विशेष म्हणजे उत्पातांच्या लावणी गायना नंतर पु.ल देशपांडे यांनी, तुम्ही हि कला झाकून ठेवू नका जगाला कळू द्या असे उत्पात मंडळींना आवर्जून म्हटले होते.

**दिग्गजांची भरभरुन दाद**

दूर्गा भागवत, पं. भिमसेन जोशी, छोटागंधर्व, कूमारगंधर्व, जितेंद्र अभिषेकी, सुधीर फडके अर्थात बाबूजी या सारख्या दिग्गजांनी ज्ञानोबा उत्पातांच्या लावणी गायनाला भरभरून दाद दिली.

**लावणी नाही, भूलवाणी आहे**

भरत नाट्य मंदिरात छोटागंधर्व लावण्यांच्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. ते म्हणाले प्रकृती अस्वास्थ्याने मी थोडा वेळ बसेन,ऋऋज्ञानोबा, क्षमा करा. पण संपूर्ण कार्यक्रम होई पर्यंत ते जागेवरच बसुन राहिले. विशेष म्हणजे कार्यक्रमानंतर ते म्हणाले, उत्पात तूमची लावणी नाही, भूलावणी आहे अशा या उत्पातांच्या लावणीचा वारसा पंढरपूरात आजही सध्याची पुढे चालवित आहे हे विशेष.

## 'महाकिड्स'ने विविध स्पर्धा परीक्षा राबवाव्यात



### माजी आमदार राम सातपुते; महाकिड्स स्कूलचा वर्धापन दिन

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १६ मार्च-**

महाकिड्स सोलापूर जिल्ह्यात विद्यार्थ्यांना मल्लखांब प्रशिक्षण देणारी एकमेव संस्था असून. संस्थेने विविध स्पर्धा पारीक्षा राबवून मोठे अधिकारी घडवावेत. ॲड. शिवशंकर पांढरे मुलांसाठी अविरत झटत असतात त्यांना सर्वांनी सहकार्य करावे. संस्थेस कसलीही मदत लागल्यास आम्ही करू, असे प्रतिपादन माळशिरस तालुक्याचे माजी आमदार राम सातपुते यांनी नातेपुते येथील महाकिड्स स्कूलच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त घेतलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रसंगी केले.

यावेळी शिवप्रसादचे शरद मोरे, समता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. बी.वाय. राऊत, राजेंद्र पांढरे उपस्थित होते. कार्यक्रमांची सुरुवात मल्लखांब प्रात्यक्षिक आणि डिजिटल क्लासरूम उदघाट्नाने झाली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रा. शिवशंकर पांढरे यांनी प्रास्ताविक केले. बेस्ट स्टुडन्ट ऑफ दी इयर २०२५ चा पुरस्कार कृष्णराज पदमन आणि वेदिका बंडगर यांना देण्यात आला. चेस प्लेयर ऑफ दी इयर पुरस्कार आरुष गांधी यांस देण्यात आला. बेस्ट पेरेंट्स ऑफ दी इयर पुरस्कार सौ. व श्री स्वप्नाली सुभाष शिंदे आणि सौ. व श्री. आशा संतोष ढोपे यांना देण्यात आला. हाऊस ऑफ द इयर पुरस्कार सॅफ्रॉन हाऊसला देण्यात आल. बेस्ट टीचर ऑफ दी इयर पुरस्कार मिस. कोमल रणदिवे यांना देण्यात आला. तसेच मॅथ्स जिनियस ऑलिम्पियाड एक्साम प्रविण्या मिळविल्याबदल संस्थेस केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेतर्फे स्कूलला सन्मान चिन्ह देण्यात आले. यावेळी विविध वार्षिक क्रीडा स्पर्धाचे पारितोषिक वितरण झाले. कार्यक्रमास तेजस्विनी पांढरे, सचिव अलका, पांढरे, निशा सरगर, सिताराम पांढरे, डॉ. सतीश झंजे, मेजर सुरेश पांढरे, संदीप कदम, अमोल शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन आरुष गांधी, सिद्धिका मुलांनी आणि निवेदक संदिप जाधव यांनी केले.

## ब्राह्मण महासंघ बार्शीच्यावतीने विशेष योगदान दिलेल्या महिलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ मार्च-**



महिला दिनाचे औचित्य साधून ब्राह्मण महासंघ बार्शी यांचे वतीने बार्शी शहरमधील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणारे आणि विशेष योगदान दिलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मागील १५ वर्षांपासून संगीत क्षेत्रामध्ये योगदानाबद्दल सुखदा नाईक यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सुखदा नाईक या नर्सरी ते माध्यमिक विद्यालयपर्यंत विविध शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून आजवर अनेक विद्यार्थि घडविण्याचे कार्य करत आहेत तर त्या स्वराधना संगीत क्लासेस या संस्थेच्या संस्थापक संचालिका होत. या संस्थेच्यावतीने शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण दिले जाते. त्यांचे शिक्षण एम.ए. संगीत विशेष प्राविण्य शिवाजी विद्यापीठमध्ये प्रथम तर हार्मोनियम विशारद अखिल भारतीय गंधर्व विद्यालय मुंबई विशेष योग्यता असे आहे. त्यांनी आजवर सोलापूर येथे वसंतोत्सव या विशेष कार्यक्रमात आपली संगीत सेवा सादर केलेली आहे तर लातूर, माजलगाव, बार्शी, धारशिव, पुणे आकाशवाणी अशा विविध ठिकाणी आपल्या कलेचे सादरीकरण केलेले आहे तर अनेक शासकीय व सामाजिक स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून देखील कार्य केलेले आहे. सध्या त्या बार्शी येथील पोद्दार इंग्लिश मीडियम स्कूल व मेहेर इंग्लिश मीडियम स्कूल येथे संगीत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपद अर्चना धर्माधिकारी यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे पदी सोलापूर येथील प्रसिद्ध विनोदी लेखिका नलिनी क्षत्रिय या उपस्थित होत्या.



### पिलीव पत्रकार संघाच्यावतीने कल्पना सातपुते यांचा सत्कार

**पिलीव, दि. १६ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षीका कल्पना सातपुते यांना आदर्श शिक्षीका पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी पिलीव पत्रकार संघाच्याचे कार्याध्यक्ष प्रा. संजय पाटील, माजी अध्यक्ष अतुल नष्टे, प्रमोद भैस, मुख्याध्यापक शिवाजी कापसे, अतुल पाटील, माळी, वाघमारे,पाटील, मस्के, कुलकर्णी, सुरवसे उपस्थित होते.

## बाबासाहेब माने-पाटील यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ मार्च-**



माळशिरस तालुका पंचायत समितीचे पहिले सभापती कर्मवीर कै.मारुतराव उर्फ बाबासाहेब आनंदराव माने पाटील १११वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संत तुकाराम महाराज बीजे दिवशी कै.बाबासाहेब माने पाटील यांच्या जयंतीनिमित्ताने जयंती समारंभ समिती श्री साईबाबा सेवा ट्रस्ट लोकमान्य गणेशोत्सव मंडळ शिवरत्न गणेशोत्सव मंडळ व अकलूज नगर परिषद पंचायत यांच्या वतीने आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विजय चौकातील पुर्णाकृती पुतळ्यास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष फत्तेसिंह माने पाटील,माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील,हंसराज माने पाटील,सुजयसिंह माने पाटील, सौ,देवन्यादेवी शिवते सिंह मोहिते पाटील,सौ.युगंधरादेवी क्रांतिसिंह माने पाटील,मुख्याधिकारी दयानंद गोरे,उत्तमराव माने,तात्या गुळवे माजी सरपंच,विठ्ठलराव गायकवाड, विशाल मोरे, विशाल फुले,राहूल जगताप पत्रकार भारत मगर ,पत्रकार संजय लोहकरे ,उत्कर्ष शेटे चंद्रकांत भोसले शिवरत्न गणेश मंडळ, लोकमान्य गणेश मंडळ ,श्री साईबाबा सेवा ट्रस्टचे सर्व सदस्य यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्री श्री गुरुकुल येथे बक्षीस वितरण अन् आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १६ मार्च-**



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल येथे वार्षिक बक्षीस वितरण व आनंद मेळावा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे हे होते तर यावेळी उद्घाटक म्हणून नळदुर्ग पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद कांगुने, प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. आप्पाराव हिंगमिरे तर उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण घोडके-पाटील, जयश्री व्हटकर,पालक प्रतिनिधी करबसप्पा धमुरे, डॉ. हरिदास मुंडे, रुपाली सुत्रावे, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, शिवराज भुजबळ यांची उपस्थिती होती.

यावेळी उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद कांगुणे, डॉ. आप्पासाहेब हिंगमिरे या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. तर अध्यक्षीय समारोप डॉ. जितेंद्र कानडे यांनी केला. सूत्रसंचालन रामेश्वर सावंत यांनी. आभार ज्ञानेश्वर बंडगर यांनी मानले. आनंद मेळाव्यात १२२ खाद्यपदार्थ व खेळ यांचे स्टॉल लावण्यात आले होते. यातून जवळपास एक लाख वीस हजारांची आर्थिक खरेदी विक्री झाली.

**यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव**

शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावरावरील विविध स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या श्रेयस मुळे, समृद्धी माळी, फातिमा शेख, अर्णव कानडे, स्वराली गायकवाड, लक्ष्मी डोंबाळे, वरद जाधवर या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## रामेश्वर येथे अमर बलिदान दिन कार्यक्रम

### जिल्ह्यातून दहा हजार जण राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ मार्च-**

देशाच्या स्वांतत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वांतत्र्यवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा अमर बलिदान दिन कार्यक्रम दि.२३ मार्च रोजी जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात यंदा श्रीक्षेत्र रामेश्वर (तामिळनाडू) येथे आयोजित केला आहे. यासाठी सोलापूर जिल्ह्यातून दहा हजार पेक्षा अधिक जण उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास महान क्रांतिकारी शहीद स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित राहणार असून यामध्ये चंद्रशेखर आझाद यांच्या कुटुंबातील सदस्य अमित आझाद तिवारी, भगत सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य यादविंदर सिंग संधु, राजगुरू यांच्या कुटुंबातील सदस्य, सत्यशील राजगुरू, अशफाकुल्ला यांच्या कुटुंबातील सदस्य, अलक उल्ला खान, उदम सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य, हरपाल सिंग सुनम, झाशी राणी लक्ष्मीबाई यांच्या कुटुंबातील सदस्य, सुनील गोपाल राव, सुखदेव यांच्या कुटुंबातील सदस्य,अशोक थापर, कित्तूर राणी चन्नम्मा यांच्या कुटुंबातील सदस्य, सोमशेखर देसाई सांगोली रायण्णा यांच्या कुटुंबातील सदस्य, करवीरअप्पा रगन्ननवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. देश वाशियांचे वतीने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून सन्मान करण्यात येणार आहे. २३ मार्च रोजी रामेश्वरम (तामिळनाडू) येथे सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद, पसुम्पोन मुथुरामलिंगम थेवर येथे हा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम कोणत्याही राजकीय पक्ष किंवा नेत्याशी संबधित नाही. शहीद झालेले क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानांचा आदर व देशभक्ती वाढवण्यासाठी हा कार्यक्रम दरवर्षी विविध राज्यात केला जातो. गेल्या पाच वर्षांपासून अमर बलिदान कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

भारत देशासाठी महान कार्य केलेल्या महान व्यक्तीना त्यांच्या जातीमध्ये सीमित करू नये. त्यांना भारत देशाच्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी वापरावे. संविधान व निसर्ग वाचवायचा असेल तर सर्व जाती धर्माची आवश्यकता आहे. देश वाचला तर जाती, धर्म, पक्ष, परिवार, तुम्ही आम्ही वाचतो. राष्ट्रधर्म सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे हे लक्षात घेऊन, आपण एकत्र येऊन आपल्या देशाची सुरक्षितता साधावी लागेल असा संदेश सद्गुरू परमपूज्य श्री हवा मल्लीनाथ महाराज यांनी देश वाशीयांना दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सिव्हिल हॉस्पिटल येथे धनश्री परिवारांकडून अन्नदान वाटप

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

धनश्री परिवाराचे संस्थापक शिवाजीराव काळुंगे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथे रुग्णांना व नातेवाईकांना अन्नदान करण्यात आले. जनसेवेसाठी तत्पर असणारे धनश्री व सीताराम परिवार हा नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर राहिला आहे. धनश्री व सिताराम परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अन्नदानाचा उपक्रम हाती घेण्यात आला. यावेळी धनश्री मल्टीस्टेट भंडारकवठे शाखेचे शाखाधिकारी दादासाहेब धसाडे, सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सिद्धेश्वर अडगळ, धुळखेड शाखेचे शाखा अधिकारी रवी अडोळे, तामलवाडी शाखेच्या शाखाधिकारी पोर्णिमा शिंदे, राघवेंद्र पाटील, भगवंत बिराजदार, गजानन स्वामी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



### युवक क्रीडा मंडळाच्या जयंती उत्सव अध्यक्षपदी प्रेम तोरणे

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

भवानी पेठ मड्डी वस्ती येथील युवक क्रीडा मंडळाची विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त बैठक मंडळाचे ज्येष्ठ संस्थापक अध्यक्ष कि.डी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन या बैठकीत मंडळाचे नूतन अध्यक्षपदी प्रेम तोरणे व सरचिटणीसपदी मारुती गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली. नूतन पदाधिकारी पुढीलप्रमाणे कार्याध्यक्ष प्रतीक कांबळे, उपाध्यक्ष प्रसाद कांबळे शशी माने, सहसरचिटणीस कांचन कांबळे, खजिनदार केतन कांबळे, सोशल मीडिया प्रमुख सुबोध कांबळे, मिरवणूक प्रमुख अक्षय तिकोटे आदर्श कांबळे, धम्मा चंदनशिवे, सौरव गायकवाड, किसन कांबळे, सुमित कांबळे, दिवित बनसोडे सुशांत सोनवणे, राहुल सीताफळे, अजय सकट, सल्लागार कि.डी. कांबळे, सुनील कांबळे, ज्ञानेश्वर तिकोटे, तानाजी गायकवाड, बाळासाहेब म्हस्के, गौतम कांबळे, लखन येरवडे, जनार्दन मोरे, दयानंद डावरे, राहुल बनसोडे, व विधी सल्लागार अडवोकेट वितीन गायकवाड अशी निवड करण्यात आली. यावेळी सुनील कांबळे, लखन गवळी, लखन येरवडे, केतन कांबळे, जनार्दन मोरे, सिद्धार्थ सिताफळे, कांचन कांबळे, राहुल बनसोडे, मारुती गायकवाड,चंद्रकांत गायकवाड,गौतम कांबळे, नागेश कांबळे, विनोद कांबळे, ज्ञानेश्वर तिकोटे, तानाजी गायकवाड, संतोष सोनवणे, अंकुश गायकवाड, भिमा कांबळे, सुभाष येरवडे, विनीत गायकवाड, महादेव चंदनशिवे, शुभम गायकवाड, प्रतीक कांबळे, आदित्य कांबळे, ओम कांबळे, सुशांत सोनवणे उपस्थित होते.

### ट्रॅक्टर खरेदीसाठी पाच लाखांती मागणी करून सासरी विवाहितेचा छळ

**बार्शी, दि. १६ मार्च-**

हुंड्यात कमी पैसे दिल्याने ट्रॅक्टर खरेदी साठी पाच लाखांच्या मागणीने सासरी विवाहितेचा सतत छळ केल्याचा आरोप विवाहितेने पतीसह सासू, सासरे व दोन नणंदा यांच्या विरुध्द केला आहे.

निकिता किरण गायकवाड (वय २३ सध्या रा बार्शी ) यांनी बार्शी पोलीस ठाण्यात सासरच्या पती किरण रमेश गायकवाड, सासु अनिता रमेश गायकवाड, सासरे रमेश सदाशिव गायकवाड सर्व रा. देवळाली, ता. जि. धाराशिव, तर नणंद सुप्रिया अमोल गंगावणे व नेहा बालाजी सावंत या पाचजणांविरुद्ध फिर्याद दिली आहे

निकिता यांचे लग्न ६ जून २०२१ रोजी देवळाली, जि. धाराशिव येथे किरण रमेश गायकवाड यांच्यासोबत बौद्ध पद्धतीने झाले होते. सुरुवातीचे तीन महिने सासरच्या लोकांचा व्यवस्थित वागणूक मिळाली. मात्र, १० सप्टेंबर २०२१ पासून सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी त्रास देण्यास सुरुवात केली. विवाहात दिलेल्या १० हजार रुपयांची रक्कम कमी असून, नवीन ट्रॅक्टरसाठी माहेरहून ५ लाख रुपये आणावेत, असा तगादा लावण्यात आला.

तक्रारीनुसार, पती किरण रमेश गायकवाड यांनी वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण केली. सासरे रमेश गायकवाड दारु पिऊन पैशांसाठी तगादा लावत होते. सासू अनिता गायकवाड व दोन नणंदा सुप्रिया गंगावणे व नेहा सावंत यांनी अपमानास्पद शब्दांत टोमणे मारुन मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. निकिता यांना वेळोवेळी उपाशी ठेवण्यात आले, तसेच स्वयंपाक चांगला येत नसल्याच्या कारणावरुन त्यांना सतत टोचून बोलण्यात आल्याचे म्हटले आहे.

या अत्याचारांविरोधात निकिता यांनी सुरुवातीला गप्प राहणे पसंत केले. मात्र, परिस्थिती न बदलल्याने त्यांनी पाच महिन्यांनी आई-वडिलांना हा प्रकार सांगितला. आई-वडिलांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु सासरच्या लोकांनी त्यांना उलट शिवीगाळ करत धमक्या दिल्याचे म्हटते आहे. अखेर ६ डिसेंबर २०२४ रोजी निकिता यांनी सासर सोडून माहेरी परतण्याचा निर्णय घेतला. निकिता यांना तीन वर्षांची मुलगी असूनही पतीकडून व सासरच्या लोकांकडून कोणतीही मदत मिळत नव्हती. शेवटी, सातत्याने होत असलेल्या छळाला कंटाळून त्यांनी बार्शी पोलीस ठाण्यात पतीसह पाचजणांविरुद्ध तक्रार नोंदवली. पोलीस प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# राष्ट्र, समाज निर्मितीत स्वर्णलता भिशीकर यांचा मोठा वाटा

## ज्ञान प्रबोधिनीतील श्रद्धांजली सभेत मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना; ध्वनीचित्रफीतीतून श्रद्धांजली





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

सर्वसामान्यांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी सतत प्रयत्न करणाऱ्या डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी राष्ट्र निर्माण, समाज निर्मिती आणि आत्मज्ञानासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्याकडे परहितनिती होती. त्यांच्यात राष्ट्रसंतांचे गुण होते. यामुळे त्या समोरच्याला आपलेसे करुन प्रबोधिनीच्या कार्यात समावून घ्यायच्या अशा भावना ज्ञान प्रबोधिनी येथे आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत मान्यवरांनी व्यक्त केल्या. श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना अनेकांना भावना अनावर झाल्या. कित्येकांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली. यावेळी उपस्थितांच्या डोळ्याच्या कडाही पाणावल्या.

यावेळी दैनिक तरुण भारतचे चेअरमन व ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, कार्याध्यक्ष गिरीश बापट, कार्यवाह सुवर्णा गोखले, सहकार्यवाह अमोल गांगजी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी स्वर्णलता भिशीकर यांच्या कार्यावर ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली. अध्यात्मिक अधिष्ठान असलेल्या स्वर्णलता भिशीकर यांच्यात मैत्रीचा भाव होता. कल्पवृक्षासारखे त्यांचे काम होते. त्यांनी स्वत:साठी काहीच मागितले नाही. अपार कष्ट आणि श्रम घेऊन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. संत साहित्याबरोबरच हिंदी गाणीही त्यांना अवगत होत्या. त्यांच्याबरोबर अनेकदा हिंदी गाण्यांच्या भेंड्याही आम्ही लावल्या होत्या, अशी आठवण ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी करुन दिली.

मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांवर प्रभुत्व असलेल्या भिशीकर यांचे अध्यात्मिक अधिष्ठान मोठे होते. साक्षरता, बाल कामगार, साखर शाळा सुरु करुन अक्षरज्ञान देण्याचे काम त्यांनी केले. अंग तापाने फणफणलेले असतानाही नवीन अभ्यासक्रमातील बदल तपासून त्यात दुरुस्त करण्याचे काम त्या करत होत्या, अशी आठवण अमोल गांगजी यांनी करुन दिली. यावेळी सुयश गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष केशव शिंदे यांनी सुयश गुरुकुल व ज्ञान प्रबोधिनी यांच्यामध्ये बहिण-भावाचे नातं होतं, असे स्ववर्णलता भिशीकर मानत असत. तेच नातं आतापर्यंत जपण्यात आलं. आता पुढेही हाच भाव जपला जाणार आहे, असे सांगितले. यावेळी अग्रजीत वझे, प्रणिता मिटकर, कौस्तुभ गोडबोले, मीरा लिमये, अरुंधती पत्की, कुलकर्णी, सुधाकर देशमुख, आनंद भिशीकर, डॉ. माधवी रायते, कवी दीपक कलढोणे, अश्विन भोंडवे, स्नेहलताई पेंडसे, सुहास देशपांडे यांच्यासह मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करुन श्रद्धांजली अर्पण केली. संगीता इंदापुरे, समरेखा दबडे यांनी स्वर्णलता भिशीकर यांनी रचलेल्या गीतांचे गायन केले. कार्याध्यक्ष गिरीश बापट, कार्यवाह सुवर्णा गोखले यांनी स्वर्णलता भिशीकर यांच्या कार्याच्या विविध पैलूंचा उलगडा करत त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांच्या उत्तुंग कार्याचे साक्षीदार होता आले आणि त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाल्याचे समाधानही व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. अपर्णा कल्याणी यांनी केले.

आयोध्या येथील श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद गिरीजी यांनी स्वर्णलता भिशीकर यांच्या कार्याची उजळणी करत असताना त्यांनी केलेल्या अध्यात्मिक, ध्यान, शिक्षण, बालकामगार प्रकल्प, अनुवाद, गीत रचना, कविता लेखन यासह ज्ञान प्रबोधिती व हराळी संस्थेतील कार्याचा आढावा मांडला. यावेळी त्यांना भावना अनावर झाल्या होत्या. त्या आपल्यात नसतील पण त्यांचे कार्य आणि प्रेरणा आपल्याला बळ देत राहिल, अशा भावना ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून व्यक्त केल्या. यावेळी भारती ठाकूर यांनीही ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण करत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# कुडीसहित झाला गुप्त तुका... या अभंग गायनात पुष्पवृष्टी

### कासेगावातील कुंभारवाड्यात संत तुकारामांचा वैंकुठगमन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१६ मार्च -**

सुमारे दोनशे वर्षाची परंपरा असलेला कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील कुंभारवाड्यातील संत तुकाराम महाराजांचा वैकुंठगमन सोहळा आज दि.१६ मार्च रोजी आम्ही जातो तुम्ही कृपा असू द्यावी । सकळा सांगवी विनंती माझी ।। या अभंग गायनात संत तुकोबारायांचा जयजयकार करीत पुष्पवृष्टीने साजरा झाला.

येथील कुंभारवाड्यात सुमारे दोनशे वर्षापूर्वी देहूकर फडाचे निष्ठावंत वारकरी साक्षात्कारी सत्पुरूष तात्यामहाराज कासेगावकर यांनी हा उत्सव सुरू केला. त्यानंतर त्यांचे वंशज वै. हभप मधुकरबुवा जोशी यांनी हा उत्सव कुंभार परिवार व ग्रामस्थांच्या सहय्याने सुरू ठेवला. त्याच परंपरेतून त्यांचे चिरंजीव हभप श्याम महाराज जोशी यांचे आज दि. १६ मार्च रोजी सकाळी १० वाजता बीजेनिमित्त गुलालाच्या कीर्तनाची सेवा झाली. यावेळी वारकरी, भाविक व गामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उत्सवानिमित्त गावातील घराघरातून भाकरी व आमटीच्या प्रसादासाठी शिधा एकत्रित करण्यात आला. महिला भाविकांनी तयार केलेल्या भाकरी कुंभारवाड्यात एकत्रित करण्यात आल्या. जमलेल्या दाळीची चमचमीत आमटी करण्यात आली. या आमटी भाकरीच्या प्रसादाचा आस्वाद घेण्यासाठी गावातील प्रत्येक घरातून भाविक कुंभारवाड्यात हजर होता.

संत तुकाराम महाराजांच्या बीजेनिमित्तच्या या फ३सादातील आमटीची चव पुन्हा वर्षभर कोणत्याच कार्यक्रमात चाखायला मिळत नसल्याची भावना भाविकातून असल्याने प्रसादासाठी अबालवऋधंनी गर्दी केली होती. रात्री नऊ वाजता हभप रमेशबुवा शिवापूरकर यांचे काल्याचे कीर्तन होऊन या एकदिवसीय उत्सवाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी धनंजय कुंभार, बबन कुंभार, श्रीराम कुंभार, नितीन वाडकर, गोरख वृडकर, हभप धर्मराज वाडकर आदीसह अन्य ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.




कासेगवाच्या साक्षी कुंभार हिने काढलेली रांगोळी.

# शहरात तुकाराम बीज उत्साहात साजरी

### विठोबा रुक्माई अन ज्ञानोबा तुकारामचा घुमला निनाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १६ मार्च**

श्री जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बिजोत्सव निमित्त सोलापूर शहरातील अशोक चौक येथील श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज मंदिर येथे सकाळी १० ते १२ हभप विष्णूपंत महाराज मोरे यांचे गुलालाचे किर्तन पार पडले. त्यानंतर दुपारी तीन महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी संत ज्ञानोबा तुकाराम... विठोबा रुक्माईचा जयघोष करण्यात आला. मोठा उत्साहपूर्ण वातावरणात हा सोहळा शेकडो आबालवृद्ध भाविकांनी याची देही याची डोळा अनुभवला.

दरम्यान, तुकाराम महाराज बीज सोहळा निमित्त जगद्गुरु तुकाराम महाराज मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. ९ मार्चपासून १६ मार्चपर्यंत हा सप्ताह करण्यात आला. यामध्ये रोज विविध महाराज मंडळींची कीर्तन तसेच भजनी मंडळांचा हरी जागर संपन्न झाला. या सोहळ्यासाठी हभप चैतन्य महाराज मोरे, भगवंत महाराज मोरे, हरिहर मोरे, केशव मोरे, प्रभाकर मोरे, मुकुंद मोरे, निवृत्ती मोरे, अनिल मोरे, विकी सूर्यवंशी, किशोर मोरे, विशाल मोरे उदय मोरे, भाऊ मोरे, किशोर मोरे आदींनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी संत तुकाराम महाराजांच्या बिज उत्सवानिमित्त भाविक भक्त आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित होते.






# अरण्यऋषींच्या संगतीत साजरा झाला अबिर गुलाल; टिळा रंगपचमीचा अनोखा उत्सव रंगला

### मोहक, सुखद, नैसर्गिक रंगाबरोबर घडली शाश्वत मुल्यांची पेरणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

"तब्बल साठ वर्षे मी जंगलात फिरलो, रमलो, सहकुटुंब वास्तव्य केले.. बऱ्याच गोष्टी समजून घेता आल्या, अजुनही वाचन आणि अभ्यास सुरुच आहे. त्यामुळे आजवरचा अनुभव म्हणून सांगतो, आपण शाश्वत मुल्य जपले, नैसर्गिक जीवन जगले तर निसर्ग आपल्याला भरभरून देतो. निसर्गाच्या विपरित वागू नका. त्याची काळजी घ्या त्यातच आपले सर्वांचे हित आहे. रंगपंचमीचा रंग खेळताना देखील निसर्गाचे नियम पाळा!" असे कळकळीचे भावोद्गार काढत पद्मश्री अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी उपस्थितांशी हितगूज साधला.

निमित्त होते अबीर गुलाल रंगोत्सवाचे. यावेळी पद्मश्री अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या सोबतीने टिळा लावून व गालावर नैसर्गिक रंगांच्या छटा उमटावत रविवारी पर्यावरण पुरक रंगोत्सव साजरा करण्यात आला. त्यात अरण्यऋषींशी हितगुज साधण्याचा दुग्धशर्करा योगही जुळून आला.हा कार्यक्रम सोलापुरातील ज्येष्ठ नागरिक संघाची संयुक्त शिखर समिती आणि आदर्श ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाच्या विद्यमाने अक्कलकोट रोड स्थित उद्यानात पार पडला. हेरिटेज मणिधारी सांस्कृतिक मंडळाच्या सहकार्याने अन आबालवृद्धांसह महिलांच्या लक्षणीय सहभागाने त्याला हर्षोल्हासाचे, देखणे व संस्मरणीय असे स्वरुप प्राप्त झाले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. आदर्श ज्ये. ना. संघाचे अध्यक्ष विजयकुमार भोसले यांनी स्वागतपर संबोधन केले तर प्रास्ताविक शिखर समितीचे मुख्य समन्वयक गुरुलिंग कन्नुरकर यांनी केले. मंचावर शासकीय संनियंत्रण समिती सदस्य महादेव माने, शिखर समितीचे उपाध्यक्ष अरुण कदम, सचिव मन्मथ कोनापुरे, सोलापूर विकास मंचचे योगीन गुर्जर, सोलापूर ज्ये. ना. संघाचे अध्यक्ष घनश्याम दायमा, कर्णिकनगर संघाचे अध्यक्ष कृष्णात देवकर, समर्थ संघाचे अध्यक्ष बाबूराव नरुणे, रमेश खाडे, मणिधारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष गजानन होनराव, माजी अध्यक्ष नवीन तापसे, सुरेशराव येळमेली,स्वप्नील सोलनकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश आळगी, सचिन पतंगे, सतीश नोमूल, अंकुश माने, मल्लप्पा मुळजे, सिद्रामप्पा गोविंदे, त्र्यंबक जाधव, शिवाजीराव क्षीरसागर, राहुल म्हमाणे, रविंद्र मच्छी, अंबादास खराडे, शंकरराव गाडी, श्रीनिवास चिट्टमपल्ली, श्रीकांत चिट्टमपल्ली यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संजय जोगीपेटकर यांनी केले.



### सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात
# काँक्रीट मिक्स डिझाईन कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ मार्च -**

एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि अल्ट्राटेक सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सिव्हिल इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी काँक्रीट मिक्स डिझाईन या विषयावर एक दिवसीय प्रायोगिक कार्यशाळा पार पडली.

ही कार्यशाळा एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात पार पडली. कार्यशाळा सकाळी १० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यशाळेला वेगवेगळ्या डिप्लोमा आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हिल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेत काँक्रीट मिक्स डिझाईनच्या तांत्रिक बाबी, योग्य मिश्रणाचे प्रमाण, प्रत्यक्ष मिक्स डिझाईन तयार करणे, तसेच त्याचा परीक्षक आणि बांधकाम क्षेत्रातील महत्त्व याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. अल्ट्राटेक सिमेंटचे तज्ञ अभियंता बाळकृष्ण कुलकर्णी आणि प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे संयोजन प्रा. वाय. एन. बनसोडे यांनी केले. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि बांधकाम क्षेत्रातील नवीन संकल्पनांची माहिती मिळावी, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेबद्दल समाधान व्यक्त केले असून, अशा प्रकारच्या उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन वारंवार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या उपक्रमासाठी प्राचार्य. एस डी नवले आणि कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांचे मार्गदर्शन लाभले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर

# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## क्राईम वृत्त...



### विवाहितेचा छळ; सासरकडील मंडळींवर चार वर्षांनी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

माहेर कडून ४ लाख रुपये घेऊन ये तरच तुला आम्ही नांदऊ, तुझी आमच्या घरी नांदायची लायकी नाही.असे म्हणून मारहाण व जाचहाट केल्याप्रकरणी विवाहित महिलेने चार वर्षानंतर सासरकडील मंडळींवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या घटनेची हकीकत अशी की,ऐश्वर्या प्रसाद नांदगावकर (रा.दक्षिण कसबा,झुंजे बोळ,सोलापूर) यांचे ८ फेब्रुवारी २०२१ रोजी प्रसाद यांच्याबरोबर लग्न झाले होते.लग्न झाल्यानंतर सासरी नांदत असताना सासू शैलजा,सासरे मल्लिकार्जुन यांनी फिर्यादीस लग्नात काही हुंडा आणला नाही,मानपान केला नाही,सोन्याचे दागिने मिळाले नाही. त्यामुळे हे लग्न आम्हाला मान्य नाही.तू तुझ्या पत्नीला माहेरकडून सोन्याचे दागिने व ४ लाख रुपये घेऊन येण्यास सांग.असे पती प्रसाद यास सांगून त्रास देण्यास प्रोत्साहित केले.तसेच पती प्रसाद याने बेंगलोर येथे प्लॉट घेण्यास माहेरी सांग,सोन्याचे दागिने व ४ लाख रुपये घेऊन ये, तरच तुला नांदवण्यास तयार आहे.असे म्हणून वेळोवेळी शारीरिक व मानसिक त्रास दिला.अशी फिर्याद पीडित विवाहित महिलेने दिली.याप्रकरणी पतीसह सासू-सासरे व नंणद पूजा (रा.सर्वजण गुरुवार पेठ,सोलापूर) यांच्या विरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.अधिक तपास सहाय्यक फौजदार भालशंकर हे करत आहेत.

### बायको निघून गेल्याने रागाच्या भरात घेतला गळफास

**सोलापूर, दि. १६ मार्च-**



बायकोबरोबर घरगुती भांडण झाल्याने बायको निघून गेली. त्यामुळे रागाच्या भरात नवऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.ही घटना रविवारी दुपारी चारच्या सुमारास घडली.या घटनेची हकीकत अशी की,शाहरुख सादिक सय्यद (वय-२४,रा.कुरबान हुसेन नगर,सोलापूर,सध्या स्वागत नगर सोलापूर) याचे रविवारी दुपारी पत्नीबरोबर भांडण झाले होते.या भांडणात पत्नी निघून गेल्याने शाहरुख याने रागाच्या भरात ओढणीच्या साह्याने लाकडी वाशाला गळफास घेतला.ही घटना नातेवाईकांना समजल्यानंतर बेशुद्ध अवस्थेत त्यास खाली उतरून उपचाराकरिता वडिलाने शासकीय रुग्णालयात दाखल केले.परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल हॉस्पिटल मध्ये झाली आहे.









# गॅस पाईपसाठी जुळे सोलापुरातील चांगले रस्ते खोदले

## महापालिकेचा कारभार रामभरोसे; रस्ते खोदाई होते पण खड्डे बुजवताना थुका लावण्याचा प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ मार्च -**

**जवळपास गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेवर प्रशासक राज असल्याने महापालिकेच्या कारभाराला कोणी वालीच नसल्याचे स्पष्ट होत आहे. नागरी समस्यांना प्रशासन भीक घालत नसल्याचा प्रकार सर्रासपणे सुरु आहे. महापालिकेचा नगरअभियंता विभाग तर केवळ चिरिमिरीसाठीच आहे का असा प्रश्न आता सामान्यांना पडत आहे. कारण गेल्या महिन्यापासून गॅस पाईप टाकण्यासाठी जुळे सोलापुरातील अनेक रस्ते सर्रासपणे खोदले जात आहेत. कित्येक दिवसांपासून खोदलेले रस्ते लवकर बुजविले तर जातच नाहीत पण महिन्यानंतर बुजवलेच तर थुका लावण्याचा प्रकार सुरु आहे. खोदलेला राडारोडा तसाच पुन्हा खड्ड्यावर सरकवून गॅस कंपनी कामचुकारपणा करते आहे. विशेष म्हणजे महापालिकेची संबंधित यंत्रणा मात्र याकडे जाणीवपूर्वक अन् अर्थपूर्ण दुर्लक्ष करते का अशी शंका निर्माण ेत आहे.**

काही वर्षापूर्वी रिलायन्सची केबल टाकण्यासाठी शहरातील चांगले रस्ते खोदले होते. आता गॅस पाईप टाकण्यासाठी चांगले रस्ते खोदले जात आहेत. विशेष म्हणजे मुख्य रस्त्यावरही दिवसा वाहतूक सुरु काळात रस्ते खोदाई होते. पण रस्ते लवकर बुलविले जात नाहीत. खोदाई करणारे लोक सांगतात महापालिकेनेच परवानगी दिलेली आहे. पण महापालिकेचा संबंधित विभाग मात्र याकडे डोळेझाक का करतो हे अनुत्तरीच राहते. जुळे सोलापुरातील सिंधु विहार कॉलनीत तर महिन्यापासून खोदलेले रस्ते जैसे थे आहेत. या खड्ड्यात कोणी पडले आणि दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण? कारण यापूर्वी याच कॉलनीत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी खोदलेल्या खड्डयात एका मुलाचा दुर्दैवी मृत्य झालेला होता. नगरअभियंता विभागाने याप्रकाराकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. नूतन आयुक्त यात नक्कीच लक्ष घालतील अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

सोलापूर महापालिकेचा कारभार खरोखर रामभरोसे चालतो का, अशी शंका सोलापूरकरांना सातत्याने येते. कारण सोलापुरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे, बहुतांश भागात रस्त्यावर अतिक्रमणे तर बांधकाम परवाना आणि प्रत्यक्ष बांधकाम वेगळेच, शहरातील जवळपास ऐंशी टक्के मिळकतींना वापर परवानाच नाही. गावठाणासह विजापूर रस्ता, होटगी रोड या प्रमुख मार्गांवर रस्ता काबीज करून राजरोसपणे स्पीकर लावून व्यवसाय करणारे ढिगांनी अनधिकृत फेरीवाले आणि भाजी विक्रेते, सर्वच भाजी मंडई ओस आणि भाजी विक्रेते मात्र रस्त्यावर बसतात, शहरातील अपवाद वगळता अनेक इमारतींमध्ये पार्किंगच्या जागेचा कमर्शियल वापर, बहुमजली इमारतींमध्ये फायर एनओसी नाही, शेकडो घंटागाड्या मात्र आजही अनेक भागात रस्त्यावर कचऱ्याचे ढिग, शहरातील प्रत्येक मिळकतीवर दररोज दोन रुपये सेस घेवून घंटागाड्या दररोज सकाळी वेळेवर येत नसल्याची ओरड अन् नागरिकांच्या घरातच कचरा साठतो. महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागातच अधिकारी, कर्मचाऱ्यांची बोगस बांधकाम परवाना देण्याची समांतर यंत्रणा, हा प्रकार उघडकीस आल्यामुळे तीन अधिकारी व कर्मचारी पोलिसांच्या अटकेत होते. डबघाईला आलेली महापालिकेची शहर परिवहन बससेवा, परिवहनमध्ये झालेला लाखो रुपयांचा डिझेल घोटाळा, कोराना काळातील खरेदीत गैरप्रकार, अनेकांच्या खातेनिहाय चौकशा पण पुढील कारवाई गुलदस्त्यात, पार्क चौकातील उलन मार्केट जागेची आयुक्तांच्या परस्परच विक्री केल्यामुळे भूमीमालमत्ता विभागाती अधिकारी, कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल, स्मार्ट सिटी अंतर्गत झालेल्या अनेक कामांची दुर्दशा, प्राणीसंग्रहालयाची मान्यता रद्द झाली आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

२०१८ साली पंतप्रधान मोदींनी उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे भूमीपूजन करूनही अद्याप काम अपूर्णच आहे. तत्कालीन आयुक्त शिवशंकर यांनी त्यांच्या कार्यकाळात सुमारे एक हजाराच्यावर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला पण त्यानंतर अनेकांना होलसेल पध्दतीने बढतीचा प्रकार हस्यास्पद होता. याच आयुक्तांच्या कार्यकाळात बोगस नळ सर्व्हे झाल्यानंतर सुमारे ५० हजाराच्यावर बोगस नळ संख्या सापडली पण कारवाई मात्र रखडली. वर्षोनुवर्ष एकाच विभागात एकाच टेबलवर काम करणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने गैरप्रकाराला खतपाणी घालण्याचा प्रकार सुरु, दरवर्षी महापालिकेचे सुमारे हजार ते बाराशे कोटींचे बजेट सादर होते परंतु बजेट उद्दिष्टयपूर्ती मात्र पन्नास टक्क्यांच्या आतच असते. शासनाकडून दरमहा मिळणाऱ्या जीएसटी अनुदानातून अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार न चुकता तारखेला होतात मग बजेट उद्दिष्ट पूर्ण केले काय आणि न केले काय काहीच फरक पडत नसलयाचा प्रकार अनेक वर्षापासून राजरोसपणे सुरु आहे. पालिकेच्या नूतन आयुक्तांनी कामाची सुरुवात चांगली केली आहे, पण आयुक्तांनी शहरात दररोज किमान एक फेरफटका मारून पाहणी करणे तसेच पालिकेच्या सुरु असलेल्या कामांच्या ठिकाणी अचानक भेटी देण्याची गरज आहे. महापालिकेच्या मागील कारभाराची माहिती घेवून पालिकेत असलेल्या ढिगभर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून चांगले काम करून घेणे अपेक्षित आहे.

### जनता दरबार आठवड्यातून एक ऐवजी किमान तीन दिवस असावा

मनपा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा असलेले नगरसेवक तीन वर्षांपासून नाहीत. त्यामुळे नागरिकांना थेट प्रशासनाकडे समस्या सांगाव्या लागतात. नगरसेवक हे नागरिकांसाठी पूर्वी चोवीस तास उपलब्ध असायचे पण आता प्रशासनाच्या मर्जीवर चालते. नागरिकांची कामे पालिकेच्या विविध विभागात होत नसल्याने नागरिकांचा ओढा थेट आयुक्तांकडे जाण्याचा असतो. त्यामुळे आयुक्तांनी नागरिकांसाठी आठवड्यातून किमान तीन दिवस निश्चित वेळ दिल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. दिव्यांग, ज्येष्ठांसाठी इंद्रभुवन इमारतीत तळमजल्यावरच आयुक्तांचे कार्यालय असणे देखील गरजेचेच आहे.

# विवाह संस्था टिकण्यासाठी संस्कार, संयम आणि समर्पण त्रिसूत्री आवश्यक

## कौस्तुब ब्राम्हण वधू-वर सूचक केंद्र पुस्तक प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १६ मार्च-**

प्राचीन भारतातील कौटुंबिक रचना एकत्र पद्धतीची होती. विवाह संस्था याच एकत्र कौटुंबिक पद्धतीवर कार्यरत होती. विवाह संस्था टिकवण्यासाठी संस्कार संयम आणि समर्पण यांच्या आवश्यकता असून ब्रिटिशांनी या पारंपरिक गोष्टींवर आघात करून कौटुंबिक रचना उध्वस्त केली. त्यामुळे आजच्या घडीला विवाह संस्थेची दशा आणि दिशा बिघडलेली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी किर्लोस्कर सभागृहात आयोजित केलेल्या कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सुचक केंद्र आयोजित पुस्तक प्रकाशनाप्रसंगी विवाह संस्था दशा आणि दिशा या विषयावर केले.

यावेळी व्यासपीठावर देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तोजक संस्थेचे अध्यक्ष डॉ श्रीकांत येळेगावकर, सहयोग ब्राह्मणसेवा मंडळ अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, तसेच कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सुचक केंद्र अध्यक्ष रवींद्र नाशिककर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी या कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलन आणि भगवान



परशुराम यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांचा शाल पुष्पहार भेटवस्तू सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दरम्यान, विवेक घळसासी यांनी आपल्या रसाळ वाणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत विवाह संस्था आणि कौटुंबिक व्यवस्था याबद्दल अधिक माहिती देताना ते म्हणाले, प्रत्येक भारतीयांचे शक्तिकेंद्र हे कौटुंबिक व्यवस्था होती. ब्रिटिशांनी लिंग भेद आणि स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत भारतीय पारंपारिक कौटुंबिक व्यवस्था उध्वस्त करण्याचे काम केले. त्यामुळे प्रत्येक भारतीयांची शक्ती केंद्र नष्ट झाली. यातूनच घटस्फोट आणि वेगळ्या राहण्याच्या पद्धती सुरू झाल्या. आजच्या घडीला ग्रामीण भागातील जीवन पद्धती ही पूर्वापारपणे चालत आलेल्या रूढी परंपरेनुसार सुरू आहे. ग्रामीण भागातील स्त्री अंतरंग व बाह्यरंगांची स्वच्छता केल्याशिवाय चूल पेटवत नाही. चूल पेटवल्यानंतर त्यामध्ये नैवेद्याची आहुती दिली जाते. ही परंपरा वर्षानुवर्षे चालत आली आहे. परंतु आजच्या स्त्रीला याबाबत कितपत माहिती आहे. हा संशोधनाचा विषय आहे. मात्र, आजच्या या इंग्रजीच्या नावाखाली अनेकांनी आपले धार्मिक आचरण विसरण्याचे काम सुरू केले आहे. केवळ दिखावा करण्यासाठी अनेकांनी धर्म टिकवण्याचे नाटक सुरू केले आहे. मात्र, वस्तुस्थिती पाहिली असता, अनेकांना मंत्रोच्चार देखील येत नाहीत. सूर्यनमस्कार तसेच वेद उपनिषद यांची बैठक देखील माहित नाही. असे पालक सुजाण पिढी असे घडू शकतात. त्यासाठी कौटुंबिक जीवन पद्धती सुधारली पाहिजे शिक्षा परंपरा मजबूत केली पाहिजे. तरच नवीन पिढी सुजाण आणि सजग घडेल असा आत्मविश्वास विवेक घळसासी यांनी व्यक्त केला.

लग्नामध्ये सप्तपदीचे महत्व आहे. परंतु या सप्तपदी मानवाच्या जीवनामध्ये देखील महत्त्वाच्या भूमिका बजावतात. मानवी जीवनामध्ये विवाह आणि कौटुंबिक संस्था उध्वस्त होत चाललेल्या आहेत. त्या पुन्हा टिकवण्यासाठी संस्कार, संयम, समर्पण, त्याग आणि सदभाव मूल्यांची नितांत गरज आहे. असे डोळ्यात जळजळीत अंजन घालणारे निरूपण ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी विवाह संस्था दशा आणि दिशा या विषयावर केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले. कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सुचक केंद्राच्या कौस्तुभ या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. शुभदा देशपांडे यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा. नरेंद्र काटीकर यांनी केले. याप्रसंगी गिरीष सहस्त्रबुद्धे, सुनील देसाई, अश्विनी भंडारगावठेकर, श्रीकांत कुलकर्णी, शुभदा देशपांडे, यांची कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सुचक केंद्र कार्यकारी संचालक यांची निवड करण्यात आली. त्यानंतर या नूतन संचालकांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रवींद्र नाशिककर मित्रपरिवार व रसिक श्रोते उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे विजयराव कुलकर्णी, अनिता कुलकर्णी, किशोरी भट, सुप्रिया जोशी, सुशांत कुलकर्णी, उदय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

### यांना प्राप्त झाला जीवनगौरव पुरस्कार


वधू वर सूचक केंद्रांच्या माध्यमातून अनेकांच्या लग्नगाठी जुळवेलल्या गोविंद कुलकर्णी आणि प्रकाश कुलकर्णी यांचा कौस्तुभ जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप शाल पुष्पहार सन्मानचिन्ह रोख रक्कम आणि भेटवस्तू असे होते. प्रमुख मान्यवर ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांच्या हस्ते सत्कारमूर्तींचा सन्मान करण्यात आला.

# बॅडमिंटन खेळताना कट लागल्याने मारहाण

## तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च -**

लहान मुले बॅडमिंटन खेळत असताना कट का मारला.या कारणावरून शिवीगाळ करत जिवे ठार मारण्याची धमकी देत लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १० मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी अमर श्रीनिवास जोरीगल (वय-२१,रा.ब विभाग मॉसाहेब विडी घरकुल,कुंभारी) यांनी वळसंग पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून शुभम नागेश पुल्ली,नागेश पुल्ली,सागर पुल्ली (रा. विडी घरकुल कुंभारी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी व फिर्यादीचा मित्र असे दोघेजण मिळून त्यांच्या जवळील एका दुचाकीवरून क्रांती चौकाकडे रोडवरून जात असताना शुभम याने फिर्यादी यांना म्हणाला,लहान मुले बॅडमिंटन खेळत असताना कट का मारला? या कारणावरून शिवीगाळ करत दमदाटी करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच त्यावेळी नागेश व सागर यांनी देखील फिर्यादीस दमदाटी करून लाथाने व हाताने मारहाण करू लागले. त्यावेळी शुभम याने तुला फार मस्ती आली आहे. आता तुला सोडणार नाही.असे म्हणून रस्त्यावर पडलेल्या काठीने डोक्यात मारून जखमी केले.तसेच फिर्यादी यांचा मित्र रमेश येमुल यांना देखील त्यांच्या घरी जाऊन त्याला देखील जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची नोंद वळसन पोलीस ठाण्यात झाली असून,या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक अष्टगी हे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५८

**प्रतिपादी वाळी ।**
**एका पुजी एका छळी ।।**

कोणाला साधू म्हणावे, कोणाला संत म्हणावे, कोणाला वैष्णव म्हणावे, हे सांगण्याची वेळ साधुसंतावर यावी याला आपल्यापैकीच कोणीतरी कारणीभूत आहेत. काही ढोंगी लोक स्वार्थापोटी या सांप्रदायात प्रवेश करतात आणि साधुसंतांना, वैष्णवांना बदनाम करतात. म्हणून खऱ्या साधु, संतांची, वैष्णवांची परिभाषा सांगण्याची वेळ संतावर येते. वारकरी सांप्रदायाचा आधार हा समता असल्याने भेदजन्य दृष्टीला येथे स्थान नाही. एकाला जवळ करायचे, एकाला दूर करायचे, एकाची सेवा करायची, एकाला छळायचे, एकावर प्रेम तर दुसऱ्यावर रोष हे या सांप्रदायाला मान्य नाही. सर्व जीवमात्रात एका भगवंताला पाहाणे, सर्व जीवमात्रांना आपले समजणे, सर्व जीवांवर प्रेम करणे, हे या सांप्रदायाकडून अपेक्षित आहे. जो व्यक्ति या सांप्रदायाची ही अपेक्षा पूर्ण करीत नाही, तो वैष्णव, साधु, संत असूच शकत नाही. या अनुषंगाने सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**प्रतिपादी वाळी। एका पुजी एका छळी।।**
**तुका म्हणे नाहीं। भूतदया जयाचे ठायीं।।**

साधु, संतांच्या, वैष्णवांच्या वेषातही कांही व्यावहारिक लोक आहेत. या लोकांचा व्यवहार वर्तन पाहिले म्हणजे त्यांना महाराज, वैष्णव म्हणू नये असे वाटते. व्यावहारिक वैष्णवांचा, महाराजांचा मला आलेला बऱ्याच वर्षाखालील एक अनुभव मी मुद्दामहून येथे सांगत आहे. मी माझ्या कांही सहकाऱ्यांसह आळंदी ते पंढरपूर यात्रेत ज्ञानोबा-तुकारामांचा गजर करीत चाललो होतो. रस्त्यात एका ठिकाणी ओळखीचा एक व्यक्ती भेटला. त्यांनी आम्हाला त्यांच्याकडे भोजनाला येण्याचा आग्रह केला. आम्ही भोजनासाठी गेलो. अनेक भोळे भाबडे वारकरी पंक्तीला बसले होते. आम्हाला जागा मिळावी म्हणून त्या व्यक्तिने पंक्तीतील चार-दोन लोकांना मुर्ख आहेत का? समजत नाही का? साहेब आलेत, त्यांना बसू द्या, तुम्ही नंतर जेवा, पोटच वर घेऊन निघालेत वगैरे म्हटले. त्यांच्या दृष्टीत मी मोठा आहे, म्हणून माझी सेवा आणि चार-दोनशे रुपये देऊन त्यांच्या छत्रछायेत सामील झालेल्या भोळ्या भाबड्या वारकऱ्यांचा असा छळ, असा अपमान संतांच्या कोणत्या व्याख्येत बसत होता हे मला समजले नाही. जेवणात खूप हिंग असल्याचे कांहींनी सांगीतले व आम्हालाही जाणवले. या व्यक्तीस याबाबत विचारले असता ते म्हणाले, खूप हिंग घातलण्यास लोक कमी जेवतात. या व्यक्तिला माणूस म्हणायचे की आणखी काय? हे आपणच ठरवा. असो वारकऱ्यांच्या सहवासाने केव्हा ना केव्हा असे व्यावहारिक लोकही माणसात येतील.



**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १७ मार्च २०२५ | शिवजयंती (तिथीप्रमाणे), |
| विक्रम संवत् २०८०-८१ | संकष्ट चतुर्थी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. तृतीया (१९.३२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (१४.४६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (१५.४४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल.मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. आपल्याला नवीन संधी मिळतील. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील. आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क :** घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह :** सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. सकारात्मक विचार कराल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे.

**कुंभ :** प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. आपले स्वप्न पूरे होतील.

# आजपासून राज्यस्तरीय नेतृत्व गुण युवा प्रेरणा शिबीर

**विविध विद्यापीठातील २०० स्वयंसेविकांचा सहभाग**

**१७ ते २१ मार्चपर्यंत आयोजन**

**बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १७ ते २१ मार्च २०२५ दरम्यान विकसित भारत अभियानांतर्गत राज्यस्तरीय नेतृत्व गुण प्रशिक्षण शिबिर (युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी) राज्यस्तरीय युवा प्रेरणा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी राज्यातील विविध विद्यापीठातील २०० स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित राहणार आहेत.

शिबिराचे उद्घाटन सोमवार दिनांक १७ मार्च रोजी दुपारी ३ वाजता टीव्ही नाईन चे वृत्तनिवेदक सागर जोशी, प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्राचे संचालक व गोवा क्षेत्रीय संचालनालय पुणे येथील विभागीय संचालक अजय शिंदे, अध्यक्ष म्हणून कुलगुरू प्रकाश महानवर, माजी राज्य संपर्क अधिकारी मुंबई प्रा. रामेश्वर कोठावळे यांच्या उपस्थित होणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून प्र-कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, वित्त व लेखा अधिकारी महादेव खराडे, संचालक राष्ट्रीय सेवा योजना राजेंद्र वडजे, जिल्हा समन्वयक रासेयो वीरभद्र दंडे आदी उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या दिवशी दि. १७ मार्च रोजी सकाळी सहा वाजता ध्वजारोहण, मधल्या काळात स्वयंसेवक व सहभागी असणाऱ्यांना सूचना, एक ते अडीच भोजन, ३ वाजता उद्घाटन, सायंकाळी सहा ते साडेसात वाजता युवक व नेतृत्व विकास या विषयावर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी अध्यक्ष म्हणून मल्लिकार्जुन करजगी असणार आहेत. दि. १८ मार्च रोजी सकाळी दहा वाजता जिल्हा समन्वयक वीरभद्र दंडे हे युवकांच्या नेतृत्वातून पर्यावरण विकास या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत, अध्यक्ष म्हणून प्रा. वसंत कोरे असणार आहेत. दुपारी बारा वाजता आजचा युवक उद्याचा उद्योजक या विषयावर बार्शी येथील प्रा. शिवाजीराव पवार, अध्यक्ष म्हणून प्रा. विकास पाटील, युवक कार्याचा संकल्पना या विषयावर डॉ. उमाकांत चनशेट्टी, कौशल्य विकास व रोजगार या विषयावर पी एम उषा व कौशल विकास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रभाकर कोळेकर, प्रा- अध्यक्ष म्हणून ज्योती माशाळे, सायंकाळी आम्ही कसे घडलो या विषयावर परिसंवाद होणार. यावेळी पंढरपूर येथील सरपंच समाधान काळे, पत्रकार आफताब शेख, पत्रकार सलमान पिरजादे, अध्यक्ष म्हणून दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने हे उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी राष्ट्र उभारणीत महिलाचे योगदान या विषयावर अंकिता पवार या मार्गदर्शन करतील. अध्यक्ष म्हणून शीला स्वामी असणार आहेत. तिसऱ्या दिवशी यशपाल खेडकर हे युवा नेतृत्वाचे पैलू यावर विषयावर बोलतील, वैद्यकीय अधिकारी अभिजीत जगताप आरोग्य व युवक, राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिका या विषयावर चंद्रकांत चव्हाण मार्गदर्शन करतील, सायंकाळच्या सत्रात 'मी अनुभवलेली राष्ट्रीय सेवा योजना' या विषयावर महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेते प्रा. पंकज पवार हे बोलतील तर अध्यक्ष म्हणून विनायक घोलप संचालक शास्त्र संकुल, सहभागी स्वयंसेवक सामाजिक काव्य मेहफिल होईल तर अध्यक्ष म्हणून सहकुलसचिव शिवाजी शिंदे उपस्थित राहणार आहे. शेवटच्या सत्रात जे एम खैरादी सायबर सिक्युरिटी वर बोलतील, युवा नेतृत्व समाज आणि देश या विषयावर अकलूज येथील प्रा. डॉ. विश्वनाथ आवड तर अध्यक्ष म्हणून अंजना लावंड, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील रासेयोची संधी या विषयावर शीला स्वामी बोलतील, नेतृत्व व्यक्तिमत्व आणि राष्ट्र निर्माण या विषयावर डॉ. दीपक ननवरे मार्गदर्शन करतील तर अध्यक्ष म्हणून डॉ. अनिल घनवट, सायंकाळी प्रेरणा सहभागी स्वयंसेवक चर्चासत्र असणार आहे. यावेळी टेंभुर्णीतील प्राचार्य डॉ. महेंद्र कदम हे उपस्थित राहतील. समारोप शुक्रवार दिनांक २१ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता होईल. महाराष्ट्र शासन व उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय मुंबई राज्य संपर्क अधिकारी डॉ. निलेश पाठक हे उपस्थित राहतील.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ।। विद्यया संपन्नता ।।

# सागर सिमेंटच्या महाराष्ट्रातील वितरकांसाठी विविध योजना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च -**

सिमेंट क्षेत्रात अल्पावधीतच नावाजलेल्या सागर सिमेंट कंपनीच्या महाराष्ट्रातील वितरकांसाठी कझाकस्तान येथील अल्माटी येथे ११ मार्च ते १५ मार्च या कालावधीत विदेश दौऱ्याचे कंपनीचे महाराष्ट्र प्रमुख महादेव कोगनूरे यांच्या उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते. दौरा पूर्ण करून सर्व वितरकांचे व अधिकाऱ्यांचे हैदराबाद आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले, मध्य आशियातील सर्वात लांब अशा बर्फाळ पर्वतरांगेच्या पायथ्याशी नैसर्गिक सौंदर्यानी संपन्न असलेल्या अल्माटी कझाकस्तान येथील पाच दिवसीय दौऱ्यात वितरकांनी विविध ठिकाणी भेटी दिल्या.




कंपनीचा एक अविभाज्य व महत्त्वाचा भाग असणाऱ्या वितरकांसाठी रोजच्या धावपळीच्या जीवनातून थोडीशी विश्रांती मिळावी या हेतूने सागर सिमेंट कंपनीच्या वतीने महाराष्ट्रातील वितरकांसाठी विदेश दौरा आयोजित केल्याबद्दल सागर सीमेंट मॅनेजमेंट व कंपनीचे मार्केटिंग प्रमुख राजेश सिंग व महादेव कोगनूरे यांनी आभार मानले. भविष्यात वितरकांसाठी विविध योजना राबवणार असल्याचे कोगनूरे यांनी सांगितले.

# स्टेट बँकेकडून वारसदारांना विमा रक्कम सूपूर्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च ,**

येथील भारतीय स्टेट बँकेने अपघातात मृत्यू पावलेल्या युवकाच्या वारसदारांकडे विम्याचे वीस लाख रूपये रक्कम सूपूर्द केला. निबर्गी येथील शिवानंद भीमाशंकर डुणगे वय २२ हा दुचाकीवरून पुणे येथून निंबर्गी गावाकडे येताना इंदापूरजवळ उसाच्या ट्रॅक्टरने दिलेल्या धडक दिल्याने जागीच मृत्यू झाला. शिवानंद यांचे वडील भीमाशंकर डुणगे यांनी मुलाचा मंद्रूप येथील भारतीय स्टेट बँकेत खाते उघडत असताना एक हजार रूपये भरून पर्सनल ॲक्सिडेंट इन्शुरन्स काढला होता. शिवानंद याचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर मंद्रुप येथील भारतीय स्टेट बँकेने वडील भिमाशंकर व आई शांताबाई यांना विमा रक्कम म्हणून वीस लाखांचा धनादेश स्टेट बँकेचे सोलापूरचे क्षेत्रीय प्रबंधक तथा व्यवस्थापक निशांत जयस्वाल यांच्या हस्ते सूपूर्द केला. यावेळी मंद्रूप शाखेच्या व्यवस्थापक मीनाक्षी साबळे, उपव्यवस्थापक केदार पाटील, जयराज चव्हाण, अनुप ठाकरे,



### वीस लाखांची भरपाई मिळणार

स्टेट बँकेतर्फे एक हजार रुपयांचा विम्यास वीस लाखांची रक्कम भरपाई मिळणार आहे. तर दोन हजारांच्या विम्यास चाळीस लाखांची भरपाई मिळणार आहे. अपंगत्व आल्यास अथवा साप चावून मृत्यू झाल्यास वीस लाखांची भरपाई मिळणार आहे. तरी प्रत्येक ग्राहकांनी विमा उतरविण्याचे आवाहन शाखा अधिकारी मीनाक्षी साबळे यांनी केले.




# महावीर हायस्कूल, चतुरबाई श्राविका विद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

प्रत्येक दिन घर आणि समाजातील स्त्रीचा आदर सन्मान करणे म्हणजे महिला दिन साजरा करणे होय असे मत ॲड. साधना सांगवे यांनी विकास नगर येथील महावीर हायस्कूल व चतुरबाई श्राविका विद्यालयात आयोजित महिला दिनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या संधाली गायकवाड, श्वेता कांबळे, सरोजिनी टिपे, प्रतिभा कुमार या महिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील व चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रूपाली चेंडके उपस्थित होते. उपस्थित प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती महिलांचे परिचय ज्येष्ठ शिक्षक अभिनंदन विभूते यांनी करून दिले. यावेळी अनन्या गडकरी, नंदिनी जोगद, प्रज्ञा कांबळे, माहेश्वरी सावने, जान्हवी नवगिरे, श्रावणी शिंदे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. तसेच यावेळी काही मुली नृत्य सादर केले. सूत्रसंचालन व आभार

# अंधश्रद्धा निर्मूलन समिती शहर शाखेकडून एक हजार पुरणपोळ्याचे वाटप

**होळी लहान पोळी दान उपक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेच्यावतीने होळी लहान पोळी दान हा उपक्रम होळी सणाचे निमित्त राबविण्यात आला या उपक्रमास नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला त्यामुळे गरिबांना एक हजार पुरणपोळ्याचे वाटप करण्यात अनिसला यश मिळाले.

होळी करा लहान पोळी करा दान या उपक्रमा अंतर्गत सोलापूर शहरात अनिस च्या वतीने पुना नाका सोलापूर रुग्णालय इंदिरानगर अशी तीन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती या केंद्रामधून जवळ जवळ एक हजार पुरणाच्या पोळ्यांचे संकलन करण्यात आले . नागरिकांकडून देखील या उपक्रमास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला सुकी लाकडे व वाळलेला पालापाचोळा जाळून लहान होळी करण्याचे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले होते. तसेच या होळीमध्ये पुरणपोळी नैवेद्य म्हणून जाळून टाकण्यापेक्षा गरीब गरजू नागरिकास दान करण्याचे आवाहन देखील करण्यात आले होते. नागरिकांनी अनिस च्या आवाहनास प्रतिसाद देत लहान होळी केली आणि पुरणपोळ्या दान केल्या



अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि जय हिंद फूड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरणपोळ्या पुणे नाका सोलापूर रुग्णालय इंदिरानगर या परिसरातील झोपडपट्ट्यामधील गरजू गरीब नागरिकांना देण्यात आल्या. जयहिंद फूड बँकेचे अध्यक्ष सतीश तमशेट्टी आणि अनिकेत सरवदे यांनी या उपक्रमात पोळ्या वाटप करण्यात सहकार्य केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेचे अध्यक्ष प्रा शंकर खलसोडे, कार्याध्यक्ष डॉ अस्मिता बालगावकर, सचिव लालनाथ चव्हाण, व्ही डी गायकवाड, आर डी गायकवाड, सुनीता गायकवाड, उषा शहा, ब्रम्हानंद धडके, छाया धडके, अरुण गायकवाड, प्रकाश कनकी, विजय जाधव, लालनाथ चव्हाण, शकुंतला सुर्यवंशी, उषा शहा, निशा भोसले, निलेश गुरव, अनिल इंगळे, यशवंत फडतरे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# सोलापुरात २२ मार्चला नाभिक वधू-वर पालक परिचय राज्य मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

श्री. संत सेना नाभिक बहुउद्देशीय सेवा प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वा मोफत राज्यस्तरीय नाभिक वधु-वर पालक परिचय मेळावा शनिवार२२ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सचिव सिद्राम रुद्रार यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा मेळावा सर्व नाभिक पोटजातीसह सोलापूर शहरातील सर्व नाभिक संस्थाच्या सहकार्याने सोलापूर येथील ईरण्णा उपलप मंगल कार्यालय, सात रस्ता येथे हा मेळावा होणार आहे.या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडाळाचे अध्यक्ष रवी बेलपत्रे (नागपूर) हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश कार्याध्यक्ष सिद्राम रुद्रार (सोलापूर), शिक्षण सभापती नागजी दुधाळ(बार्शी), उपाध्यक्ष बाळासाहेब साळुंखे (सांगली), प्रदेश सचिव अरुण जमदाडे (चंद्रपूर), मार्गदर्शक संजीवनी गोरे, महाराष्ट्र नाभिक महामंडळ महिला प्रदेश प्रमुख डॉ. माधुरी पारपल्लीवार , पश्चिम विभागीय वधू-वर सुचक अध्यक्ष अल्का ताटे, सुर्यकांत हुलसुरकर (हुलसुर कर्नाटक), प्रदेश कोषाध्यक्ष रवि गायकवाड (पुणे), भारतरत्न जननायक कर्पूरी ठाकुर ओबिसी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुवीरसिंह श्रीवास (इदौर मध्यप्रदेश), आनंद वारीक (कलबुर्गी), जिल्हाध्यक्ष सविता समाज, माजी जिल्हाध्यक्ष शरण बसवेश्वर सुर्यवंशी, मातोश्री पुष्पाताईजी पाटील मठाधिश इंचगिरी मठ (सोलापूर), पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष किरण भांगे आदींसह सोलापूर जिल्ह्यातील विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यातील नाव नोंदणी केलेल्या वधू-वर व पालकांनी मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन अध्यक्ष ॲड. पवनकुमार शिंदे, सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष हिंदूराव गोरे, सचिव सिद्राम रुद्रार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस मोहन जमदाडे, निलकंठ हल्लाळीकर, प्रकाश जोगीपेठकर,सुशांत क्षिरसागर, डॉ. माधुरी पारपल्लीवार, राजू शुक्लवार आदी उपस्थित होते.



## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा.



ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (८०) स्विकार

पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणे कितपत योग्य आहे. स्वामी विवेकानंदांना पश्चिमात्य विचारक म्हणाले आम्ही तुमची आध्यात्मिकता मानू. तुम्ही आमची नवीन विचारधारा समाजवाद मान्य करा. तेव्हा स्वामीजींनी प्रत्युत्तरात म्हटले, अरे, भाऊराया हे ठीक आहे,

परंतु तुमची नवीन विचारधारा प्रयोगावस्थेत आहे. आणि आमच्या विचारधारेचे आयुष्य हजारो वर्षांचे आहे. म्हणून आम्ही तुमचे अनुकरण करणार नाही. श्री. गुरुजी नेहमीच हे उदाहरण देऊन म्हणत असत आम्ही कट्टरवादी, हटवादी नाही पण आम्हाला हे तर पाहू द्या की समाजवादी संघटनेत स्थायित्व येत का. तुमची विचारधारा आजतरी प्रयोगावस्थेत आहे. आपल्या हाताची बोटे समाजवादी भूमिका घेऊ शकतात का? अंगठा तर्जनी- मधले बोट-अनामिका आणि करंगळीला तिची स्वतःची भूमिका वटवावीच लागते. तरच तो हात स्वयंसेवक बनेल. आज कम्युनिझमच्या परिभाषेमुळे वाद होतात आज डांगे म्हणतात नबुद्रीपाद संशोधनवादी आहेत, तर नबुद्रीपाद म्हणतात डांगे पदभ्रष्ट आहेत .एकूणच विश्व- साम्यवाद

विश्व-पदभ्रष्टतेच्या वाटेवर आहे. आज रोमन, ग्रीक, पर्शियन या सर्व संस्कृती रसातळाला गेल्या आहेत. अर्थात आमच्या हिंदू संस्कृतीतील अनेक प्राचीन रचनांच्या शाखा किंवा पत्री जीर्ण होऊन गळत आहेत, तर त्यांना गळू द्या. त्याला नवीन अंकुर फुटतील; अर्थात त्यांना स्वीकारताना फक्त एवढंच करा की त्या अंकुराचे, मूळवृक्षासोबत संघजीवन आहे- एकरस जीवन आहे. आपला हिंदू संस्कार एकच.

सभी सुखी हो सभी निरोगी।

**मन मे हो सद्भावना।।**
**निशिदिन प्रतिपल हिंदू करते। सबकी मंगल कामना ।।**

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### निर्मलाराजे कन्या प्रशालेस जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार

**अक्कलकोट, दि. १६ मार्च-**

मराठा मंदिर मुंबई संचलित श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेला सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या. बाळे सोलापूर यांच्याकडून दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त केला आहे. पुरस्कार वितरण सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर या ठिकाणी संपन्न झाला. बाळे सोसायटीचे मार्गदर्शक माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक शरद जंगाले यांनी पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी सहशिक्षिका प्रमिला नीळपाटील, अर्चना जाधव, स्मिता जगदाळे, मनीषा मोरे, रेखा चव्हाण, एस.डी. सावंत, संभाजीराजे गाटे, प्रकाश सोनटक्के, विकास गोडसे, राजेंद्र गोन्डाळ, एस. बी. साळुंखे उपस्थित होते.



### वागदरी शाळेत प्लास्टिक, कचरामुक्तीची होळी

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांच्या संकल्पनेतून प्लास्टिक, क चरामुक्तीची होळी साजरी करण्यात आली. राग, द्वेष, मोह, दु:ख, दारिद्रय, उदासिनता, आळस, इर्षा माणसातील वाईट प्रवृत्ती या होळीत नष्ट व्हाव्यात म्हणून अग्नीदेवतेला प्रार्थना करण्यात आली. कागदावर या सर्व वाईट गोष्टी लिहून होळीत जाळण्यात आल्याचे मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी सांगितले. अनुसया कलशेट्टी, मनिषा कुणाळे, तोलन बागवान यांनी होळीचे पूजन करून विद्यार्थ्यांना होळी सणाची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी परिसरातील प्लास्टिक, कागद गोळा करून होळी पेटविली. आनंदाने होळीभोवती फेऱ्या मारत नाचत शाळेच्या आवारात होळी सण साजरा करण्यात आला.




### वागदरी जिल्हा परिषद शाळेला शिवाजी महराज उत्कृष्ट शाळा पुरस्कार

**सोलापूर, दि. १६ मार्च-**

सागरदादा कल्याणशेट्टी युवा मंचच्या वतीने वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेला शांभवीताई कल्याणशेट्टी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महराज उत्कृष्ट शाळा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, अनुसया कलशेट्टी, अर्चना गिरी, मनिषा कुणाळे, कविता फड, रत्नाबाई कंचे व विद्यार्थ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सागरदादा कल्याणशेट्टी युवा मंचचे अध्यक्ष श्याम बाबर यांनी शाळेच्या प्रगतीचा विचार करुन हा पुरस्कार दिला आहे.

### नांदोरे येथे बालयोगी गोपाल महाराज यांच्या भागवत कथा सप्ताहास प्रारंभ



**मोडनिंब, दि. १६ मार्च-**

पंढरपूर तालुक्यातील नांदोरे येथे बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या संगीतमय भागवत कथा सप्ताहास आजपासून प्रारंभ होत आहे. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त नांदोरे येथील येथे रविवार(दि. १६) ते शनिवार (दि. २२) मार्च या कालावधीत सायंकाळी सात ते दहा या वेळेत सप्ताह पार पडणार आहे. या सप्ताहाचे आयोजन समस्त नांदोरे ग्राम स्थांच्या वतीने करण्यात आले आहे . प्रासादिक अमृत वाणीतून कथा श्रवनाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### माढा बस बसस्थानकाला शिवाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी

**माढा, दि. १६ मार्च -**

माढा येथे असलेले बसस्थानक शहराच्या दैनंदिन जीवनाचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठी अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. शहराच्या इतिहासाला आणि संस्कृतीला साजसे नामकरण व्हावे तसेच युवकांना प्रेरणा मिळावी या स्वरूपाचे पत्र देऊन माढा बस स्थानकाला छत्रपती शिवाजी महाराज बस स्थानक असे नामकरण करावे अशी मागणी संग्राम शिवजन्मोत्सव मंडळाच्या वतीने कुर्डूवाडी आगार प्रमुखाका कडे केली आहे. याच पद्धतीने माढा बाजार पटांगणाला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव देण्याची मागणी देखील संग्राम मंडळाच्या वतीने माढा नगरपंचायती कडे करण्यात आली आहे. तसेच या मंडळाच्या वतीने आज जगदाळे मंगल कार्यालय येथे सकाळी ९ वाजता माढ्यातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखवण्यात येणार असल्याचे ही मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे. या दिलेल्या पत्रात बाबा मस्के अमर पालकर जिवन ढेकळे विजय कांबळे अक्षय भांगे यांच्या सह्या आहेत.

# अक्कलकोट तालुक्यात ज्वारी काढणीला वेग

## मजुरीचे वाढले दर; हमी भाव केंद्र सुरु करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यात शेतकरी वर्ग गहु ज्वारी पिकाच्या काढणी मध्ये व रास करण्यामध्ये मग्न आहे. ज्वारी काढणीला मजुरांची कमतरता भासत असल्याने मजुरीचे दर वाढले आहेत. यामुळे शेतकरी वर्ग सहकुटुंब या कामात व्यस्त झालेला आहे. गहू ज्वारीचा हमी भाव दर वाढवावा. हमी भाव वाढवून शासनाने हमीभाव खरेदी केंद्र सुरु करावेत अशी मागणी शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.



अक्कलकोट तालुका हा रब्बीचा तालुका म्हणून ओळखला जातो. कालवे सिंचनाची सोय नसल्याने बहुतांश शेती पाऊसावर अवलंबून आहे ज्वारी हे प्रमुख पिक आहे यामुळे कोरडवाहू असलेल्या शेत जमीनीत ज्वारीच पिक हमखास घेतल जात. एक दुसऱ्या पाऊसावर ज्वारी पिक तक धरते तर थंडीमुळ ज्वारी पिकाची वाढ होते. गव्हाचे दरही वाढल्याने गहू पेरणीही यंदा अधिक आहे. गहु जोड याची कापणी मळणी चालू आहे. याकरिता यंत्राची मदत घेतली जात आहे. यामुळे तालुक्यातील हसापूर, कोळीबेट, दोडुयाळ, बॅगेळी, निमगाव, रामपूर, कडबगाव, आबावाडी गुरववाडी, स्टेशन बोरोटी, इटगे, बोरी, उबंरगी, तळवळ, निमगाव, दहिटणेवाडी, दहिटणे, चप्पळगाव, कुरनुर, चुंगी, मोटाळ, हैद्रा, नागणसूर, सदलापूर, घोळसगाव, हत्तीकणबस, सलगर, मैंदर्गी, दुधनी, संगोगी, बोरोटी, हालहळ्ळी, बऱ्हाणपूर, हन्नुर आदी तालुक्यातील बहुतांश भागात ज्वारी पिकाची कापणी कणस तोडणे मळणे रास करणे आदी कामांनी वेग घेतला आहे. यामुळे शेत मजुराची कमतरता भासत आहे. ज्वारी काढणी मोडणे रास करणे आदी कामासाठी शेत मजुराकडून पोते दोन तीन पाच क्षेत्र पाहुन गुत्ता ठेका घेतला जात आहे. यामुळे शेतकरी घरातील सर्वजण ज्वारी कापणी मळणी रास करण्यामध्ये व्यस्त झाले असल्याचे पहावयास मिळत आहे.

## पंढरपूर उपविभागीय अधिकारी सोमवार अन् शुक्रवार नागरिकांना भेटणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ मार्च-**

जिल्हयात शंभर दिवसीय कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पंढरपूर उपविभागातील नागरिकांचे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांना दर सोम वारी व शुक्रवारी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत नागरिकांना आपल्या कामानिमित्त भेटता येईल, अशी माहिती उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. पंढरपूर उपविभागातील पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील नागरिक ग्रामीण भागातुन आल्यावर उपविभागीय अधिकारी बैठकीस किंवा गावभेटीच्या निमित्ताने बाहेरगावी असल्यास त्यांची भेट होत नाही. त्यासाठी ही आठवड्यातून दोन वेळेस लोकांच्या सम स्या सोडवण्यासाठी उपविभागीय अधिकारी उपस्थित असणार आहेत. संबंधित वेळेत तक्रारदार नागरिक, अभ्यागत आणि शेतकऱ्यांनी त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या वेळेत उपविभागीय कार्यालय पंढरपूर येथे भेट द्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी इथापे यांनी केले आहे.

# महिलांनी आजाराबद्दल सजग असावे : डॉ. माने




### धोत्री येथे महिला दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

किरकोळ आजार म्हणून सुरुवातीला दुर्लक्ष करतात. नंतर तोच आजार गंभीर बनतो. हे चित्र सर्वत्र दिसते. म्हणूनच महिलांनी आपल्या आजाराबाबत दुर्लक्ष न करता सजग राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आरोग्यधिकारी डॉ. अभिजीत माने यांनी यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे जागतिक महिला दिनानिमित्त सन शुअर सोलार कंपनी आणि धोत्री ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी डॉ. माने बोलत होते. आज वैद्यकीय क्षेत्रात मोठे संशोधन झाले तरी ग्रामीण भागातील महिलांमध्ये आजार अंगावर काढण्याचे प्रमाण अधिक आहे. एखादा आजार अंगावर न काढता वेळीच औषध उपचार केला तर पुढील गंभीर आजारापासून सुटका होते. महिलांनी गंभीर आजारा होण्याची वाट न पाहता तातडीने औषध उपचार करून घ्यावेत असे आवाहन आरोग्यधिकारी डॉ. अभिजीत माने यांनी केले.

धोत्री येथील मारुती मंदिरात झालेल्या या शिबिरात दोनशेहून अधिक महिला व मुलींना मोफत सॅनिटरी पॅड व विविध आजारावरचे औषध व गोळ्यांचे वाटप करण्यात आले. शिबिरात डॉ. आस्था लाका यांनी महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच संजय पाटील, आरोग्यधिकारी डॉ. लक्ष्मण माने, आरोग्य सेविका एसबी हिरेमठ, सन शुअर सोलरचे तनवीर सिंह, एकता शर्मा, सचिन माने, घनश्याम सिंग, तुलिका रावत, परमेश्वर कांबळे, सारिका शिंदे, सुनंदा नंदगावकर, सुषमा नवगिरे, राणी व्हटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**याची घ्यावी काळजी**

महिलांमधील रक्तांची कमतरता, थायरॉईड, संधिवात, मासिक पाळी, गाठी, पोटाचे आजार याची माहिती व ते होणार नाही याकरिता घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.



## आंबेगाव जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**वैराग, दि. १६ मार्च-**

आंबेगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच सुशीलकुमार दळवे यांच्या हस्ते तर रंगमंच्याचे पूजन बापूसाहेब घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष डॉ. आनंद सुरवसे, उपाध्यक्षा राणी मुटकुळे उपस्थित होते.

प्रस्ताविक मुख्याध्यापक नामदेव शेंडगे यांनी केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंद सुरवसे, शहाजी दळवे, प्रगतशील बागायतदार शिवाजी दळवे, शहाजी साळुंके, इन्नुस सय्यद, अशोक कापसे, मुख्याध्यापक विष्णू मस्के, पांडुरंग रावळ, प्रवीण घोडके, बाळासाहेब शेंडगे, बाबासाहेब पाटील, संजय भालेराव, दिपक कापसे केंद्र प्रमुख राळेरास, सुर्यकांत निचळ, शत्रुघ्न घोडके, अशोकराव खटाळ, नेताजी घायतीडक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी कार्यक्रमाला भरभरून दाद दिली. आमच्या मुलींच्या कलागुणांना प्रोत्साहन दिल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकांत लोहार, उषा दाभाडे, प्रतिभा गाडे यांनी परीश्रम घेतले.



## राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार)तर्फे ग्रामीण रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ मार्च-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्यावतीने महिला दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अशोक राठोड, प्रगतशील शेतकरी शिवानंद बिराजदार, वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र बनसोडे, डॉ. सतीश बिराजदार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य कार्यकारिणी सदस्य स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, फकीरा दलाचे जिल्हाध्यक्ष ज्योतिबा पारखे व परिवर्तन कुष्ठरोग कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष जगन्नाथ ढगे, विश्वनाथ चव्हाण, अजित राठोड सिद्धाराम गंगोंडा, गुरप्पा गंगोंडा, अनिल इंगळे, अश्पाक मुल्ला, सिद्धू पुजारी, औषध निर्माता ईरण्णा चिंचीगोडे व गंगाराम राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. लोकनेते स्व. वहिदपाशा पाटील प्रतिष्ठान व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पीरपाशा पिरजादे पाटील यांच्याकडून महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सुप्रिया कबसे, पायल वानखेडे, मनीषा सलगर, निकिती पुजारी, प्रमिला वाघम रे, सुरेखा वर्दे, नागम्मा नंदे, ललिता चिंचोरे, हरणाबाई बंदपट्टे, सरस्वती तळभंडारे, गीता चिंचोळकर,जानकी कामठी, वंदना जाधव, संजीवनी सूर्यवंशी या सर्व महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

## आरोग्य विमा ही काळाची गरज : डॉ. इनामदार



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ मार्च-**

पर्यावरण, प्रदूषण, वाढती महागाई, आरोग्य या सारख्या संकटाना माणसाला सामोरे जावे लागत आहे. कोणताही वैद्यकीय उपचार आता न परवडणारा झाला आहे. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी आरोग्य विमा ही काळाची गरज असून नागरिकांनी तो काढावा, असे आवाहन प्रसिध्द हृदयरोगतज्ञ डॉ.एम.के.इनामदार यांनी केले आहे. अकलूज येथील डॉ. एम. के. इनामदार यांच्या अश्विनी रुग्णालयात सालाबादप्रमाणे यंदाही माळशिरस तालुक्यातील पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याप्रसंगी आयोजित समारंभात डॉ. एम.के. इनामदार यांनी आरोग्य विषयक माहिती दिली. यावेळी पत्रकार संघाच्या वतीने डॉ. एम. के. इनामदार व डॉ. अनिकेत इनामदार यांचा किरण जाधव व सूर्यकांत भिसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक पत्रकार रामभाऊ मगर यांनी केले तर आभार चंद्रकांत कुंभार यांनी मानले. माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील ५० पत्रकारांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली .



## सदाशिवराव माने पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त ६१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १६ मार्च-**

धर्मवीर सदाशिवराव माने-पाटील यांच्या ६६ व्या स्मृतिदिनानिमित्त व माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त युवा नेते सुजयसिंह माने-पाटील आणि परिवाराच्या वतीने अकलूज येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ६१ जणांनी रक्तदान केले यावेळी माजी आमदार राम सातपुते, सोलापूर जि.प.चे मा. अध्यक्ष फत्तेसिंह माने-पाटील, शशिकांत माने-पाटील, हिंदुराव माने-पाटील, विक्रम माने देशमुख, काकासाहेब माने-पाटील, हंसराज माने-पाटील, सुजयसिंह माने-पाटील, जयराज माने पाटिल, गोपाळ घाडगे. राहुल माने-देशमुख, अमर माने-देशमुख, गिरिराज मान- पाटील, अभिमान्यू माने-पाटील, हरिप्रसाद इनामदार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सदुभाऊ चौक, अकलूज येथील धर्मवीर सदाशिवराव माने पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्यास मा. आ. राम सातपुते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले धर्मवीर सदाशिवराव माने-पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी ज्योत आयोजित केली जाते या ज्योतीचे स्वागत माजी आमदार राम सातपुते यांच्यासह प्रमुख मान्यवरांनी केले. शिबिरासाठी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँकेने रक्त संकलनाचे काम केले.


# सूर्यनारायणाच्या प्रकोपाची फळबागांना झळ; जिल्ह्यातील उत्पादक हवालदिल


## पिठ्या ढेकणाचा प्रादुर्भाव ; पाणी पातळी घटल्याने घ्यावा लागतोय टँकरचा आधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

यंदा मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आग ओकण्यास सुरुवात केली आहे. यामुळे सर्वसामान्यांच्या अंगाची लाहीलाही होत असतानाच त्याच्या प्रकोपाची झळ फळबागांना बसत आहे. यामुळे उत्पादकांच्या अडचणी वाढल्या आहेत. पाणी पातळी खालावल्याने फळबागांना जगविण्यासाठी टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे.

यंदा कमी झालेले पर्जन्यमान, घटलेली पाण्याची पातळी, अटलेले जलस्त्रोत, वर आग ओकणारा सूर्यनारायण आणि वाढलेली महागाई यामुळे अडचणीत सापडलेला बळीराजा यंदाच्या तप्त हवामानामुळे हवालदिल झाला आहे. या सगळ्या परिस्थितीत उष्णता वर्धक किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यात पिठ्या ढेकूळ डोके वर काढत असल्याने फळबाग उत्पादकांना नव्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वाढत्या तापमानामुळे पिठ्या ढेकूणचा फैलाव झाला आहे. पांढऱ्या रंगाची लव असलेल्या हा ढेकूण फळ, फांदीचा रस शोषून घेतो. यामुळे फळाच्या दर्जावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. या वर्षी द्राक्ष, लिंबू, मोसंबी या पिकांवर फार मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. पिठ्या ढेकणाच्या प्रादुर्भावामुळे लिंबू उत्पादक हैराण झाला आहे. या किडीचा प्रादुर्भाव लिंबू झाडाच्या फांदीवर, फळांवर झाला आहे. ही कीड लहान फळातील रस शोषून घेत असल्यामुळे लहान फळांची गळ होत आहे. या किडीमुळे उन्हाळी बहारचे फार मोठे नुकसान होत आहे. उन्हाळ्यातच लिंबूला अपेक्षित भाव मिळत असतो. याच काळात या किडीचा प्रादुर्भाव वाढल्याने लिंबू उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे. या किडींना आळा घालण्यासाठी वापरात येणाऱ्या औषधांची किंमत फार मोठी असल्यामुळे उत्पादकांवर खर्चाचा बोजा पडत आहे.





**या किड्यांचा होतोय त्रास**

उन्हाळ्यामध्ये प्रामुख्याने पिठ्या ढेकूण (मिलीबग), लाल कोळी, मावा यासारख्या किडी मोठ्या प्रमाणात वाढतात. वाढलेले तापमान या किडींना पोषक असते. यावर मात करण्यासाठी औषधांचा वापर करावा लागतो.

**मोफत औषधे, नुकसानीचे अनुदान मिळावे**



पाण्याची कमतरता, पडलेला भाव, वाढती महागाई यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला असताना आता उन्हाळी किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. याचा शेतकऱ्यांना म ोठा फटका बसत आहे. शासन शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामातील पिकांवर होणाऱ्या रोगराईच्या प्रतिबंधासाठी मोफत औषध उपलब्ध करुन द्यावे आणि नुकसानीचे अनुदानही द्यावे.

**-गंगाधर वळदट्टे, बागायतदार**

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माळशिरस येथे तुकाराम बीज उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १६ मार्च-**

माळशिरस येथे तुकाराम बीज उत्साहात साजरी करण्यात आली. येथील ग्रामदैवत श्री हनुमान व श्रीराम मंदीरात तुकाराम बीजेचा कार्यक्रम संपन्न झाला. रात्री १० ते १२ यावेळेत मंदीरात जागर करण्यात आला. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत हभप नाना महाराज सुर्वे (नातेपुते) यांचे कीर्तन झाले. त्यानंतर दुपारी १२ वाजता उपस्थित भाविकांनी गुलाल व फुले उधळून तुकाराम बीज साजरी केली. बीजे निमीत्त मंदिरात भावीकांनी गर्दी केली होती.





## संक्षिप्त वृत्त...



### जयहिंद अ‍ॅकॅडमीच्या मुलांनी केली सिद्धेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता

**मंगळवेढा, दि.१६ मार्च-**

तिर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर देवस्थानच्या यात्रेची सांगता झाल्यानंतर येथील जयहिंद करीअर अ‍ॅकॅडमीच्या ४० मुलांनी सामाजिक काम म्हणून या मंदिर परिसराची स्वच्छता करुन परिसर चकाचक केला आहे. तिर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर देवस्थानची यात्रा महाशिवरात्रीनिमित्त पाच दिवस भरते. मंदिर परिसरात बाहेरील व्यापार्यांनी मेवा मिठाई, रसपान गृहे, जनरल स्टोअर्स व अन्य विविध व्यापारी येथे आल्याने यात्रा संपल्यानंतर या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले होते. दरम्यान येथील कचरा गोळा करुन त्याला अग्नी देवून त्याची विल्हेवाट लावली आहे. गेली सहा वर्षे जयहिंद अकॅडमी मंदिर परिसरातील यात्रेच्या सांगता प्रसंगी स्वच्छेतेचे काम करीत असल्याचे सांगण्यात आले.



### लेंगरे वस्ती शाळेत महिला मेळाव्यात आरोग्य शिबीरासह होममिनिस्टर

**मोहोळ, दि.१६ मार्च -**

जिल्हा परिषद प्रा.शाळा लेंगरे वस्ती व पोखरापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिला मेळावा संपन्न झाला. त्यामध्ये होममिनिस्टर स्पर्धा व अरोग्य शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन शीतल क्षीरसागर व नंदा नरुटे यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाले. प्रास्ताविक राजेंद्र वाघमोडे यांनी केले. यानंतर पोखरापूर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे रवि जाधव व त्यांच्या सर्व टीमने महिलांची आरोग्य तपासणी केली. हिमोग्लोबीन, ब्लडप्रेशर, मधुमेह, ब्लड ग्रुप, सी.बी.सी. तपासणी व इतर सर्व आजारांची तपासणी केली. महिलांच्या क्रीडा स्पर्धा व विविध गुणदर्शन झाले. यातील विजेत्यांना पोलीस पाटील संगिता पाटील यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. होम मिनीस्टर विजेत्या मनिषा लेंगरे, उषा लेंगरे व आश्विनी लेंगरे-भैरवनाथ फर्निचर इलेक्ट्रॉनिक्स अँड भांडी सेंटर,मोहोळ व उज्वला वाघमोडे यांचे कडून पैठणी भेट देण्यात आल्या. विविध १० क्रीडा स्पर्धेतील विजेत्या प्रथम व द्रितीय येणाऱ्या स्पर्धकांस विक्रम लेंगरे दिलीप लेंगरे, राजेंद्रकुमार वाघमोडे, दादासाहेब चव्हाण यांचे तर्फे बक्षिसे देण्यात आली. सुत्रसंचालन सुचेता बाबर, प्रतिक्षा लेंगरे यांनी केले. दादासाहेब चव्हाण यांनी आभार मानले. हनुमंत लेंगरे, राजाभाऊ चव्हाण, संतोष ठोंगे, विक्रम लेंगरे, दिलीप लेंगरे ,किरण लेंगरे, द्रोणाचार्य लेंगरे, खेलूदेव लेंगरे, अनिल लेंगरे, द्वारकेश लेंगरे, विकास लेंगरे, हणमंत लेंगरे, विशाल लेंगरे, तात्या शिंगाडे यांचे सहकार्य लाभले.



### स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे विनायक बुधवंत यांचा सत्कार

**अक्कलकोट दि.१६ मार्च**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजय विजयसिंह भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजय भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून स्वामीभक्तांची वाढत चाललेली गर्दी पाहता सुयोग नियोजन करण्यात येत असल्याचे मनोगत वालचंदनगर इंडिस्ट्रिज लिमिटेड कंपनीचे मनुष्यबळ विभाग अधिकारी (एच आर) विनायक बुधवंत यांनी व्यक्त केले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रा. चंद्रकांत पाटील, शंकरराव सुरवसे न्यासाचे सौरभ मोरे, अतिश पवार, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, संभाजीराव पवार, सागर पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, गोविंदराव शिंदे, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, धनंजय निंबाळकर, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शिव स्वामी, प्रकाश लोंढे, महांतेश स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.

## पंढरीत श्री संत तुकाराम महाराजांच्या दुर्मिळ पादुका, चिपळ्या, हस्तलिखित अभंगाचे दर्शन

### तुकाराम बीजनिमित्त उपक्रम, त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च-**

भारताची दक्षिण काशी ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीजनिमित्त तुकाराम महाराजांच्या दुर्मिळ हस्तलिखित, पादुका, आणि चिपळ्या भाविकांच्या दर्शनासाठी ऊपलब्ध करण्यात आल्याची माहिती श्री संत तुकाराम महाराज यांचे अकरावे वंशज हभप बाळासाहेब महाराज देहूकर यांनी दिली. ते म्हणाले यंदाचे वर्ष हे त्रिशतकोतर अमृत महोत्सवी वर्ष आहे, श्री संत तुकाराम महाराज यांनी वैकुंठगमन केले त्याला आज ३७५ वर्षे पुर्ण झाली.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे पणतू महादेव महाराज व त्यांचे चिरंजीव वासुदेव महाराज हे श्री विठ्ठलाची सेवा करण्यासाठी कायम स्वरूपी पंढरपूर येथे आले होते. आम्ही हा वारसा पुढे चालू ठेवला आहे, फड परंपरेचे जनक वासुदेव महाराज यांची समाधी तसेच श्री संत तुकाराम महाराज यांच्या पादुका, चिपळ्या या आमचे वडील कै.ज्ञानेश्वर महाराज महाराज देहूकर यांनी बडोदा येथून आणल्या.

श्री संत तुकाराम महाराजांचे ज्येष्ठ सुपुत्र महादेव महाराज यांचे सन १६०५ मधील हस्तलिखित, पवित्र व दुर्मिळ वस्तू महाद्वार परिसरातील देहूकर वाड्यात दर्शनासाठी ऊपलब्ध करण्यात आल्या आहेत. तुकाराम बीजेनिमित्त पंढरीत येणाऱ्या हजारो भक्तगणांनी रविवारी याचा लाभ घेतला.



## सांगोल्यात महाराष्ट्र सिंचन परिषद

### ५ व ६ एप्रिल दरम्यान आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ मार्च-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयामध्ये दि.५ व ६ एप्रिल रोजी २१ वी महाराष्ट्र सिंचन परिषेदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सिंचन सहयोग संस्थेचे अध्यक्ष डॉ. दि. मा. मोरे, परिषदेचे स्वागताध्यक्ष बाबुरावभाऊ गायकवाड यांनी दिली.

या राज्यस्तरीय सिंचन परिषदेच्या आयोजनाबाबतची बैठक सांगोला महाविद्यालयामध्ये पार पडली. यावेळी डॉ. दि. मा. मोरे, बाबुरावभाऊ गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे माजी कार्यकारी संचालक प्रफुल्लचंद्र झपके, महाराष्ट्र सिंचन परिषेदेचे सदस्य सुधाकर चौधरी, समन्वयक प्रशांत आडे, महाराष्ट्र विकास केंद्राचे अध्यक्ष अनिल पाटील, वसुंधरा विकास संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र शेलार, माजी प्राचार्य डॉ.आपासाहेब पुजारी, सां.ता.उ. शि.मंडळाचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव अ‍ॅड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, माजी सचिव म. सि.झिरपे, सदस्य सुरेश फुले, प्र. प्राचार्य डॉ.सुरेश भोसले उपस्थित होते.



> महाराष्ट्र सिंचन सहयोग ही छत्रपती संभाजीनगर येथील राज्यस्तरीय संस्था आहे. या संस्थेच्यावतीने पाणी आणि सिंचन या प्रश्नावर शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जाते. हवामानातील दोलाईमानता आणि सिंचन व्यवस्थापन हा या परिषदेचा मुख्य विषय आहे, त्याचबरोबर आधुनिक सिंचन प्रणाली, सिंचनाच्या भावीदिशा, सिंचित शेतीतील प्रयोग, फळबाग शेती या विषयावर मार्गदर्शन व प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव या परिषदेमध्ये शेतकऱ्यांना ऐकायला मिळणार आहेत.

## धुळवडीच्या निमित्ताने केली स्मशानभूमीची स्वच्छता

### मंद्रूपच्या युवकांची विधायक कृतिशीलता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

मंद्रूप येथील हिंदू स्मशानभूमीची स्वच्छता करून मंद्रूपच्या युवकांनी विधायक कृतिशीलता जपली. या उपक्रमात 'आम्ही मंद्रूपकर' उपक्रमातील युवक स्वयस्फूर्तीने सहभाग घेतात. दहनशेडमधील राख झाडांना घालून परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. काटेरी झाडी-झुडपांनी वेढलेली बसस्थानक परिसरातील हिंदू स्मशानभूमी काही तासांमध्ये स्वच्छ झाली.

रविवारी सकाळी ६:३० वाजता स्वच्छता मोहिमेस सुरवात झाली. ग्रामपंचायत कर्मचारी रवी वाडकर यांनी मोहिमेत सहभाग घेतला. रवी केवटे यांनी स्वच्छता मोहिमेसाठी शेत-शिवारातून तुरीच्या काड्या गोळा करून स्वत: खराटे तयार केले. रवी हेसे, विकास शिळ्ळे यांनी साचलेली राख झाडांभोवती टाकून शेडची स्वच्छता केली. विनोद कामतकर यांनी दहन शेडची स्वच्छता केली. रवी केवटे यांनी अंत्यस्कारासाठी वापरलेले बांबूचा झाडांना आधार दिला.

श्याम गोसावी, सचिन साठे, जगन्नाथ खरात यांनी स्मशाभूमीतील कचरा, इतर अनावश्यक वस्तू जाळून परिसर स्वच्छ केला. नितीन खराडे, मुकेश खराडे, उमेश देवीदास, शीतल माने, रवी हेसे, नागेश कोळी, सचिन साठे, रवी केवटे, जगन्नाथ खरात, रवी वाडकर, विनोद कामतकर, विकास शिळ्ळे, ओंकार झेंडेकर, सात वर्षांचा रितुल गोसावी व दहा वर्षांची तनुजा केवटे यांनी स्मशानभूमीची स्वच्छता केली.



> धुळवड निमित्ताने स्मशानभूमी स्वच्छ करण्याची संकल्पना रानवेध फाउंडेशनने मांडली. 'आम्ही मंद्रूपकर' म्हणून त्यास प्रतिसाद दिला.
>
> **- श्याम गोसावी**, युवक,
>
> गावातील युवकांनी एकजुटीने धुळवडीला स्मशाभूमीची स्वच्छता केली. ही विधायक उपक्रमाची सुरवात असून भविष्यात आणखी लोकसहभागातून विधायक उपक्रम राबवण्यात येतील.
>
> **- ओंकार झेंडेकर**, युवक

## मंगळवेढ्यात २३ मार्चपासून आर्ट ऑफ लिव्हींगचे शिबीर

**मंगळवेढा, दि. १६ मार्च-**

मंगळवेढा येथे दि.१८ ते २३ मार्च दरम्यान सायंकाळी ६ ते ९ यावेळेत आर्ट ऑफ लिव्हींग हॅप्पीनेस प्रोग्राम शिबीराचे आयोजन केले असून हा कार्यक्रम आप्पाश्री लॉन्स येथे आयोजीत केला आहे. दरम्यान नागरिकांनी याची अगोदर नोंदणी करुन प्रवेश घ्यावा, असे आवाहन आयोजक तथा तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ यांनी केले आहे. या कार्यक्रमामध्ये निरोगी शरीर, ताण तणाव विरहीत मन, आत्मविश्वास व उत्साह, सृजनशिलता, एकाग्रता व प्रसन्नता कार्यक्षमतेमध्ये वाढ, स्मरणशक्ती मध्ये सुधारणा, योग्य निर्णय क्षमता, आनंदी जीवन जगण्याची कला, रोग प्रतिकार शक्ती वाढणे, भीती, चिंता काळजीपासून मुक्ती यांच्यासह योग प्राणायाम, ध्यान, ज्ञान जगविख्यात सुदर्शन क्रीया आदी संस्कार घडविले जाणार आहेत. यामध्ये सांगोल्याचे अविनाश कुलकर्णी हेही मार्गदर्शन करणार आहेत. नागरिकांनी मनिषा मिसाळ (९५९५४३६३८५), नारायण जाधव (९४२३३३३६६०) या नंबरवर संपर्क साधून आपली नावे नोंदवावीत.

## सिफा बागवानचा पहिला रोजा पूर्ण



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ मार्च-**

सिफा समीर बागवान वय आठ वर्षे या चिमुकलीने शुक्रवार दिनांक १४ मार्च रोजी पहिला रोजा पूर्ण केला. सध्या पवित्र रमजान महिना सुरू असून या महिन्यात मुस्लिम धर्मीय बांधव व महिलावर्ग हा रोजा उपवास करत असतात. दिवसातील १२-१३ तास हे अन्न पाण्यावाचून रोजा उपवास पकडून अल्ला चरणी प्रार्थना करीत असतात. सीफा समीर बागवान या आठ वर्षीय चिमुकलीने आपला पहिला रोजा पूर्ण केला. सिफा बागवानने रोजा पूर्ण केल्याबद्दल तिचे बागवान परिवाराकडून नवीन कपडे देऊन पुष्पहार घालून सत्कार करण्यात आले. सिफा ही अक्कलकोट बस आगारातील वाहक समीर बागवान यांची कन्या असून सिफाने पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल आजी, आई, काका, काकू, भाऊ-बहीण व परिसरातील समाजबांधवांनी तिचे अभिनंदन केले.

## मोडनिंब येथे संत तुकाराम बीज सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १६ मार्च-**

मोडनिंब (ता.माढा) येथे संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.३७५ व्या सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सव सोहळ्यानिमित्त यमाई मंदिर आणि गाभाऱ्याला आकर्षक सजावट करण्यात आली. रविवारी सकाळी अकरा वाजता विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या सोहळ्याची सुरुवात युवा कीर्तनकार हभप किरण सुरवसे यांच्या प्रवचनाने झाली. कटू अनुभवांचे हलाहल पचवून जगाला सद्विचारांचे अमृत उपलब्ध करुन देणारे तुकोबा महान संत असल्याचे युवा कीर्तनकार हभप किरण सुरवसे यांनी प्रवचनात सांगितले.त्यांनी संत तुकाराम गाथेचे वाचन करून भाविकांना प्रत्येक ओळींचा अर्थ सांगितला.यावेळी नामस्मरण, कीर्तन, प्रवचन, भजन आणि गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले. तुकाराम बीज हा संत तुकारामांचा वैकुंठ गमन दिवस मानला जातो. फाल्गुन वद्य द्वितीयेला तुकारामांचे सदेह वैकुंठ-गमन झाले, असे मानले जाते.हा दिवस 'तुकाराम बीज' म्हणून ओळखला जातो. प्रवचन सोहळ्यानंतर दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर महाआरती झाली.तुकारामांच्या नामाचा आणि विठ्ठलाच्या नामाचा गजर करण्यात आला. या सोहळ्यास बालाजी पाटील, हभप सारंग सुरवसे, उद्योजक राजेश पाटणे, निरंजन महाराज सुर्वे यांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पाटील परिवार यांनी परिश्रम घेतले.



## वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी घेतले विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ मार्च -**

राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी रविवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## मदतीच्या धनादेशासह तहसीलदार पोहोचले शेतकऱ्यांच्या घरी

### तहसीलदार किरण जमदाडेंचे होतेय कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

कासेगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर कदम पावसाळयात ओढयाच्या पाण्यात वाहून गेले होते. त्यांचा मरणोत्तर न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होताच तात्काळ चार लाखांचा धनादेश घेऊन तहसीलदार स्वतः मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांच्यासह मृत ज्ञानेश्वर कदम यांच्या घरी पोहोचले. पत्र्याच्या दोन खोल्यांचे घर आणि घरात मृत ज्ञानेश्वरची वयोवृद्ध आई आणि भाऊ तुकाराम. प्रशासनाची ही मदत आणि माणुसकीची साथ पाहून त्या माऊलीला गलबलून आले आणि अंधुक झालेल्या डोळ्यांतून त्यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली.



पावसाळयात दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर कदम नावाचा युवक शेतकरी ओढयाच्या पाण्यात वाहून गेला. तहसीलदार किरण जमदाडे यांनी व्यापक शोधमोहीम हाती घेऊन ज्ञानेश्वरचा तीन दिवस शोध घेतला. चौथ्या दिवशी ज्ञानेश्वर मृतावस्थेत सापडला. त्यामुळे कुटुंबियांनी हंबरडा फोडला. ज्ञानेश्वरचा मरणोत्तर तपासणी अहवाल प्राप्त न झाल्याने मदत देण्यास विलंब होत असल्याने तहसीलदार जमदाडे यांची तगमग सुरू होती. तहसीलदार यांनी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना कल्पना देताच अहवाल लवकर सादर करण्याबाबत सूचना केल्या. अखेर अहवाल प्राप्त होताच तहसीलदारांनी धनादेश तयार करून स्वतः ज्ञानेश्वरच्या घरी पोहोचले. यावेळी ज्ञानेश्वरची आई तहसीलदारांची माणुसकी पाहून भारावून गेल्या.

> **तहसीलदारांकडून मुलाची भूमिका**
>
> स्वतःचा पोटचा पोरगा काळाने हिरावून घेतला असला तरी तहसीलदार यांच्या रुपात मुलगा परत आल्याची भावना व्यक्त करणाऱ्या शोभा कदम यांच्या डोळ्याचे ऑपरेशन सोलापूर मधील नामवंत नेत्रतज्ञ तोष्णीवाल यांचे रुग्णालयात स्वखर्चाने करून देण्याचा निर्णय तहसीलदार किरण जमदाडे यांनी घेतला. याशिवाय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या प्रस्तावास मंजुरी दिली असून त्याचेही दोन लाख अनुदान शोभा कदम यांचे खात्यावर जमा होणार असल्याची माहिती तहसीलदार जमदाडे यांनी दिली.

> **आत्महत्या केलेल्या कुटुंबांना मदत**
>
> बोरूळ येथील शेतकरी पांडु जाधव तसेच मौजे कासेगाव येथील शेतकरी भिमराव चौगुले या दोन आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबास भेट देऊन विचारपूस केली व त्यांच्या वारस पत्नींना शासकीय मदतीचा धनादेश दिला.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात जनआंदोलनाचा इशारा

### तुळजापुर शहरातील ड्रग्ज विक्री सुरूच...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

तुळजापूर शहर मागील काही दिवसापासून ड्रग्स तस्करी प्रकरणात संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेत आले आहे. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी चाललेल्या ड्रग्स तस्करीचा जनसामान्यातून होणारा विरोध हळूहळू समोर येत आहे.

शहरात सुरू असलेल्या ड्रग्स प्रकरणाला आळा घालण्यासाठी तुळजापूर मधील सर्व पक्ष सामाजिक संघटना समाजसेवक आणि विविध मंडळ यांची बैठक दि.१५ मार्च रोजी सायंकाळी येथील जनहित संघटनेच्या कार्यालयात पार पडली.

बैठकीनंतर उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. निलेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात तपासाला गती नाही आली तर सर्व तुळजापूरकर मिळून जनआंदोलन उभे करू असा इशारा देण्यात आला.

निवेदनावर भाऊ भांजी, अमोल कुतवळ, अजय साळुंके, राहुल खपले, अमर परमेश्वर, ऋषिकेश मगर, विजय भोसले, ॲड. धीरज पाटील, शाम पवार, महेश चोपदार, अक्षय परमेश्वर, लक्ष्मण नन्नवरे, किशोर दरेकर, बालाजी जाधव, बापूसाहेब भोसले, वैजनाथ पुजारी, उत्तम अमृतराव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### मल्हारराव होळकर जयंतीनिमित्त अभिवादन

**तेर, दि.१६ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे मल्हारराव होळकर जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित सरपंच दीदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रा.पं.सदस्य प्रविण साळुंखे, नवनाथ पसारे, बापु नाईकवाडी, गोरोबा पाडुळे, संजय लोमटे, नामदेव कांबळे, सचिन देवकते, तानाजी पिंपळे, किरण फंड, हरी भक्ते, बाबासाहेब चादरे, केशव सलगर, महेश भिसे, मचिंद्र देवकते, अविनाश खांडेकर, लोकेश काळे, बाळासाहेब रसाळ आदी उपस्थित होते.

### अध्यक्षपदी पांडागळे यांची निवड

**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंतीउत्सव समितीच्या अध्यक्षपदी वैजनाथ पांडागळे तर मि



रवणूक प्रमुख पदी अमोल कदम यांची एकमताने निवड करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष तानाजी कदम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत जयंतीनिमित्त घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमा संदर्भात चर्चा करण्यात आली. जयंती उत्सव समितीची उर्वरित निवडीमध्ये उपाध्यक्षपदी आप्पा कदम, सचिव म्हणून सोनु कदम, कोषाध्यक्षपदी रवि वाघमारे तर चंचल कदम, अरुण कदम यांची सर्वानुमती निवड करण्यात आली.




### लोककल्याण संस्थेच्या पाणपोईचा शुभारंभ

**जळकोट, दि.१६ मार्च -**

कोराळ (ता. उमरगा) येथे संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त प्रत्येक वर्षी लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने पाणपोई सुरू केली जाते. सद्यस्थितीत उन्हाची तीव्रता वाढल्याने गावात संत तुकाराम महाराज बीजनिमित्त आलेल्या गावातील अन् बाहेरगावातील भाविक भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी. यासाठी रविवार (दि.१६) रोजी थंड व शुद्ध पाण्याच्या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. या बीजोत्सवानिमित्त सुरू करण्यात आलेल्या पाणपोईचा शुभारंभ अशोक दासमे व परमेश्वर जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रवि दासमे, विष्णु साळुंखे, किरण दासमे, विष्णु भगत, राजेंद्र जवळगे, दिलीप सुरवसे, अशोक पवार, संभाजी सुरवसे, विक्रम दासमे, बळीराम सुरवसे, गणेश जाधव, रामकृष्ण दासमे, प्रकाश जंगाले, परमेश्वर सुरवसे, बालाजी शिंदे, गोविंद कोळी, संभाजी जंगाले आदी सदस्य, नागरिक उपस्थित होते.

### अध्यक्षपदी शिंदे तर सचिवपदी कांबळे

**लोहारा, दि.१६ मार्च -**

लोहारा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रितम शिंदे यांची तर उपाध्यक्षपदी संदीप कांबळे, तर सचिवपदी ऋषिकेश कांबळे यांची सर्वोनुमते बिनविरोध निवड करण्यात आहे. यामध्ये अध्यक्षपदी प्रितम शिंदे, उपाध्यक्षपदी संदीप कांबळे, सचिवपदी ऋषिकेश कांबळे, कोष्याध्यक्षपदी सुमित कांबळे, मिरवणूक प्रमुखपदी योगेश वाघमारे, विनोद थोरात, अतुल कांबळे, अमरजित महालिंगे, अक्षय गायकवाड, मिलिंद नागवंशी, दिगंबर कांबळे, तुळजाराम कांबळे, भागवत गायकवाड, आदींच्या निवडी करण्यात आल्या आहेत.

# टवाळखोरांच्या नियंत्रणासाठी वैद्यकीय महाविद्यालयात सहा पोलिसांचे पथक

**आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिले होते निर्देश... पोलीस प्रशासनाची कार्यवाही...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि तातडीने तज्ञांच्या निगराणीखाली उपचार उपलब्ध व्हावे यासाठी आपण मोठा पाठपुरावा करून हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले आहे. मात्र त्याठिकाणी रुग्णांना दिलासा देण्यासाठी कर्तव्यावर असलेल्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी बांधवांना काही समाजकंटक वेठीस धरत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या. त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात तातडीने पोलिसांचे पथक तैनात करून आरोग्य कर्मचाऱ्यांना वेठीस धरणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना आ. पाटील यांनी दिल्या होत्या. त्यानुसार आता सहा पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले असून याउपरही कोणाला जाणीवपूर्वक त्रास दिला गेल्यास आपल्या निदर्शनास आणून द्यावे असे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



समाजकंटकाकडून त्रास होत असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाचा इशारा दिला होता.

त्या पार्श्वभूमीवर आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसराला ८ मार्च रोजी भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला. वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, रुग्ण तसेच रुग्णांचे नातेवाईक यांना जर कोणी नाहक त्रास देत असेल तर आपण हे कदापि सहन करणार नाही अशा शब्दात त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांना सुनावले होते.

वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसरात उपद्रव माजविणाऱ्या समाजकंटकांचा तात्काळ कायदेशीर मार्गाने बंदोबस्त व्हायलाच हवा आशा शब्दात आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिलासा देत समाजकंटकांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याचे पोलीस प्रशासनाला निर्देश दिले होते.

रुग्णालय परिसर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपद्रव माजविणाऱ्या या समाजकंटकांवर तातडीने योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर पोलीस प्रशासन आता कामाला लागले आहे. आपण दिलेल्या सूचनेनुसार उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांनी वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक, रुग्ण तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव या समाजकंटकांकडून होऊ नये म्हणून सहा पोलीस कर्मचाऱ्यांचे एक पथक तैनात केले आहे.

तसेच दिवस व रात्रीच्या गस्ती पथकांच्या फेऱ्या देखील सुरू केल्या आहेत. रात्री-अपरात्री होणाऱ्या त्रासाला यामुळे आता नक्की आळा बसेल. पोलिसांचे पथक तैनात केल्यानंतरही या उपद्रवी समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक पुन्हा त्रास सुरू झाल्यास अजिबात न घाबरता आपल्या निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहनही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. तसेच पोलीस प्रशासनानेही सर्वसामान्य नागरिक आणि कर्मचाऱ्यांसोबत गैरवर्तन होणार नाही याची गांभीर्याने काळजी घ्यावी असेही त्यांनी सांगितले आहे.

या कामात कुचराई झाल्यास आपण कदापि सहन करणार नाही अशी तंबीही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

## मल्हारराव होळकर यांच्या जयंती निमित्त जाधववाडी येथे अभिवादन

**डॉ. स्नेहाताई सोनकाटे यांची उपस्थिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

जाधववाडी (ता.जि. धाराशिव) येथील राजे महाराज मल्हारराव होळकर चौकामध्ये पराक्रम, शौर्य आणि न्यायाचे प्रतीक असलेल्या श्रीमंत मल्हारराव होळकर यांना जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला डॉ. स्नेहा सोनकाटे यांनी पुष्पहार घालुन अभिवादन केले.

यावेळी बोलताना डॉ. स्नेहा सोनकाटे म्हणाल्या की, मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी आणि हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांच्या अद्वितीय पराक्रमाची गाथा आजही आपल्याला प्रेरणा देते, असे त्या म्हणाल्या.

यावेळी लिंबराज डुकरे, संतोष वतने आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## सर्व आरोपींचा सीडीआर तपासा : ॲड. धिरज पाटील



**एसआयटी समिती नेमण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

गेल्या दोन महिन्यापासून सुरु असलेल्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात मुख्य सुत्रधार सापडत नाहीत. अनेकांवर कारवाई होवूनही तुळजाभवानी मातेच्या पुण्य पावन नगरीत ड्रग्ज विक्री सुरुच असून तीर्थस्थानाला ही काळीमा आहे. तुळजापूर तालुक्यात सुरु असलेले हे रॅकेट मुळासकट नष्ट करण्यासाठी सर्व आरोपींचे सीडीआर तपासून खऱ्या सुत्रधाराला अटक करण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धीरज पाटील यांना आयोजित पत्रकार परिषदेत केली.

यावेळी कृउबाचे संचालक उमेश निंबाळकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, ज्येष्ठ नेते खलील सय्यद, कानिफनाथ देवकुळे, संजय गजधने आदींची उपस्थिती होती.

पुढे ॲड. पाटील म्हणाले की, तुळजापूर तालुक्यातील ५०० युवक ड्रग्जच्या आहारी जावून व्यसनाधिन झाले आहेत. त्याची पाळेमुळे ग्रामीण भागातही पसरली आहेत. सोलापूर आणि मुंबई येथे कारवाई झाल्यानंतरही ड्रग्जची विक्री राजरोसपणे सुरु असून आता या ड्रग्ज विक्रेत्यांना बार्शी येथून पुरवठा होत आहे. मुंबई येथून विकत घेतलेल्या पेडलरच्या खात्यावर तुळजापूर शहरातून मोठ्या प्रमाणात आरटीजीएस आणि फोन पे व्यवहार झाले आहेत. या दोषी आरोपींवर कारवाई करुन त्या न पकडण्यात आलेल्या चार आरोपींची नावे सार्वजनिक करावीत, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली आहे. तसेच ते म्हणाले, मुंबईतील मुख्य सुत्रधार संगिता गोळे या महिलेच्या खात्यावर झालेले व्यवहाराच्या अर्ध्या रक्कमेचे व्यवहार हे केवळ तुळजापूर येथून झाले आहेत. यात व्यवहार झालेल्या व्यक्तींनाच केवळ आरोपी बनिवण्यात आले आहे. मात्र, त्या महिलेस कॉल केलेल्या व्यक्तींना आरोपी करण्यात आले नाही.

आरोपी हे तुळजापूर येथीलच आहेत. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील आरोपी हे तुळजापूरचे भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला आहे. गुन्ह्यात अटक आरोपी हे भाजपशी संबंधित आहेत. तसेच ती आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सोबत दिसताहेत.

याप्रकरणी गृहमंत्री, गृहराज्यमंत्री यांची भेट घेवून कारवाईसाठी निवेदन देण्यात येणार आहे. तसेच प्रकरणाची पाळेमुळे उखडून काढण्यासाठी तुळजापूर बंदसह जनआंदोलन उभारणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

## गायरान वहितीधारकांचे आ. तानाजीराव सावंतांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ मार्च -**

मराठवाड्यातील सरकारी गायरान वन जमिनींवरील वहितीधारकांच्या हक्कांसाठी जन संसद व जाणीव संघटना यांच्या वतीने एक महत्त्वाचे निवेदन आमदार तानाजी सावंत यांना सादर करण्यात आले आहे.

या निवेदनात विशेषत: भूमिहीन व अनुसूचित जाती-जमातींतील लोकांनी १९७८ पूर्वीपासून गायरान जमिनीत पिकवलेल्या धान्याचा उल्लेख करत त्यांचे शाश्वत उपजीविकेचे साधन म्हणून त्या जमिनीकडे पाहिले आहे.

तसेच, १९९१ साली महाराष्ट्र शासनाने भूमिहीन आणि अनुसूचित जाती-जमातींना सरकारी गायरान वनजमिनीवरील वहितीचे हक्क देऊन त्यांना सातबारा दिला होता.

तथापि, अनेक कुटुंबं सातबारा मिळवण्यात वंचित राहिलीत आणि सरकारी गायरान जमिनीवर खाजगी कंपन्यांनी कब्जा करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. महाराष्ट्र शासनाने १२ जुलै २०११ रोजी काढलेला परिपत्रक सर्वोच्च न्यायालयाच्या २०११ च्या निर्णयाच्या अनवयार्थ लागू करण्यात आले आहे. या निर्णयानुसार फक्त भूमिहीन व अनुसूचित जाती-जमातींना विशेष बाब म्हणून अतिक्रमण करणाऱ्या जमीन धारकांना समाविष्ट करून त्यांना न्याय दिला जातो. मराठवाड्यातील गायरान जमिनींवर खाजगी कंपन्यांच्या प्रकल्पांची स्थापना रोखली जावी, असे या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

हे प्रकल्प दांडगाई व बळाचा वापर करून वहिती धारकांना हुसकावून लावण्याचे काम करत आहेत, ज्यामुळे भविष्यात मोठा संघर्ष होण्याची शक्यता आहे.

निवेदनात पुढे नमूद केले की, महाराष्ट्र शासनाने १९५४ च्या हैदराबाद परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी केली पाहिजे. १९९१ च्या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि मराठवाड्यातील सरकारी गायरान जमिनांसाठी दप्तरातील नोंदी ग्राह्य ठरवाव्यात, अशी मागणी जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे व तालुकाध्यक्ष शेषराव गाडे यांनी केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर व वीर महाराणा प्रताप यांच्या जयंतीचे आयोजन



**जयंती महोत्सवानिमित्त कार्यक्रम...**

दि.१७ मार्च रोजी सायं. ५ वा. भवानी चौकात बाल गट आणि खुला गटांसाठी भव्य नृत्य स्पर्धा. दि. ८ मार्च रोजी सायं. ६ वा. लातुर येथील शिवशाहीर संतोष साळुंके यांचा 'पोवाडा व शाहीर महाराष्ट्राचा' कार्यक्रम. दि.२० मार्च रोजी दुपारी ४ वा. तीन महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात येईल.

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मार्च -**

नळदुर्ग येथे दि.१६ ते २० मार्च या कालावधीत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज आणि वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या संयुक्त जयंतीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यंदा ही जयंती एकत्रितपणे साजरी केली जात असून, यानिमित्त विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.१६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता उमरग्याचे आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते भवानी चौकात या तीन महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन होऊन प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात आली. यापूर्वी सकाळी ९ वाजता जयंती महोत्सव समितीच्या वतीने शहरातील महिलांची भव्य शोभयात्रा काढण्यात आली. शोभयात्रेची सुरुवात लोकमान्य वाचनालयातील गणेश मंदिरातून करण्यात आली. या शोभयात्रेत शहरातील विविध समाज घटकांतील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.


शोभयात्रेमध्ये शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले, वैभव पाटील, प्रमोद कुलकर्णी, नवल जाधव, शिवय्या स्वामी, नितीन कासार, कमलाकर चव्हाण, ज्ञानेश्वर घोडके, विलास येडगे, अमर भाळे, पद्माकर घोडके आणि इतर विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रविण स्वामी यांच्या हस्ते तीन महापुरुषांच्या प्रतिमांचे पुजन आणि प्रतिष्ठापना झाली. या प्रसंगी शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने आमदार स्वामी यांचा सत्कार करण्यात आला.

शिव भक्तांनी या सर्व कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष पुदाले यांनी केले आहे.

# जकनी तांडा येथील खडी क्रशरमुळे नागरीक त्रस्त; ब्लास्टिंगमुळे घरांना तडे







**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१६ मार्च -**

तुळजापुर तालुक्यातील जकनी तांडा येथील खडी क्रशर केंद्रामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आणि नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या खडी क्रशरमुळे येथील भागात प्रचंड धुळ साचली आहे. तसेच दिवसा-रात्री झालेल्या ब्लास्टिंगमुळे लोकांना मानसिक आणि शारीरिक त्रास होत आहे. जकनी तांडा येथील काही घरांना वारंवार होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे तडे गेल्याचे स्थानिक नागरीकांचे म्हणणे आहे. यावरून स्थानिक स्तरावर गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

याठिकाणी गौण खनिजांच्या उत्खननावर संबंधित महसूल विभागाने योग्य रॉयल्टी जमा केली आहे की नाही, तसेच ग्रामपंचायतीला कर भरण्याबाबत किती रक्कम प्राप्त झाली आहे, याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. खडी क्रशर सुरू करतांना सर्व विभागाच्या परवानग्या घेतल्या गेल्या का, तसेच खडी क्रशर सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांचे पालन झाले आहे का, याची सुद्धा चौकशी करण्यात यावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीच्या परवानगीबाबतही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. खडी क्रशर सुरु करण्यासाठी ग्राम पंचायतीने कोणत्या अटी व शर्ती घालून परवानगी दिली आहे, तसेच खडी क्रशर चालकाने ग्रामपंचायतीला किती कर भरला आहे, याची सुद्धा तपासणी होणे आवश्यक आहे. यावर जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ तपासणी करण्याची मागणी नागरिक करत आहेत. खडी क्रशरमुळे शेतकऱ्यांच्या पिकांवर, झाडांवर, फळझाडांवर धुळ साचल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचे पिके नष्ट होण्याच्या कगारावर आहेत. याठिकाणी होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे स्थानिक घरांनाही तडे गेल्याने वातावरणात तणाव निर्माण झाला आहे. यामुळे स्थानिकांचे जीवन संकटात आले आहे.

तपासणीसाठी जिल्हाधिकारी यांनी तात्काळ खडी क्रशर केंद्राची पाहणी करावी. खडी क्रशरने सर्व नियमांचे पालन केले आहे का, याबाबत तपासणी करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जर याचा धोका निर्माण होत असेल, तर या खडी क्रशरला बंद करण्याच्या कारवाईचा आदेश देण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस नवीन तीन शाखांना परवानगी

### निलंगा , मुरुड आणि केज याठिकाणी होणार पिपल्स बँकेच्या नवीन शाखा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ मार्च**

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस रिझर्व्ह बँकेच्या वतीने नवीन तीन शाखा कार्यान्वित करण्यास परवानगी दिल्याचे पत्र नुकतेच रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स बँकेस प्राप्त झाल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी दिली आहे. यावेळी बँकेचे संचालक प्रा.वसंत चव्हाण, अॅड.विष्णूपंत सोळंके, अरुण काळे, पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, अॅड.सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडू भाई दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, प्रा वनमाला रेड्डी,सौ.स्नेहा हिवरेकर, लक्ष्मण दासूद, सचिन बेंबडे हे उपस्थित होते. १९९६ साली अंबाजोगाई शहरातील व्यापारी तथा नागरिकांची निकड लक्षात घेऊनन अल्पशा भांडवलावर अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची स्थापना करण्यात आली होती. आज जवळपास सत्तावीस अठ्ठावीस वर्षात बँक ५३७ कोटीच्या ठेवी १९ कोटींच्या भांडवलावर २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

सप्टेंबर २०२४ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल हे रू १८ कोटी आहे. बँकेचा स्वनिधी हा रुपये ४७ कोटी आहे. राखीव निधी हा १४ कोटी लाख रुपये एवढा आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमास आधीन राहून ग्राहकांना रु.३२८ कोटी एवढा कर्ज पुरवठा केला असल्याचे बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले. सप्टेंबर २०२४ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु २४३ कोटी एवढी आहे. मागील वर्ष अखेरीस बँकेस करपसच्यात ४ कोटी २० लाखांचा नफा होऊन ०% एन पी ए मिळवला असून लेखा परीक्षण अहवालात प्रतिवर्षी बँकेस अ दर्जा प्राप्त होत आहे. बँकेची ही उंच भरारी पाहता बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे मोदी यांनी नमूद केले.

अंबाजोगाई पिपल्स बँक ही आज वीस शाखांच्या द्वारे ग्राहकांना सेवा पुरवीत आहे . नुकत्याच आणखी दोन नवीन शाखां रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार अंबाजोगाई (चौसाळकर कॉलनी) व छत्रपती संभाजी नगर (सातारा परिसर) येथे सुरू केल्या आहेत. यापुढे पुणे (पिंपरी चिंचवड) व मुंबई याठिकाणी सुद्धा बँकेच्या शाखा सुरू करण्याचा मानस असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. बँकेने खढक्षेत्रात देखील ग्राहकांना तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी भरीव अशी कामगिरी केली आहे. डिजिटल बँकिंग च्या माध्यमातून UPI, IMPS, RTGS , ATM द्वारे ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असल्याने मोदी यांनी यावेळी नमूद केले. बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची ही पावतीच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी स्पष्ट केले.

मागील काळात अनेक आर्थिक संस्था डबघाईला येऊन दिवाळखोरी मध्ये निघाल्या. अनेक ठेवीदारांना याचा मोठ्या प्रमाणावर फटका सहन करावा लागला. मात्र अशाही परिस्थितीत अंबाजोगाई पिपल्स बँक ग्राहक ठेवीदार व सभासदांच्या विश्वासाच्या बळावर ताठ मानेने आपला डोलारा पुढे नेत असल्याचा अभिमान संस्थापक राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर देखील कर्जधारक ग्राहकांचा विचार करुन बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले. बँकेचे माननिय सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे बँक दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्याचे दिसून येत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी नमूद केले .

अंबाजोगाई पिपल्स बँक केवळ अर्थकारणच न करता वेळोवेळी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविले असते. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान, रक्तदान शिबीर, कोरोना योध्दा सन्मान, बँकिंग क्षेत्रात महिला जनजागृती अशा विविध सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनामुळे व ग्राहकांसाठीच्या नवनवीन उपक्रमामुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली आहे. यापुढेही अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

# दीक्षांत समारंभ हा प्रेरणादायी भविष्याला दिशा देणारा कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगाला स्पर्धा करणारी असून प्राचीन काळापासून नालंदा, तक्षशीला सारखे विद्यापीठे ही जगातील नामवंत लोकांना भारतात शिक्षणासाठी उपयुक्त ठरली. दीक्षांत समारंभ हा प्रेरणादायी भविष्यात दिशा देणारा कार्यक्रम आहे, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रचे अधिष्ठाता डॉ.संजय साळुंके यांनी केले.

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली, त्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण, दीक्षांत समारंभाचे बुधवारी आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.साळुंके हे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नवगण शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे, संस्था प्रतिनिधी डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. साळुंके म्हणाले की, प्राचीन काळापासून माहिती आणि तंत्रज्ञानाच शिक्षण भारतात दिल जात होतं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आर्किटेक्चरचे शिक्षण उच्च दर्जाचे होते. भारतीय शिक्षण व्यवस्था ही वैभवशाली दर्जेदार असून आज नवीन शैक्षणिक धोरण सन २०२० हे जगातील शिक्षणाचा ट्रेंड बदलणारे असून प्रत्येकाला आपल्या सोयीनुसार अभ्यासक्रम स्वीकारण्याचा अधिकार मिळालेला असून छोट्या व्यवसायाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम स्वीकारले जात आहेत. उद्योगांना पुरक असे शिक्षण विद्यार्थ्यांना निवडता येऊ लागलेले आहेत. ते अभ्यासक्रमात घेतले जात असून कोणातेही काम हे उत्तम दर्जाचे आहे. ग्रामीण भारतातील सामाजिक, आर्थिक रोजगाराची संधी निर्माण करणारे शिक्षण आहे.स्पर्धा निर्माण करणारे शिक्षण निर्माण झालेले असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन डॉ.पांडूरंग सुतार, बळीराम राख यांनी केले. आभार डॉ.संतोष तळेकर यांनी मानले. कार्यक्रमाचा सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमास निदेशक डॉ.भागचंद सानप, एनसीसी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.यादव घोडके विद्यार्थी प्रतिनिधी शितल चव्हाण यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### दीक्षांत समारोह हा विद्यार्थ्यांच्या सन्मानाचा दिवस : डॉ.योगेश क्षीरसागर

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सहसचिव डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, आज विद्यार्थ्यांचा सन्मानाचा दिवस असून नवीन आयुष्यासाठी प्रेरणा देणारा उपक्रम आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना योगदान देण्यासाठीची संधी नवीन शैक्षणिक धोरणानुसार निर्माण झालेली असून नवीन शैक्षणिक धोरण बदलणारे व्यावसायिक प्रशिक्षण देत असून विद्यार्थ्यांने स्वतः व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन सामाजिक, आर्थिक विषमता या विषयांना आवाहन उभे करणारी सुसंकृत पिढी घडविणारी व उद्योजक निर्माण करणारी शिक्षण प्रणालीचा उदय यानिमित्ताने होत आहे. पदवी मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दीक्षांत समारंभप्रसंगी पीएचडी संशोधक, पदव्युत्तर विभागातील व पदवी विभागातील पदवीधर विद्यार्थ्यांचे दीक्षांत पदवी देऊन मान्यवरांच्या हस्ते पदवी वितरण करण्यात आले.

# खा.सोनवणे यांच्या उपस्थितीत आडसकर यांच्या खंदे समर्थकांचा प्रवेश!

### केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ मार्च**

केज तालुक्यातील वरपगाव येथील रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक २० वर्ष सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन राहीलेले श्री. अंकुश नाना देशमुख व व्हाइस. चेअरमन श्री. अंबरभाई शेख यांनी अॅड. बाबुराव देशमुख य्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खा.मा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केलाआहे त्यामुळे केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार पडताना दिसत आहे अनेक वर्षे आडसकर गटा सोबत काम करणारे कार्यकर्ते रमेशराव आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत कारण आडसकर यांनी चिंचोली माळी जिल्हा परिषद अनेक वर्षे चालवली परंतु कवडीचा पण विकास त्यांना करता आला नाही. परंतु



खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाच वर्षे चिंचोली माळी जिल्हा परिषदेवर काम केले पन भरघोस विकास निधी चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दीला व आडसकर यांनी २५ वर्षात जो विकास चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये केला नाही त्यापेक्षा दुप्पट विकास खासदार बजरंग बप्पा सोनवणे चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मधुन निवडुन आल्यानंतर पाच वर्षांत केला आहे त्यामुळे रमेश आडसकर यांच्या वर चिंचोली माळी सर्कल मधील जनता नाराज होऊन आज रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक सुध्दा रमेश आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत त्यांचाच एक भाग अंकुश नाना देशमुख व अंबरभाई शेख यांनी रा.कॉ.प.शरद पवार साहेब यांच्या पक्षात प्रवेश केला यावेळी उपस्थित लक्ष्मण देवकर , विनायक कापरे, बाबासाहेब नरहरी देशमुख ,सुनिल देशमुख ,संभाजी शितोळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# कृषी केंद्र चालकाची बॅग चोरी

### व्यापाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

शहरातील जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे मालक अण्णाभाऊ साठे चौकात कामासाठी थांबले होते. त्यांच्या कार मध्ये ठेवलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण तयार झाले असून या विरुद्ध कारवाई करण्याचे निवेदन व्यापाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले आहे.

जुना मोंढा येथील बळीराजा ग्रो एजन्सीचे केदारनाथ शहीर हे शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात (दि.१) मार्च रोजी रात्री कामासाठी गाडी बाजूला लावून थांबले असता त्यांच्या कार मध्ये ३ लाख रुपये असलेली कॅशबॅग कारच्या काचा फोडून चोरट्यांनी लंपास केली आहे. अशा प्रकारे होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे अशा चोरट्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा तसेच केदारनाथ शहीर यांचो चोरी केली रक्कम याचा तपास करावा या मागणीचे निवेदन बीड पोलीस अधीक्षकांना व्यापाऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.

# परमेश्वर सातपुते यांना फक्त जिल्हाप्रमुख पदावरून मुक्त केले

### शिवसेना पक्षातून हकालपट्टी झालेली नाही

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**



परमेश्वर सातपुते यांच्या जिल्हाप्रमुख पदाला तूर्तास पक्षश्रेष्ठीकडून स्थगिती देण्यात आली आहे शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या पुढील आदेशापर्यंत प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून अन्य व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे.

परंतु काही विरोधकांनी परमेश्वर सातपुते यांची पक्षातून हकालपट्टी झाली अशी बातमी प्रसार माध्यमांवरती प्रसारीत केली आहे परंतु असे नसून परमेश्वर सातपुते यांना फक्त जिल्हाप्रमुख पदावरून मुक्त केले आहे शिवसेना पक्षातून हकालपट्टी झालेली नाही.

यामुळे प्रभारी म्हणून दुसऱ्याकडे जबाबदारी दिली जरी असली तरीही लवकरच या संदर्भात पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांची भेट घेऊन या संदर्भात सविस्तर चर्चा करणार असल्याचे परमेश्वर सातपुते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात शास्त्रीय संगीत महोत्सव कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

दिनांक १५ मार्च २०२५ रोजी नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या उपाध्यक्ष मा.डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरूवात संस्थेचे प्राशसकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस.,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,प्रा.पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांच्या हस्ते उदघाटन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.या महोत्सवामध्ये शास्त्रीय



संगीत,गायन,नाट्यगीत व उपशास्त्रीय संगीत,गझल अशा विविध गीत प्रकाराचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी आपल्या मनोगतामधून संगीत विभागाची सुरूवात ते आजपर्यंतच्या यशस्वीतेचा लेखाजोखा मांडला.संगीत महोत्सवामध्ये देवयानी वाघमारे,श्रृष्टी आनेराव, कैवल्य सुरवसे,अमर मोरे,सुभाष शिंदे,विजय कोरडे,सिध्देश्वरी कोकाटे, अश्विनी कोकाटे,शिवांगीनी गाडे, श्रीकांत देशमुख,पवन शिंदे,आदीत्य दुनगु या विद्यार्थ्यांनी ख्याल गायन,गझल गायन व नाट्यगीत गायन सादर केले. या कार्यक्रमाची साथसंगत रविंद्र दादर, व पवन शिंदे,प्रा.इंद्रजीत भांगे यांनी केली.

तसेच प्रा.इंद्रजीत भांगे यांनी राग शंकरातील बंदिश सादर केली. तसेच प्रा.राहूल सोनवणे घारगावकर यांनी रागजोग गाऊन या मैफलीची उंची वाढवून कार्यक्रमाची सांगता केली.

संगीत महोत्सवाच्या यशस्वीतेमध्ये संगीत विभागाचे प्रा.दीपक जमधाडे,प्रा. सुरेश थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा.राहूल सोनवणे, तर आभार प्रा.दीपक जमधाडे यांनी केले.

या कार्यक्रमास आदी सह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच संगीत विभागातील विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अंबाजोगाईत झाली महिला मॅरेथॉन युवती, महिलांचा मोठा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ मार्च**

येथील रोटरी क्लब, इनरव्हील क्लब व रोटरॅक्ट क्लब आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी आयोजित केलेल्या महिला मिनी मॅरेथॉन स्पर्धेला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय खेळाडू व नायब तहसीलदार स्मीता बाहेती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनिता मोदी, डॉ.सुलभा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी चौकात मिनी मॅरेथॉनला प्रारंभ करण्यात आला. संत भगवानबाबा चौकात विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्य हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.पाचवी ते दहावी गटात प्रणिता माने प्रथम, सोनल भिवगुडे द्वितीय, अंजली केंद्रे तृतीय व अनुष्का करंडेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

आठरा ते पंचेवीस वयोगटात वैष्णवी गडदे प्रथम, सुप्रिया चिरके द्वितीय, तनुजा देशमुख तृतीय व वैष्णवी कोल्हापूरे उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.सव्वीस ते एकोणपन्नास वयोगटात डॉ प्रिया तिडके प्रथम, सीमा उणवणे द्वितीय, सारिका नायबळ तृतीय व ललीला मगर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

पन्नास ते सत्तर वयोगटात सविता पाटील प्रथम, उषा यादव द्वितीय , कल्पना लोहिया तृतीय व अनिता शेटकार यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.पारपर्धेसाठी पंच म्हणून क्रीडा शिक्षक शिवकुमार निर्मळे, क्रीडा समन्वयक दत्ता देवकते, मनेश गोरे यांनी काम पाहिले. रोटरीचे कल्याण काळे, प्रविण चोकडा, संजय सुराणा,राजेंद्र घोडके, ओमकेश दहीफळे, गणेश राऊत, डॉ निशिकांत पाचेगवकर, प्रकल्प संचालक स्वरूपा दिग्रसकर, डॉ.कलपना मुळावकर, मंजुषा जोशी, जगदीश जाजू, रुपेश रामावत, इनरव्हीलच्या सुरेखा सिरसाट, संगीता नावंदर, अंजली चरखा, अंजली निर्मळे, रेखा तळणीकर, रोटरॅक्टचे जतीन कर्नावट, सर्व्हेश बजाज, परदेशी व इतरांनी सहकार्य केले.

# वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांना रजत पदक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ मार्च**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी बीड जिल्ह्यात वन अधिकारी म्हणून काम करतांना २०२० ते २१ मध्ये केलेल्या वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल राज्याच्या वन विभागाने रजत पदक जाहीर केले आहे.

बीड जिल्ह्यात सन २०१६ ते २०२१ मध्ये जिल्हा वन अधिकारी म्हणून अमोल सातपुते हे कार्यरत होते. या काळात जिल्ह्यातील २७० एकर वन क्षेत्रातील अतिक्रमण हाटवुन येथे पुन्हा वनीकरण केले होते. त्याच बरोबर जिल्ह्यातील ५० ठिकाणच्या ११० एकर क्षेत्रात मियावाकी पध्दतीने घनदाट वनांची निर्मिती करून तेथील स्थानिक जैवविविधता संवर्धनाचा यशस्वी प्रयत्न केला होता. वृक्षारोपण संगोपनासाठी दुष्काळी बीड जिल्ह्यातील २७ ठिकाणी फिरत्या सौर ट्रॉली तंत्राचा वापर करून ग्रीन बेल्टची निर्मिती केली होती. त्याच बरोबर बीड जिल्ह्यातील वनक्षेत्रात वन्यजीवांसाठी ३ वर्षात १२० पाणवठे तयार केले व शिकारीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात प्रथमच कॅमेरा ट्रॅपचा वापर केला.वन विभागाकडून राज्यात वनसंपत्तीचे सरंक्षण व संवर्धनाचे काम प्रभावीपणे करणाऱ्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी व त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रोत्साहीत करण्यासाठी राज्यस्तरावरून पदके दिली जातात.या पदकासाठी सध्या जुन्नर येथे कार्यरत असलेले अमोल सातपुते यांची राज्यस्तरीय पदक निवड समितीने रजत पदकासाठी निवड केली आहे. या निवडीबद्दल उपवन संरक्षक अमोल सातपुते यांचे अभिनंदन होत आहे.



# गोरठा जळीत कांडातील दोन आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१६ मार्च**

उमरी मुदखेड रोडवरील गोरठा शिवारात दि.१२ मार्च रोजी एका अनोळखी व्यक्तीचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह सापडला होता. या प्रकरणात पोलिसांनी मयताची ओळख पटविण्याबरोबरच या घटनेतील दोन आरोपींना अटक केली आहे.



उमरी परिसरातील गोरठा शिवारात दि.१२ मार्च रोजी एका प्लॅस्टिकच्या टाकीमध्ये ज्वलनशिल पदार्थ टाकून अंदाजे ३० वर्षाच्या एका अनोळखी इसमास जाळून टाकण्यात आले होते. हि बाब उघड झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत माहिती घेतली. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी सापडलेल्या कपड्याचे जळालेले तुकडे, अंगठ्या, जळालेले शरीर यावरुन मयताची ओळख पटविणे कठीण असतानाही सीसीटीव्ही कॅमेरे तसेच सर्व पोलीस ठाणे व राज्याच्या सिमेलगत असलेल्या पोलीस ठाण्यातील मिसिंगचे रेकॉर्ड तपासणी केली. दरम्यान हा शोध सुरु असतानाच दि.१५ मार्च रोजी मयताचे नाव साईनाथ विठ्ठल शिंदे असून तो असर्जन येथील रहिवाशी असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान या प्रकरणात पोलिसांनी अधिक तपास केला असता हा खुन अनैतिक सबंधातून झाला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मयत साईनाथ शिंदे यांच्या वडिलाने उमरी पोलीस ठाण्यात तक्रार देवून साईनाथ शिंदे याचा खुन जितू रामसिंघ बघेल व त्याच्या आईने खुन केला असल्याची तक्रार उमरी पोलिसात दिली. यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जितू बघेल व त्याच्या आईस ताब्यात घेतले. दरम्यान दोन्ही आरोपींनी साईनाथ शिंदे याचा खुन करुन मृतदेह जाळल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांना उमरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, उमरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अंकुश माने, स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, पोलीस अंमलदार गंगाधर कदम, प्रकाश मलदोडे, रुपेश दासरवार, संजीव जिंकलवाड, शितल सोळंके, राजकुमार डोंगरे, महेश बडगू, विश्वनाथ पवार, हेमंत बिचकेवार यांच्या पथकाने केली.

# अपघातग्रस्तांना आ. भीमराव केराम यांची तातडीने मदत

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१६ मार्च**

मोटरसायकलने गावाकडे परत जाताना थारा गावाजवळ भीषण अपघात होऊन गंभीर जखमी झालेल्या तिघांना आमदार भीमराव केराम यांनी तात्काळ घटनास्थळी रुग्णवाहिका पाठविण्यापासून ते आदिलाबाद येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये उपचार करण्याकामी तातडीने सर्वतोपरी मदत करून सामाजिक बांधिलकी जोपासली असून त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.



सविस्तर असे की किनवट तालुक्यातील मौजे थारा येथील रहिवासी असलेले तिघेजण १६ मार्च रोजी १० वाजताच्या सुमारास दुचाकीवरून गावाकडे परत जात असताना त्यांचा भीषण अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच आमदार भीमराव केराम यांनी तात्काळ अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी घटनास्थळी रुग्णवाहिका पाठवून जखमीना गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारकामी दाखल केले. यावेळी आ. भीमराव केराम यांचे जनसंपर्क अधिकारी तथा आरोग्यदूत संतोष मऱ्हसकोल्हे, पवन मडावी, सरपंच अनिल कनाके, दीपक कुडमते, संतोष कनाके, बबलू मिरासे यांनी उपजिल्हा रुग्णालयात जाऊन अपघातग्रस्तांची विचारपूस केली असता तिघांचीही प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ आदिलाबाद हलविण्यास कळविले. दरम्यान तिघांनाही तातडीने आदिलाबाद येथील रिम्स हॉस्पिटलमध्ये पोहोचविल्यानंतर आ. भीमराव केराम यांनी आदीलाबादचे आमदार पायल शंकर यांच्यासी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला व अपघाताची माहिती देऊन तातडीने वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी प्रत्येक पातळीवर सर्वतोपारी मदत केली.

सध्या जखमीवर आदिलाबाद येथे उपचार सुरू असून दोघांची प्रकृती स्थिर आहे तर एकजण अजूनही अत्यवस्थ असल्याचे मऱ्हसकोल्हे यांनी सांगितले आहे. आ. भीमराव केराम यांच्यामुळे थारा येथील अपघातग्रस्तांना तातडीने म्बुलन्स व उपचारकामी सर्वतोपरी सुविधा मिळाली असून प्रत्यक्ष हजर राहून मदतीचा हात दिल्याबद्दल आरोग्यदूत संतोष मऱ्हसकोल्हे व त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### व्हॉइस ऑफ मीडिया उपाध्यक्षपदी अनिल डोईफोडे व सचिवपदी सूभाष नाईक

**भोकर**-येष्ठ पत्रकार अनिल डोईफोडे यांनी गेली अनेक वर्ष वर्तमानपत्रातून अन्याय अत्याचार भ्रष्टाचाराच्या विरोधात प्रखड लीखान केले. ४४ देशांमध्ये कार्यरत असलेली पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल असणारी व्हॉइस ऑफ मीडिया या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे व जिल्हाध्यक्ष गणेश जोशी यांनी अनिल डोईफोडे यांना तालुका उपाध्यक्षपदावर निवड करुन जिल्हा ग्रामीण सचिव पदी सूभाष नाईक यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल जिल्हा कार्यकारणीच्या महिला प्रतिनिधी ज्योती सरपाते यांनी साक्षी कलेक्शन येथे येथोचित सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी सुरेश सिंग चौधरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भोकर येथील बहुजन नेते नागनाथरावजी घीसेवाड तालुक्यातील नेते भगवानरावजी दंडवे,भोकर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शेख युसुफ भाई, युवा नेते संदीप गौड,युवा नेतृत्व संजय पाटील घंटलवार अहेमद भाई करखेलीकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ वर्षेवार,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश देशमुख, अनिल जाधव अरुण डोईफोडे लतीफ शेख, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कदम डौरकर, भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष मिलिंद दादा गायकवाड, युवा पँथर सेनेचे निखिल भाऊ हंकारे,संतोष रतनवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सय्यद खालेद आदी सामाजिक राजकीय क्षेत्रातील मित्रपरिवारांनी शुभेच्छांचा वर्षाव केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने ज्योती मिराशे यांचा सन्मान

**हिमायतनगर**-आयोजित केलेल्या नांदेड जिल्हा पोलीस पाटील मेळावा व कार्यशाळेत हिमायतनगर तालुक्यातून उत्कृष्ट काम करणारे पोलिस पाटील ज्योती मिराशे यांची निवड करण्यात आली. या निमित्ताने त्यांचा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांना सन्मानित करण्यात आले. जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या वतीने पोलिस पाटील मेळावा नांदेड येथे पार पडला. सर्व तालुक्यातील उत्कृष्ठ काम करणाऱ्या पोलिस पाटीलाची निवड करून त्यांना पोलिस अधिक्षक यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हिमायतनगर तालुक्यातील जिरोणा येथे पोलिस पाटील गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी अविरतपणे काम केल्याने ज्योती मिराशे यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी गावातील तंटे गावातच मिटवणे व तालुक्यातील सर्व पोलीस पाटील व तालुक्याची पोलीस प्रशासन यांच्यामध्ये समन्वय ठेवणे यासह अनेक कार्य उत्कृष्ट केल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन मेळाव्यात त्यांचा अधिक्षक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांचे सर्व स्तरावर अभिनंदन केले जात आहे.



### अनिता दाचावार यांचे निधन

**उमरी**-येथील अनिता संतोष दाचावार बितनाळकर वय ४२ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने रविवारी दिनांक १६ मार्च दुपारी सव्वा बारा वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दिनांक १७) सकाळी नऊ वाजता उमरी शहरातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. उमरी शहरातील प्रसिद्ध व्यापारी संतोष दाचावार बितनाळकर यांच्या त्या पत्नी होत. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा व आर्य वैश्य समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# अंगणवाडी भरती पारदर्शक होणार : आ. कोहळीकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.१६ मार्च**

हदगाव विधानसभा मतदारसंघात होऊ घातलेल्या अंगणवाडी व मदतनीस भरती प्रक्रिया ८५ जागे करिता ६९५ अर्ज आले असून ही प्रक्रिया पारदर्शक व गुणाणूक्रमे शालेय गुण जास्त आहेत अशाच उमेदवाराची निवड होणार आहे. त्यामुळे कोणालाही व कोणत्याही आमिषाला हदगाव- हिमायतनगर मधील अंगणवाडी ज्या उमेदवार आहेत त्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी बळी पडू नये व अशी काही घटना किंवा माहिती आढळून आल्यास अशी बनवाबनवी करून निवड प्रक्रियेमध्ये जर शिफारस करून प्रक्रियेत काही देवाण-घेवाण व्यवहार जर लक्षात आला तर ती प्रक्रिया रद्द करण्यात येईल व त्या प्रक्रियेत नंतर निवड करण्यात येईल असे हदगाव विधानसभा मतदारसंघातील आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी हदगाव येथे विश्रामगृह पत्रकार परिषदेत सांगितले.



ज्या वेळेस हदगाव विधानसभा मतदारसंघातील अंगणवाडी मदतनीस या प्रक्रिया झाल्या त्या वादग्रस्त राहिले आहेत ही निवड प्रक्रिया आपल्या शालेय गुनानुक्रमे नुसार असून त्या शालेय गुणात त्यांची निवड होणार आहे. त्यामुळे कोणाची शिफारस या अंगणवाडी भरती प्रक्रियेस चालणार नाही किंवा अशी काही माहिती जरी आपल्यापर्यंत आली तरी ती भरती प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

अंगणवाडी व मदतनीस यांच्या बारावी परीक्षेमध्ये जे गुण मिळवले आहेत व त्यात बी.ए, बीएड, एम ए व मागासवर्गीय ओबीसी, एससी, एसटी, विधवा यांना जे शासन गुण देण्यात आले आहेत ते गुण एकत्रित करून त्या गुणाची बेरीज ज्याची जास्त येईल अशाच उमेदवारांना त्या अंगणवाडी प्रक्रियेस पात्र करून त्यांनाच निवड करण्यात येईल ही निवड पारदर्शक असून या निवडीत कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार राहणार नाही जर असे आढळून आले तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करून ती निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल अशी माहिती आमदार बाबुराव कदम कोहळळीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेत हदगाव शहरात व ग्रामीण भागात जल जीवन या योजने विषयी बरेच प्रश्न विचारण्यात आली तसेच हदगाव प्राथमिक शिक्षण विभागात ढासळत चाललेली प्रतिमा यावरही विद्यमान आमदाराला बरेच प्रश्न पत्रकाराने विचारले मी प्राथमिक शिक्षणात लक्ष घालून ही शिक्षण यंत्रणा चांगली दणकट करेल हे तुम्हाला काही दिवसात लक्षात येईल व तुम्ही मला प्राथमिक शिक्षणाविषयी अजून दोन महिन्यानंतर बोला त्यात पूर्ण बदल झालेले तुम्हाला दिसतील असा विश्वासा आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, अनिल बाभळीकर , संदेश हडसणीकर, संभाजी लांडगे, आबा वानखेडे, राजू तावडे, शितल भांगे, बबन मालोंदे, स्वयि सहाय्यक बबन कदम तर बरेच शिवसैनिक उपस्थित होते.

# आदमपूर येथे आढळला दुर्मिळ पोवळा साप

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर, दि.१६ मार्च**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील शेतकरी शंकरराव माधवराव हांद्रे यांच्या घरात रविवार दि.१६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता पोवळा जातीचा अतिविषारी साप आढळून आला.यावेळी येथील पुणे

वन्य पशु,पक्षी संरक्षण सामाजिक संस्थेचे सर्पमित्र राजेश मुंडकर,सर्पमित्र माधव कोळनुरे,सर्पमित्र सतिश मोरे व वन्य जीव प्रेमी जाफर आदमपूरकर यांनी तेथे धाव घेत पाहणी केली असता त्यांना तेथे अतिशय दुर्मिळ असा विषारी पोवळा जातीचा साप आढळून आला,यावेळी सर्पमित्रांनी त्याला कौशल्याने पकडून जीवदान दिले,

तर या सापाबाबतची माहिती आदमपूर परिसरातील वनरक्षक सहदेव दोसलवार यांना देत सदर सापाला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त करण्यात आले.

# सिनेसृष्टीतील ५० कलावंतासह प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व नृत्यांगणा माधुरी पवार यांचे १८ रोजी लाईव्ह परफॉमन्स

## किनवटचा सुशांत ठमके रुपेरी पडद्यावर झळकण्याचं निमित्त

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१६ मार्च**

येथील भूमिपुत्र उभरता अभिनेता शुशांत ठमके यांचा 'पिंटू की पप्पी' हा बॉलीवूड चित्रपट २१ मार्च रोजी जगभर प्रदर्शित होत आहे. यातील अजय अतुल जोडीतील अजय यांनी गायिलेल्या एका गाण्याची ऑनलाईन लाँचिंग १८ मार्च रोजी मातोश्री कमलताई ठमके शैक्षणिक संकूल कोठारी (चि) येथे सिनेसृष्टीतील प्रसिद्ध ५० कलावंतासह प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व नृत्यांगणा माधुरी पवार यांचे लाईव्ह परफार्ममन्सेसचा आनंद घेण्यासाठी सर्व सिने संगीतप्रेमिंनी बहुसंख्येनं उपस्थित राहावे , असे आवाहन शुशांतचे वडील अभियंता प्रशांत ठमके यांनी केले आहे.

येथील शासकीय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत अभि. ठमके बोलत होते. यावेळी सिने स्तंभलेखक उत्तम कानिंदे , महेंद्र नरवाडे यांची उपस्थिती होती. अभिनेता म्हणून पहिल्यांदाच शुशांत ठमके रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. विधी आचार्य निर्मित, शिव हरे लिखित-दिग्दर्शित, प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य यांच्या मार्गदर्शनात तयार झालेला बीग बजेट बॉलीवूड चित्रपट पिंटू की पप्पी हा २१ मार्चला पाच भाषेत जगभर एकाच वेळी प्रदर्शित होत आहे. यातील नऊ गाणी संगीत नृत्याच्या अविष्काराने देशभर प्रचंड गाजत आहेत.



किनवटचा भूमीपुत्र रूपेरी पडद्यावर झळकतोय यानिमित्त बॉलीवूड मधील ५० सिनेस्टार सह महानायक अमिताभ बच्चन पासून ते आजच्या पुष्पा-२ पर्यंतच्या सर्व अभिनेत्यास नृत्य दिग्दर्शनाचे धडे देणारे प्रख्यात नृत्य दिग्दर्शक गणेश आचार्य व प्रसिद्ध नृत्यांगणा माधुरी पवार किनवटच्या भूमिवर मातोश्री कमलताई ठमके शैक्षणिक संकुल कोठारी (चि) येथे मंगळवारी १८ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजतापासून पुढे लाईव्ह परमार्न्सेस सादर करणार आहेत.

किनवट तालुक्याच्या इतिहासातील पहिल्यांदाच भव्यदिव्य मंचावर सिनेकलावंतांच्या संगीत कला आणि नृत्याचा नजारा सादर होणार आहे. किनवटकरांचे मुख्य आकर्षण ठरणाऱ्या या कार्यक्रमात नवोदित चित्रपट अभिनेता शुशांत ठमके, अभिनेत्री जान्या जोशी , विधी यादव यांच्यासह सिनेसृष्टीतील ५० कलाकारांच्या कलेची मेजवाणी याअविस्मरणीय क्षणी मिळणार आहे. यावेळी अजय अतुल जोडीतील अजय गोगावले यांनी गायिलेल्या एका गाण्याची ऑनलाईन लाँचिंग येथून होणार आहे. किनवटच्या इतिहासातील ह्या ऐतिहासिक क्षणी आपल्या भूमिपुत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आपण परिवारासह उपस्थित राहून या सोनेरी क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन आयोजक अभि. प्रशांत ठमके यांनी केले. यावेळी स्थानिक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्याकडून सावरगाव ग्रामपंचायत व शाळेची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि.१६ मार्च**

तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्याकडून सावरगाव (न) येथील आय.एस.ओ धरतीवर पुर्ण झालेल्या ग्रामपंचायत व जि.प. प्राथमिक शाळेतील कामाची पाहणी केली.



महिला सशक्तिकरणावर विशेष भर देत त्यांच्या कामाचे महत्त्व पटवून दिले. शाळेतील स्वच्छता व संस्कार अध्यापनावर समाधान व्यक्त केले. यावेळी महसूल तलाठी संघटनेचे अध्यक्ष भुमेश्वर विभुते, निखील सुंदरगिरवार, मुंडे, माधव काकडे, पत्रकार जगदीश पाटील कदम, माजी.शालेय समितीचे अध्यक्ष निवृत्ती चांदणे, राम पाटील कदम, ज्ञानेश्वर पाटील कदम, परसराम चांदणे, बालाजी शेटकर, मुख्याध्यापक बी.बी.खेडकर, बाबर आर.आर, टोकलवाड व्ही. एस., बडगिरे बी.एस.,बालाघाटे बी.पी., सौ.चिद्रेवार व्ही.यु., सौ.उपरे एम.व्ही., सौ.भुस्कुटे एस.एम., सौ.भुजबळ जे.एन., सौ.इंद्राळे जे.बी. आदी उपस्थित होते.

# देगलूर - चेंडेगाव-बिदर, देगलूर ते हानेगाव राष्ट्रीय महामार्गाला जोडण्याची मागणी

## संतोष पाटील यांनी नितीन गडकरींना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि.१६ मार्च**

नांदेड जिल्ह्यातील देगलूरमध्ये आजही चांगल्या रस्त्यांअभावी हा परिसर विकासापासून कोसो दूर आहे. देगलूर तालुका प्राचीन मंदिरासाठी प्रसिध्द आहे.

देगलूर तालुक्यातील होट्टल,रामपूर, येरगी आणि करडखेड येथे चालुक्य काळातील ऐतिहासिक वारसा असलेली मंदिरे आहेत, ती पर्यटन क्षेत्रे आहेत. त्यामुळे देश-विदेशातून लोक येथे येत असतात. मात्र येथे जाण्यासाठी चांगले रस्ते नसल्याने पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

देशातील सर्व पर्यटन स्थळे राष्ट्रीय महामार्गशी जोडले जात आहेत.त्या धर्तीवर राष्ट्रीय महामार्ग क्र.६३ हा रामपूर - होट्टल - येरगी - चेंडेगाव (तेलंगणा)- माळेगाव - बिदर मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० शी जोडावा त्यामुळे नांदेड ते बीदर रस्ता सुद्धा कमी अंतराचा होतो.तसेच देगलूर ते हनेगाव रस्ता सुद्धा राष्ट्रीय महामार्गशी जोडावा ज्यामुळे शीख भाविकांना सुद्धा बीदर जाण्यासाठी सोयीचे व कमी अंतराचे होईल.

नांदेडहून येणारे शीख भाविक दररोज बिदर येथील गुरुनानक गुरुद्वारात जातात. परंतु हा रस्ता खूपच खराब झाल्याने शीख भाविकांना तसेच या मार्गावरून जाणाऱ्या शेकडो विद्यार्थी व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा मार्ग चांगला झाल्यास विविध प्रांतातून येणाऱ्या सिख व इतर भाविकांना रामपूर,होट्टल,येरगी व करडखेड येथील चालुक्य कालीन मंदिरांना भेट देता येईल आणि त्यामुळे या क्षेत्रातील पर्यटन वाढण्यास मदत होईल आणि आपली ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वाव मिळेल.हे चार ही मंदिरांचे पर्यटन सर्किट झाल्याने एक महत्वाचे पर्यटन सर्किट म्हणून प्रसिद्धीस येईल.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना दिलेल्या निवेदनात म्हटले की हा राष्ट्रीय मार्ग जोडून देगलूरच्या जनतेला खराब रस्त्यापासून दिलासा द्यावा. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा सरपंच संतोष पाटील यांनी सोमवारी दिनांक १० मार्च रोजी दिल्ली येथे सदरील निवेदन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना त्यांच्या निवासस्थानी भेटून दिले आणि याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आग्रही भूमिका घेतली आणि सविस्तर चर्चा केली. यावेळी संतोष पाटील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा येरगी येथील चालुक्य कालीन सांस्कृतिक वारसा दर्शवणारा कॉफी टेबल बुक देऊन सत्कार केला .

# उमरी नगरपरिषदेच्या वतिने महिला दिनानिमित संयुक्त कार्यक्रमाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि.१६ मार्च**

उमरी शहरात संविधान अमृत महोत्सव अंतर्गत घर घर संविधान कार्यक्रम समारोप आणि माझी वसुंधरा अभियान ५ .० स्वच्छ सर्वे क्षण २०२४ - २५ तसेच बक्षिस वितरण व जागतिक महिला दिना निमित्त महिला मेळावा नगर परिषद उमरी यांचे वतीने आयोजित संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला.




यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती स्वाती दाभाडे उपविभागीय अधिकारीधर्माबाद तथा प्रशासक नगर परिषद उमरी उपस्थति होते, तसेच प्रमुख पाहुने म्हणुन जाईताई कैलासराव देशमुख गोरठेकर, दीपेश मढी भारतीय स्टेट बँक शाखा व्यवस्थापक, दिपाली मामीडवार माजी नगर सेवक, अनुसायाबाई कटकदवने माजी नगर सेवक, डॉ. भाकरे मॅडम, प्राचार्य अनुराधा कुलकर्णी , प्राचार्य स्वाती वच्छेवार, प्राचार्य शुभांगी माळवतकर कृषीधिकारी मिरासे, पदमावार दुय्यम निबंधक, कुलकर्णी गटशिक्षण अधिकारी, डॉ.अर्जुन शिंदे, ॲड. गुडाळे, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार, अनिल दर्डा माजी नगर सेवक, सोनु वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते, डॉ. जाधव, कैलास सोनकांबळे पत्रकार, फेरोज पेटल पत्रकार यांची उपस्थति होती. सदर कार्यक्रमात विशेष कार्य पुरस्कार म्हणुन संजीव विठ्ठलराव सवई शासकीय कंत्राटदार उमरी व मारवाडी युवामंच यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रस्ताविकात मुख्यधिकारी निलम कांबळे यांनी माझी वसुंधरा अभियान ५ .० अंतर्गत भूमी, वायु, जल, अग्नि व आकाश ह्या पंचतत्वांचे मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात आली आहे महत्व पटवून दिले महिला दिनीच महिलाचा सन्मान न करता नेहमीच सन्मान आदर करावा असे उपदेश केला आहे .

यावेळी व सुरेख सूत्रसंचालन शिक्षक डी.एम कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन वरिष्ट लिपीक गणेश मदने यांनी मांडले यावेळी शहरातील महिला, नागरीक विद्यार्थी/विद्यार्थीनी मोठया संख्यंने उपस्थति होते. सदरील कार्यक्रम यशस्वी करणेसाठी उमरी नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी घनकचरा कर्मचारी यांनी परिश्रम घेतले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना ऊर्जा संवर्धनाची शपथ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय व महाऊर्जा महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दि.१२ मार्च २०२५ रोजी 'पर्यावरणासाठी जीवनशैली ' हा ऊर्जा बचत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे होते. प्रमुख वक्ते म्हणून ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील,डॉ.संध्या वाडीकर,महाऊर्जा विभागातील प्रकल्प अधिकारी पूजा धुमाळ आणि कार्यक्रम समन्वयक डॉ.कोमल गोमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे ऊर्जा ऑडिटर केदार खमितकर यांनी ऊर्जा संवर्धनाचे विविध पैलू उलगडून सांगितले. ऊर्जा संवर्धन कायद्यासंदर्भात तसेच ऊर्जा का महत्त्वाची आहे आणि तिची बचत कशी करावी याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान त्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला, ज्यामध्ये घरामध्ये ऊर्जा कशी वाचवली जावी?, ऊर्जा बचतीसाठी तुमचे विचार काय?, आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपण ऊर्जा वाचवण्यास कसे भागीदार ठरतो? या विषयांवर चर्चा केली. विद्यार्थिनींनी या चर्चेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना ऊर्जा संवर्धनाची शपथही देण्यात आली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सक्रिय सहभाग घेतलेल्या विद्यार्थिनींना कॅप आणि बुकलेट देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

ऊर्जा संवर्धन करणे हे काळाची गरज आहे, आणि प्रत्येकाने जबाबदारीने ऊर्जा बचतीसाठी योगदान द्यावे, असा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.



### संक्षिप्त वृत्त...

## ना. महाजन यांच्या हस्ते १२ एप्रिल रोजी विभागीय स्टेडीयमचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** मराठवाड्यामध्ये मराठवाडा विभागीय स्टेडीयम कव्हा ता.जि.लातूर येथील २४ एकरमध्ये उभारण्यात येणार आहे. त्यास शासनाने मान्यता दिली असून त्या इमारतीचे भूमिपूजन व एनआरएचएम योजनेमधून अत्यंत भव्य अशा प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन, कव्हा पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन, कव्हा पर्यटन स्थळ बोटींग सुविधा, माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लिहिलेल्या लोकयोगी या आत्मचरित्राचे प्रकाशन व जेएसपीएम संस्थेच्या कॉलेज इमारतीचे भूमिपूजन अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन दि.१२ एप्रिल २०२५ रोजी शनिवारी सकाळी १०.३० वा. स्वामी दयानंद विद्यालय, कव्हा येथील मैदानावर राज्याचे जलसंधारण मंत्री गिरीषभाऊ महाजन यांच्या शुभहस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री ना.शिवेंद्रराजे भोसले हे उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे व सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील व इतर मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत अशी माहिती माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी दिली.

## भौतिक धनापेक्षा आध्यात्मिक श्रीमंती सर्वश्रेष्ठ व अविनाशी आहे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** जगात सर्वच धर्माने अध्यात्माची शिकवण सांगितलेली आहे. आध्यात्मिक सुख व शांती चिरकाळ टिकणारे आहे. अध्यात्म हे आंतरिक मनाचे स्वरूप आहे. आंतरिक मन हे सुखदु:खाचे मूळ आहे. सुख-दु:खाचा प्रारंभ आध्यात्माच्या चिंतनाने करता येतो. त्यामुळे



भौतिक धनापेक्षा आध्यात्मिक श्रीमंती सर्वश्रेष्ठ व अविनाशी असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने फाल्गुन पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर येथे करण्यात आले होते. प्रारंभिक कार्यक्रमाची सुरुवात तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने धूपाने आणि दिपाने पूजा करून त्रिसरण अष्टशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष आयु. आशाताई सुशील कुमार चिकटे ह्या उपस्थित होत्या. यावेळी आशाताई सुशील चिकटे यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तद्नंतर प्राचार्य डॉ. संजय गवई, बापू माने, गौतम होलसूरकर, मधुकर शिंदे गुरुजी, उत्तम सोनवणे, सितम सोनवणे, मयुरी आल्टे, शिला चक्रे, बेबीनंदा सोनवणे ई. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

## आ. देशमुख यांनी घेतल्या नागरीकांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** आ.अमित देशमुख यांनी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संघटना संस्थांचे पदाधिकारी नागरिक यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या अडचणी समजून घेतल्या तसेच त्यांच्या निवेदनाचा, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी किरण जाधव,जयश्रीताई उटगे, दीपक सूळ, जगदीश बावणे, संतोष देशमुख, ललितभाई शहा, समद पटेल, विजय देशमुख, प्रमोद जाधव, पृथ्वीराज शिरसाट, राजकुमार पाटील, एन.आर.पाटील, अनुप शेळके आदी उपस्थित होते.

# लातुरात युवकाचा भोसकून खून

### मयत पाणीपुरीवाला : पोलीसांनी गतीने तपास कडून आरोपीला घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** राजस्थानातून लातुरात व्यवसायासाठी आलेल्या एका १९ वर्षीय युवकाचा चाकूने भोसकून खून केल्याची घटना बार्शी रोडवरील हरंगुळ रेल्वे स्थानकानजीक पाण्याच्या टाकीलागत येथे घडली. शिवाजीनगर ठाण्यालगतच्या फुटपाथवर गुरुवारी झालेल्या खुनाच्या घटनेला २४ तास उलटत नाहीत तोपर्यंत दुसऱ्या खुनाची घटना घडली. या सलग खुनाच्या घटनांनी लातूर हादरले आहे.

याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेतील दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी सांगितले, राजस्थान येथून लातुरात पोट भरण्यासाठी आलेल्या दोघा भावंडांनी बार्शी रोडवर हरंगुळ - रेल्वे स्थानक परिसरात पाण्याच्या टाकीनजीक पाणीपुरीचा ठेला लावला होता. तर मोठ्या भावाने हरंगुळ मार्गावर एका ऑइल मीलसमोर ठेला लावला होता. नेहमीप्रमाणे १९ वर्षीय युवकाने शुक्रवारी सायंकाळी पाणीपुरीचा ठेला लावला. दरम्यान, रात्री ९.३० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात मारेकऱ्यांनी त्याच्यावर धारदार शास्त्राने सपासप वार केले. चाकूने पोटात भोसकले. यामध्ये पाणीपुरीवला युवक जाग्यावरच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.

अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून मारेकऱ्यांनी पळ काढला. आजूबाजूला असलेल्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. याची माहिती त्याच्या मोठ्या भावाला देण्यात आली. भावाने घटनास्थळी धाव घेत, लातुर येथील शासकीय रुग्णालयात त्याला दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले. घटनास्थळी लातूर शहर डीवायएसपी रणजीत सावंत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, एमआयडीसी ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधाकर देडे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. याबाबत मयत युवकाच्या भावाच्या माहितीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला. मृतदेहाचे शवविच्छेदन शनिवारी सकाळी पाठविण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, या घटनेतील आरोपी दत्ता संजय ढोरमारे, वय २० वर्षे, राहणार पटेल नगर लातुर व आयान अब्दुल शेख, वय २० वर्षे, राहणार कपील नगर लातुर, यांना पोलिसांनी त्यांचे राहते ठिकाणाहून २४ तासाचे आत ताब्यात घेवुन गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातुर शहर) रणजीत सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, सपोनि. द्रोनाचार्य, नेटके, पोउपनि मोरे, राजपुत, सफौ बेल्लाळे, जगताप पोलीस अंमलदार दामोदर मुळे, कांबळे, भोसले, प्रशांत ओगले, राजू मस्के, साखरे, माने, सोनकांबळे, वायगावकर, बुजारे, वाहुळे, जाधव, महिला पोलीस अमलदार चव्हाण यांनी केलेली आहे.

### लातुरात दोन दिवसात दोन खून

शहरात गुरुवार आणि शुक्रवार रोजीच्या रात्री सलग दोन खुनाच्या घटना घडल्या असून, लातूर शहर आणि जिल्ह्यातील खुनाचे सत्र दिवसंदिवस वाढत असल्याने एकच खळबळ उडाली आहे. गुरुवारच्या खुनाची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. ही घटना ताजी असतानाच रात्री खुनाची दुसरी घटना घडली आहे. पोलीसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे.

## लातुरात 'जीबीएस'चे दोन रुग्ण आढळले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** 'जीबीएस' या आजाराचे दोन पुरुष रुग्ण लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पुणे-मुंबई शहरात 'जीबीएस' आजाराचे रुग्ण उपचार घेत असल्याचे वृत्त असताना लातूर जिल्ह्यात सध्या दोन रुग्णांवर लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे दोन्ही रुग्ण लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील आहेत. एका ४० वर्षीय व्यक्तीवर 'जीबीएस' रुग्ण म्हणून तर ५८ वर्षीय रुग्णावर 'जीबीएस' आजाराचा संशयित म्हणून उपचार सुरू आहेत.

## अस्थिरोग संघटनेच्या कार्यशाळेस प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** लातूर अस्थिरोग तज्ज्ञ संघटना आणि मेडिकल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर्स आणि ऑपरेशन थिएटर असिस्टंट्स यांच्यासाठी लातुरात आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, आरसीसी क्लासेसचे संचालक डॉ. शिवराज मोटेगावकर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेचे २०२५ -२६ चे अध्यक्ष डॉ. संपत डुंबरे पाटील, २०२६-२७ चे प्रेसिडेंट इलेक्ट डॉ. नारायण कर्णे , महाराष्ट्र ऑर्थो. असो. चे जिल्हाध्यक्ष तथा विभागीय उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यशाळेत अस्थिरोगांच्या विविध व्याधी आणि संसर्गावर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. संपत डुंबरे पाटील, डॉ. स्वप्नील कोठाडिया, डॉ शाहजात मिर्जा, डॉ महेश लाके, डॉ.विजय चिंचोलकर, डॉ. द्वारकादास तापडिया यांसह मान्यवरांनी अतिशय उपयुक्त असे मार्गदर्शन केले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी डॉक्टर आणि पोलीस प्रशासनामध्ये संवाद असणे अतिशय महत्वाचे आहे असे सांगितले. आपल्या परस्परांच्या ओळखी असाव्यात.

आपल्या भागातील पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांचा आणि डॉक्टरांचा चांगला परिचय असल्यास त्याचा उभयतांसह समाजातील विविध घटकांनाही फायदा होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

लातुरातील सर्वच वैद्यकीय व्यावसायिकांचे कार्य प्रशंसनिय असल्याचे सांगून एक फोन करा, पोलीस आपल्या सेवेला हजर असतील, असा विश्वास व्यक्त केला. शिवराज मोटेगावकर यांनी यावेळी बोलताना लातूर शहरातील डॉक्टरांच्या आगळ्या वेगळ्या उपचाराच्या लातूर पॅटर्नबद्दल गौरवोदगार काढले. वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित नवनवीन तंत्रज्ञान लातुरात येत आहे. येथील डॉक्टरही सतत नवनवीन शिकण्याचा, त्याचा लाभ आपल्या रुग्णांना करून देण्याचा प्रयत्न सातत्याने करत असल्याचे दिसून येतात असे सांगितले.

डॉ. डुंबरे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.अशोक पोद्दार व डॉ. संतोष माळी यांनी अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर्ससाठी आयोजित केलेल्या सीएमई बद्दल त्यांचे कौतुक केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. अशोक पोद्दार, डॉ. संतोष माळी , डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. विक्रम सूर्यवंशी, डॉ. तुषार पिंपळे यांनी परिश्रम घेतले.

## ४० ठिकाणी नाकाबंदी; ३३ गुंडांची चौकशी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** भरदिवसा अंबाजोगाई रोडवर झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. मध्यरात्री जिल्ह्यात ४० ठिकाणी नाकाबंदी करून कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले. ३२ अधिकारी व २६० पोलीस कर्मचारी सहभागी झालेल्या या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये रात्रभर पोलिसांकडून सराईत गुन्हेगारांची धरपकड करण्यात आली. यात फरार तीन आरोपींना अटक करण्यात आली असून रेकॉर्डवरील १२ आरोपींवर



प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली, तर ३३ गुंडांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.

शहरातील अंबाजोगाई रोडवरील एका बारमध्ये दारू पिल्यानंतर एका तरुणाला बेदम मारहाण केली. या घटनेमुळे सतर्क झालेल्या पोलिसांनी बुधवारी मध्यरात्री शहरातील ट्युशन एरियासह जिल्हाभरात कोम्बिंग ऑपरेशन राबवले. रात्री ८ वाजता सुरू झालेले हे कोम्बिंग ऑपरेशन पहाटेपर्यंत सुरू होते.

यात मद्यसेवन केलेल्या वाहनचालकांवर कारवाई, ड्रंक अँड ड्राइव्ह कारवाई करण्यात आली.

सहज लपता येईल अशी ठिकाणे असलेल्या हॉटेल आणि लॉजची झाडाझडती घेण्यात आली. यावेळी हॉटेलमधील रजिस्टर आणि सर्व रूम्स तपासण्यात आल्या. जिल्ह्यात एकूण ४० ठिकाणी लावलेल्या नाकाबंदीदरम्यान २० चालक मद्यधुंद अवस्थेत वाहने चालवताना आढळून आले. त्यांच्यावर थेट ड्रंक अँड ड्राइव्हच्या केसेस करण्यात आल्या.

## डिजिटल साक्षरतेमुळे भारत लवकरच महासत्ता बनेल : डॉ संदीपान जगदाळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि जयक्रांती महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळा २०२४-२५ आयोजित करण्यात आली होती.

या युवती कार्यशाळेत विद्यापीठातील विविध महाविद्यालयातून १२० मुलींनी सहभाग नोंदविला. या शिबिरात डिजिटल साक्षरता या विषयावरील सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीपान जगदाळे यांचे मार्गदर्शन झालं. डिजिटल साक्षरते विषयी बोलताना ते म्हणाले की, १९३० च्या दशकात युद्ध प्रचारामुळे आणि १९६० च्या दशकात जाहिरातींच्या वाढीमुळे अनुक्रमे युनायटेड किंग्डम आणि युनायटेड स्टेट्समध्ये संगणक साक्षरता शिक्षण सुरू झाले. भारताला डिजिटली सक्षम समाज आणि ज्ञान अर्थव्यवस्थेत रूपांतरित करावे, ऑनलाइन पायाभूत सुविधा सुधारून आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवून नागरिकांना सरकारी सेवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून द्यावा या प्रमुख उद्देशाने १ जुलै २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडिया मिशन सुरू केले.

संगणक किंवा डिजिटल ऍक्सेस उपकरणे चालविण्याचे प्रशिक्षण दिल्याने दैनंदिन जीवनात सुकर होईल. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी ग्रामीण भागात जाऊन डिजिटल साक्षरतेचा



प्रचार करावा. जेणेकरून भारत लवकरच महासत्ता होईल असे प्रतिपादन डॉ.संदीपान जगदाळे यांनी केले.

डॉ संदीपान जगदाळे यांनी आधार, डिजिटल लॉकर, भीम यूपीआय, भारतनेट, ई-नाम, राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल, स्मार्ट सिटीज मिशन, उमंग ॲप, डिजिटल इंडिया पोर्टल, स्वयंम, ई-साइन फ्रेमवर्क, डिजीलॉकर, मायगव्ह, स्वयंम आदी विविध योजनांची माहिती दिली. तसेच समाज माध्यमे हाताळताना कोणते धोके आहेत ते सांगून दक्षता कशी घ्यावी याबाबत जागृती केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.हरिश्चंद्र चौधरी होते. प्रास्ताविक डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले. यावेळी शाहीर संदीप जगदाळे यांनी छ. शिवाजी महाराज यांच्या जन्मावरील पोवाडा सादरीकरण केले आणि विद्यार्थिनींच्या मनामध्ये नेतृत्व गुण विकसित करण्याला दीपस्तंभ निर्माण केला, सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा कांबळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.सतीश डांगे यांनी केले.




## कृष्णा धरणे यांचा लातुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी कृष्णा धरणे यांनी स्टेट एनएसएस सेल, बेऱ्हाणपूर युनिव्हर्सिटी, ओडिसा, आणि उच्च शिक्षण विभाग, ओडिसा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३ ते ९ मार्च २०२५ या कालावधीमध्ये बेऱ्हाणपूर युनिव्हर्सिटी, ओडिसा येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिर २०२५ मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस प्राप्त केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एका विशेष समारंभात धरणे यांचा सत्कार दरबंगा (बिहार) येथील प्रसिद्ध उद्योजक राहुल मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, समन्वयक डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. भाऊसाहेब पुरी यांची उपस्थिती होती.

कृष्णा धरणे यांनी मिळविलेल्या राष्ट्रीय पातळीवरील या पारितोषिक बद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके यांच्यासह, उपप्राचार्य, विभाग प्रमुख, शाखा समन्वयक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## जन्म-मृत्यू नोंद कागदपत्रांत खाडाखोड; ९ जणांवर गुन्हा

### लातूरच्या तहसीलदारांनी केली शिवाजीनगर पोलिसांत तक्रार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** शहर महानगरपालिकेच्या हद्दीत ३९०० रोहिंग्या मुस्लिमांनी जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केले आहेत. यातील अनेक लोकांनी बोगस पुरावे जोडले आहेत, असा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.

त्यांनी लातूरला दोन वेळा भेट देऊन जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या प्रमुखांची भेट घेत तक्रार केली होती. त्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या चौकशीत महापालिका हद्दीतील ९ व्यक्तींनी प्रमाणपत्रासाठी बोगस कागदपत्रे सादर केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी लातूरच्या तहसीलदारांनी दिलेल्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिसांत ९ व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर शहर महापालिकेच्या हद्दीत मुस्लिमांकडून जन्म दाखल्यासाठी दाखल केलेल्या अर्जात बोगस कागदपत्रे जोडण्यात आल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. त्याची चौकशी करण्याचे आदेश दिल्यानंतर लातूर तहसील कार्यालयात आलेल्या एकूण अर्जातील ९ व्यक्तींनी पुरावा म्हणून जोडलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड केल्याचा प्रकार समोर आला.

त्यानंतर तहसील प्रशासनाने या संदर्भात यांच्यांवर गुन्हा दाखल लातूर शहरातील मदार युसूफ पठाण (रा. अंजलीनगर), अमीरूनीसा मोहंमद हनीफ शेख ऊर्फ अमीरुनीसा नुरुद्दीन मणियार, फैमुन्बी गुलाब तांबोळी ऊर्फ फैमुन्बी अयुब मणियार, शाहिदा मोहम्मद कुरेशी ऊर्फ शाहिदा शौकत कुरेशी, फरहीन एकबाल कुरेशी ऊर्फ फरहीन तौसीफ कुरेशी, हुसेन गफूर शेख, नाजेरा अब्दुल खुदुस जारेकर, रुक्सार फारूक कुरेशी उर्फ रुक्सार मोहसीन कुरेशी व मुस्तफा मेहबूब शेख या ९ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला.

दोषींविरोधात तक्रार दिली कागदपत्रांमध्ये खाडाखोड असल्यामुळे संबंधितांना पुरावे सादर करण्यास सांगण्यात आले. परंतु त्यांनी ते केले नाहीत. त्यामुळे अशा ९ व्यक्तीविरोधात आम्ही शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दिली अशी माहिती तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिली.



## सॉ मील धारकांवर मनपाची धडक कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** लातूर शहर महानगरपालिका मार्फत मनपा मालकीच्या सॉ-मील येथे आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये उपायुक्त, डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता व्यसवस्थापक शुभम बावणे व अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे यांच्या उपस्थितीत सॉ-मीलमध्ये धडक वसुली मोहिम राबविण्यात आली होती.

सदर सॉमीलमध्ये आज रोजी चेक व्दा रे रक्क्म रु ५,४६,९७८/-व नगदी २,५०,०००/-असे एकूण ७,९६,९७८/- रु आज रोजी वसुली करण्यात आलेली आहे. तसेच सदर सॉ-मीलधारकांपैकी ३ सॉ-मील मधील ६ आरा मशीन थकबाकी रक्कम रु ३४,५८,५१२/- साठी सिल करण्यात आल्या आहेत. तसेच याव्दारे सिल करण्यात आलेल्या सॉ-मीलधारकांना सूचित करण्यात येते की आपल्याकडील थकबाकी भरणा करुन घेण्यात यावी. अन्यथा सदर सॉ-मील जागांचा ई-लिलाव करण्यात येईल. ज्या सॉ मीलधारकांकडे थकबाकी आहे असे सॉ मीलच्या जागा मनपा मार्फत सिल करुन सदर जागांचा ई-लिलाव ची होणारी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी केले आहे.